# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. ने. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. ने. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२०४५४६० फॅक्स : २२८५२०८१/८२

**➢ विश्वस्त मंडळ सदस्य ➣**

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |

६. मा. श्री. फ. मु. शिंदे
७. मा. श्री. द. म. सुकथनकर
८. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
९. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१०.मा. श्री. अजित निंबाळकर
११.मा. श्री. बी. के. अग्रवाल
१२.मा. श्री. अमित डहाणूकर
१३.मा. श्री. डॉ. समीर दलवाई
१४.मा. श्री. ना. धों. महानोर
१५.मा. सौ. प्रभा कुलकर्णी

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६.मा. श्री. नितीन करीर
अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग
१७.मा. श्री. एन. जे. जमादार
विधी सल्लागार, सहसचिव, विधी व न्याय विभाग

**➢ कार्यकारिणी मंडळ सदस्य ➣**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०.मा. श्री. प्रकाश आवाडे
११.मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१२.मा. श्री. जीवनराव गोरे
१३.मा. श्री. विजय शिर्के
१४.मा. श्री. जयराज साळगांवकर
१५.मा. श्री. सचिन मुळे
१६.मा. श्री. राजेश टोपे
१७.मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील
१८.मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
१९.मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२०.मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२१.मा. श्री. नितीन करीर
अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग

**➢ कार्यकारी समिती ➣**

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. मा. श्री. अजित निंबाळकर | सदस्य |
| ७. मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |
| ९. मा. श्री. बी. के. अग्रवाल | सदस्य |

## विभागीय केंद्र

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पो. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | मानद अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| | कार्याध्यक्ष | श्री. विश्वास ठाकूर |
| विभागीय केंद्र, कोकण | अध्यक्ष | श्री. शेखर निकम |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. अंकुशराव कदम |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. हर्षवर्धन देशमुख |
| जिल्हा केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| जिल्हा केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | - |
| जिल्हा केंद्र, अंबाजोगाई (बीड) | अध्यक्ष | श्री. अनिकेत लोहिया |
| जिल्हा केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |
| जिल्हा केंद्र, जळगांव | अध्यक्ष | श्री. रवींद्र प्रल्हादराव पाटील |
| जिल्हा केंद्र, पालघर | अध्यक्ष | - |
| नवी मुंबई केंद्र | अध्यक्ष | श्री. प्रमोद कर्नाड |
| जिल्हा केंद्र, परभणी | अध्यक्ष | श्री. विलास पानखडे |
| जिल्हा केंद्र, नांदेड | अध्यक्ष | श्री. कमलकिशोर कदम |
| जिल्हा केंद्र, उस्मानाबाद | अध्यक्ष | श्री. जीवनराव गोरे |

## विविध विभाग

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक साहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. विनायकराव ना. कांबळे |
| यशवंतराव चव्हाण जन्मस्थळ, देवराष्ट्रे | समन्वयक | श्री. प्रदीप मोहिते |

## मध्यवर्ती कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक, सभागृहे | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडिअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएट्स |
| सांविधानिक लेखा परीक्षक | | मे. सी. व्ही. के. असोसिएट्स, मुंबई चार्टर्ड अकाउंटंट |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | घोरपडे मराठे ॲण्ड असोसिएट्स, मुंबई, चार्टर्ड अकाउंटंट |

# संपादकीय

## कसोटीचा काळ

वार्तापत्राच्या या अंकात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांचे जे अहवाल आहेत ते मुख्यतः कोविड-१९ संकट 'बेहद' असतानाचे. बेहदच का? संस्था-संघटना-सरकारी आस्थापना-घरं-मैदानं... जगभर सगळीकडेच या कोविड-१९ नावाच्या विषाणूने थैमान घातले आहे. अनेक शतकांची प्रगती प्रश्नांकित झाली आहे. हजारो वर्षांच्या प्रयत्नानंतर विकास पावलेल्या विविध व्यवस्था संकटात सापडल्या आहेत.

यातले सुरुवातीचे सहा महिने तर संपूर्ण मानवजातीलाच भयचकीत करणारे होते. संशोधक, वैद्यकतज्ञ, व्यवस्थापननिपुण, कार्यक्षम प्रशासकांनाही काय करावं हेच लक्षात येत नव्हतं. पृथ्वीवरच्या मानवाचा प्रवास शेवटाकडे सुरू झाला आहे का? असा प्रश्न विचारणारे वाढू लागले होते. पण सुदैवाने गेल्या दोन-तीन महिन्यांत परिस्थिती बदलली आहे. या विनाशकारी संकटाला काबूत आणल्याचं चित्र दिसू लागलं आहे. कोविड-१९ हे नामाभिधान घेऊन वावरणाऱ्या अतिसूक्ष्म विषाणूवर मात करेल असा जालीम उपाय आवाक्यात आल्याची माहिती वेगवेगळ्या संशोधन संस्था देत आहेत. काही अंतिम टप्प्यात पोहोचल्या आहेत. त्या आशेवर जगभर ठप्प झालेले व्यवहार पुन्हा मार्गी लागत आहेत.

या वार्तापत्रातल्या विविध उपक्रमांच्या कार्य अहवालात आपल्याला जगभरच्या या घडामोडींचे प्रतिबिंब दिसेल. सुरुवातीला नियोजित कार्यक्रम रद्द करावे लागले पण त्यानंतर शक्य तितक्या लवकर सावरून आपल्या विविध केंद्रांनी, उपक्रमांनी मदतीचे हात पुढे केले. समाजातला जो सर्वात दुबळा, वंचित घटक आहे, त्याची आठवण आपल्या कार्यकर्त्यांना सर्वप्रथम येणं साहजिकच होतं. त्यामुळे आपण आपले मदतीचे हात आधी त्यांच्यापर्यंत पोहोचवले. सहकारी यंत्रणांना जिथे माहितीची, स्वयंसेवी मदतीची गरज भासली तिथे त्या प्रकारची मदत केली. दीर्घकाळ ठप्प झालेल्या व्यवहारांमुळे जिथे सवलतींची, पुनर्वसनाची गरज होती तिथे शासनाचे लक्ष वेधण्याचं काम केलं. जनजागृतीची जबाबदारीही उचलली. प्रतिष्ठानचे विविध उपक्रम आपली नेहमीची जबाबदारी समर्थपणे पार पाडतातच पण, जेव्हा आपत्तीची परिस्थिती उद्भवते तेव्हा त्यासाठीही सर्वप्रथम तत्पर असतात, हे आपण यावेळीही दाखवून दिलं. आणखी एक कसोटी आपण पार केली, असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही.

कार्यरत राहणे हा आपला मूलमंत्र आहे. आव्हानं, अडथळे येतात. त्यावर मात करून, मार्ग काढून पुढे जात राहणं ही आपल्याला मिळालेली शिकवण आहे. त्यामुळे कोविड-१९ मुळे आलेल्या अनेक बंधनांवर मात करून आपले उपक्रम सुरू राहिले. जनसंपर्क टाळायचा असल्याने,

तो अपरिहार्य असेल तर पुरेसं शारीरिक अंतर ठेवूनच करायचा असल्याने आपण ऑनलाईन-वेबिनारचा मार्ग अवलंबला आहे. विज्ञानगंगा व्याख्यानमला, शिक्षणकट्टा यासारखे उपक्रम या माध्यमातून अधिक विस्तारले असल्याचं दिसतं. कोविड-१९ जोपर्यंत पूर्ण आटोक्यात येत नाही तोवर आपल्याला याच तंत्राचा अवलंब करावा लागणार असं दिसतं आहे. हे तंत्र आपल्याला किती प्रभावीपणे वापरता येईल आणि आपलं काम पुढे नेता येईल याचा विचार आपण करतो आहोत.

खरंतर आणखीही बऱ्याच गोष्टींचा विचार सुरू आहे. कोविड-१९ ने सगळं जग बदलणार आहे. काळाचा अंदाज आपल्यालाही आहे. समाजाचे प्रश्न, धारणा बदलणार आहेत. आपल्यालाही त्या दृष्टीने आपल्या विचारांची दिशा, क्षेत्रे बदलावी लागतील. प्राधान्यक्रमांची पुनर्मांडणी करावी लागेल. काही नव्या क्षेत्रांचा, उपक्रमांचा विचार करावा लागेल. त्यासाठी उपलब्ध असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा लागेल. पुनर्विचार, पुनर्रचना आणि पुनर्उभारणी या अपरिहार्य प्रक्रिया आहेत. कोविड-१९ सारखं जग बदलणारं संकट येतं तेव्हा याची जाणीव प्रकर्षाने होते. आपल्यालाही त्याला सामोरे जावे लागेलच. मला खात्री आहे, आपण त्यातही पूर्ण यशस्वी होऊ.

यावेळचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार' नाशिकच्या 'लोकहितवादी मंडळा'ला प्रदान केला जात आहे. कुसुमाग्रजांसारख्या 'ज्ञानपीठ'प्राप्त आदरणीय साहित्यिकाने स्थापन केलेली संस्था, लोकहितवादी आणि महात्मा फुले या प्रागतिक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांना आदरांजली म्हणून या संस्थेने गेल्या ७० वर्षात महाराष्ट्र संस्कृती समृद्ध करण्यासाठी असंख्य उपक्रम राबवले. कला, साहित्याने संस्कृती फुलते आणि त्यातूनच कोणताही समाज समृद्ध होत घडत जातो, यावर यशवंतराव चव्हाण साहेबांची गाढ निष्ठा होती, हे आपण सगळे जाणतोच. त्यामुळे त्यांच्या नावाचा हा पुरस्कार कुसुमाग्रजांनी स्थापन केलेल्या लोकहितवादींच्या नावे असलेल्या संस्थेला प्रदान होताना किती योगायोग साधले जाताहेत!

'लोकहितवादी मंडळा'च्या पुढील वाटचालीसाठी यानिमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा.

सुप्रिया सुळे

(सुप्रिया सुळे)
कार्याध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,
मुंबई

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३६व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन
वर्ष : २४वे / अंक ४८वा / प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०२०

सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक
**सुरेश पाटील**
**अनिल पाझारे**

विशेष साहाय्य
**पद्मभूषण देशपांडे**

साहाय्य
**मीनल सावंत-पाडावे**
**मनिषा खिल्लारे**
**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**
विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतीश लाड, शशांक आंबेरकर, विलास परदेशी, भक्ती जांभवडेकर, स्वाती शेलार, विप्लव वागडे, अतुल तांडेल यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

## अनुक्रमणिका

- माननीय यशवंतराव चव्हाण यांचा लेख ........................ ६
- यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०२० मानपत्र.. ११

**मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग**

- नवमहाराष्ट्र युवा अभियान ........................ १३
- शिक्षण विकास मंच ........................ २१
- अपंग हक्क विकास मंच ........................ २६
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ........................ २७
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ........................ २८
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ........................ ३२

**विभागीय केंद्र, कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, नाशिक ........................ ३३
- विभागीय केंद्र, ठाणे ........................ ३६
- विभागीय केंद्र, अंबाजोगाई ........................ ३७
- विभागीय केंद्र, अहमदनगर ........................ ३८
- विभागीय केंद्र, सोलापूर ........................ ३८
- विभागीय केंद्र, लातूर ........................ ३९
- विभागीय केंद्र, नवी मुंबई ........................ ४१
- विभागीय केंद्र, कराड ........................ ४२
- विभागीय केंद्र, जळगाव ........................ ४३
- विभागीय केंद्र, नागपूर ........................ ४४
- विभागीय केंद्र, परभणी ........................ ४५
- देवराष्ट्रे अहवाल ........................ ४६
- विभागीय केंद्र, रत्नागिरी ........................ ४६
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ........................ ४७
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे...... ५७
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मान्यवर......... ५९
- यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर.. ६०
- दुखवटा ठराव ........................ ६१
- प्रतिष्ठानची प्रकाशने ........................ ६३

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९

# पुरोगामी आर्थिक धोरण

*(अखिल भारतीय काँग्रेसच्या मुंबई येथे भरलेल्या ७३ व्या अधिवेशनात आर्थिक ठराव मांडताना २८ डिसेंबर १९६९ रोजी केलेल्या भाषणाच्या आधारे.)*

देशातील सध्याच्या राजकीय पेचप्रसंगाच्या काळात, आपण जे आर्थिक धोरण स्वीकारू, त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. या धोरणावर आपली केवळ आर्थिकच नव्हे, तर राजकीय प्रगतीही अवलंबून राहणार आहे. म्हणून या धोरणास जसे आर्थिक महत्त्व आहे, तसाच राजकीय संदर्भही आहे. सध्या आपल्यापुढे जो प्रस्ताव आहे, त्यात गेल्या बावीस वर्षांमध्ये आपल्या देशाने काय काय साध्य केले, हे नमूद करण्यात आलेले आहे. येथे हे लक्षात ठेवायला हवे, की आर्थिक धोरणाची जशी काही तात्कालिक उद्दिष्टे असतात, तशीच दीर्घकालीन ध्येयेही असतात. या दीर्घकालीन ध्येयांनुसार देशाच्या आर्थिक धोरणास विशिष्ट दिशा लाभत असते. ही ध्येये गाठण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम स्वीकारण्याची गरज भासते. त्या दृष्टीने काँग्रेसने १९६७ मध्ये दहा कलमी कार्यक्रम मंजूर केला. त्यानंतर काय घडले, हे सर्वांनाच माहीत आहे. खरे म्हणजे हा कार्यक्रम अमलात आणण्यावर भर दिला गेला नाही, म्हणूनच पक्षामध्ये धोरणविषयक पेचप्रसंग उद्भवला. आपल्याला कोणती दिशा धरायची आहे, हे दहा कलमी कार्यक्रमाद्वारे आपण निश्चित ठरवले होते. पण आता परिस्थिती अशी आहे, की केवळ या कार्यक्रमाकरता थांबून चालणार नाही. आपल्याला दहा कलमी कार्यक्रमाच्याही पुढे गेले पाहिजे. आर्थिक कार्यक्रमाची आणि धोरणांची आणखी काही क्षेत्रे निश्चित करायला हवीत. कारण गेल्या बावीस वर्षांमध्ये आपण विशिष्ट आर्थिक धोरण स्वीकारून त्या अनुरोधाने पावले टाकली असली, तरी देशाच्या आर्थिक परिस्थितीत अद्यापही काही विसंगती आढळून येऊ लागल्या आहेत, हे नाकारून चालणार नाही. किंबहुना आर्थिक धोरणासंबंधीचा हा प्रस्ताव तयार करण्यामागचा मूलभूत विचार तोच आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या गेल्या बावीस वर्षांमध्ये आपल्या देशाने काहीच प्रगती केली नाही, असे म्हणणे निखालस चूक ठरेल. या काळामध्ये आर्थिक क्षेत्रात अशा अनेक चांगल्या गोष्टी करण्यात आलेल्या आहेत, की त्यांचा देशाला, काँग्रेसला आणि सरकारला जरूर अभिमान वाटतो. आपण जेव्हा आत्मपरीक्षण करायला बसतो, तेव्हा या चांगल्या गोष्टींचे आपल्याला विस्मरण होते. असे होणे चांगले नाही. आपतली आणखी प्रगती व्हावी, यासाठी आपण आत्मपरीक्षण केले पाहिजे, हे मलाही मान्य आहे. परंतु आत्मपरीक्षण करताना आपण केलेले उल्लेखनीय कार्य विचारात घेतले नाही, तर आपण आपला आत्मविश्वास आणि विकासाची दिशा हरवून बसण्याचा धोका आहे.

गेल्या बावीस वर्षांमध्ये आपल्या देशाने निश्चितच भरीव आर्थिक प्रगती केली आहे, याबद्दल माझ्या मनात तरी संदेह नाही. शेतीचा विचार केला, तरी असे दिसेल, की आपण पाटबंधारे आणि विद्युतीकरण यांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेऊन हरित-क्रांती घडवून आणली आहे. उद्योगधंद्यांबाबतही हेच म्हणावे लागते. गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या देशात इतके आधुनिक आणि विविध प्रकारचे कारखाने स्थापन झाले आहेत, की केवळ आशियातीलच नव्हे, तर साऱ्याा जगातील एक औद्योगिक दृष्ट्या प्रगत देश म्हणून भरत ओळखला जात आहे. ही प्रगती कमी लेखून कसे चालेल? परंतु त्याचबरोबर हेही मान्य केले पाहिजे, की प्रगतीबरोबरच देशात काही प्रश्न नव्याने निर्माण झाले आहेत.

आपण मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राला सुस्थिर पाया लाभत असतानाच खासगी क्षेत्रही प्रगतिपथावर आहे. खासगी क्षेत्राच्या प्रगतीबरोबर अर्थव्यवस्थेमध्ये एक अपप्रवृत्ती शिरू पाहत आहे. या प्रगतीबरोबर आर्थिक मक्तेदारीचीही वाढ होत असून ही आर्थिक मक्तेदारी राजकीय क्षेत्रावर आपले वर्चस्व गाजवू पाहत आहे. आणि हाच खरा धोका आहे. ज्यांच्या हातांत आर्थिक सत्ता असते, त्यांचे या सत्तेवर समाधान होत नाही. ते आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या बळावर राजकीय सत्ताही हस्तगत करू पाहतात. आपण इतर देशांचा इतिहास पाहिला, तर तेथे हेच घडल्याचे आढळून येते आणि आज भारतातही हेच घडत आहे. आपल्या देशाच्या प्रत्येक आर्थिक क्षेत्रामध्ये - मग ते शेतीचे असो, उद्योगधंद्याचे असो वा व्यापारविषयक असो- मक्तेदारीने पाय रोवले असून आता ही मक्तेदारी राजकारणातही प्रवेश करू पाहत आहे. म्हणून आपण आपले आर्थिक प्रश्न सोडवत असताना मक्तेदारीच्या धोक्याची उपेक्षा करून चालणार नाही. मी असे मानतो, की आमच्या देशात संमिश्र अर्थव्यवस्था राहील. पण त्याचबरोबर आम्ही मक्तेदारी चालू देणार नाही. आपल्या देशाचे औद्योगिक धोरण कसे राहील, यासंबंधी आपण एक धोरणविषयक प्रस्ताव केला असून त्यामध्ये खासगी क्षेत्राकडे कोणते उद्योग राहतील, याचा निर्देश करण्यात आलेला आहे. ते उद्योग खासगी क्षेत्राकडेच राहतील. त्यायोगे खासगी क्षेत्र देशाच्या आर्थिक विकासातील आपली भूमिका योग्य तऱ्हेने पार पाडू शकेल; परंतु आम्ही खासगी क्षेत्राचा वरचश्मा सहन करणार नाही. मूलभूत उद्योगधंद्यांच्या बाबतीत सार्वजनिक क्षेत्रांचा पूरक विभाग म्हणूनच खासगी क्षेत्रास काम करावे लागेल. लघुउद्योगाचे क्षेत्र मुख्यतः खासगी क्षेत्राकडेच राहील. ज्यांनी तांत्रिक शिक्षण घेतलेले आहे, त्यांना आपले स्वतःचे लघुउद्योग सुरू करता येतील. या लोकांना कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल, हा या संदर्भातील एक प्रश्न आहे. परंतु आपण जेव्हा खासगी क्षेत्रासंबंधी

बोलतो, तेव्हा आपल्या डोळ्यांपुढे मुख्यत: काही मूठभर घराण्यांनी आपल्या नियंत्रणाखाली उभारलेले औद्योगिक सामाज्य येते. अशा खासगी क्षेत्राची ही मक्तेदारी चिंताजनक बाब होण्याइतकी वाढलेली आहे. आम्ही जेव्हा संमिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतो, तेव्हा अशा मक्तेदारांना कसेही वागायची मुभा आम्ही देऊ, असा याचा अर्थ होत नाही. खासगी क्षेत्राने सार्वजनिक क्षेत्राबाबत स्पर्धकाची भूमिका घेताच कामा नये. शिवाय राजकीय सत्तेवर नियंत्रण मिळविण्याच्या खटाटोपातही पडू नये. कारण अशी मक्तेदारी राजकीय आणि आर्थिक लोकशाहीची मारेकरी ठरू शकते.

नियोजनबद्ध अर्थव्यवस्था स्वीकारण्यामागे आपली हीच दृष्टी होती. देशाच्या आर्थिक विकासास हातभार लावण्यात खासगी क्षेत्रासही स्थान लाभते पाहिजे आणि म्हणून खासगी कारखान्यांच्या वाढीला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे आपले नियोजनकार प्रथमपासून म्हणत आलेले आहेत. मात्र कोणत्याही विकसनशील देशामध्ये सार्वजनिक क्षेत्रालाच निर्णायक महत्त्व असले पाहिजे, याबाबत नियोजनकारांमध्ये दुमत नव्हते. परंतु काही मक्तेदार घराण्यांनी अर्थव्यवस्थेवरील आपली पकड वाढवून सार्वजनिक क्षेत्रावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न चालविला आहे. मकक्तेदारांचे हे आव्हान आपल्याला स्वीकारले पाहिजे.

हे आव्हान स्वीकारण्यासाठी आपण आपल्या समाजवादी उद्दिष्टांचा आणि धोरणांचा पुनरुच्चार केला पाहिजे. कारण काँग्रेसची प्रारंभापासून समाजवादाशी बांधिलकी आहे. गरिबी आणि बेकारी हे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला भेडसावणारे दोन मूलभूत प्रश्न असून ते सोडविण्यासाठी समाजवादाशिवाय पर्यायच नाही. त्यासाठीच काँग्रेसने दहा कलमी कार्यक्रम तयार केला. परंतु हा कार्यक्रम नीटपणे अमलात न आणल्यामुळे मक्तेदारीचा प्रश्न आणखी बिकट झाला आहे. म्हणूनच या दहा कमली कार्यक्रमाबाबत आपण कोणती भूमिका स्वीकारतो, यावर आपल्या वाटचालीची दिशा ठरणार आहे. फरिदाबाद येथल्या अधिवेशनात हा दहा कलमी कार्यक्रम मांडण्यात आला, तेव्हा आपल्या काही पुढाऱ्यांनाच तो मनापासून मान्य नव्हता, असे आपल्याला आढळून आले. त्यातूनच पेचप्रसंग निर्माण झाला.

बँकांवर सामाजिक नियंत्रण असावे, असे सुचविण्यात आले, तेव्हा सामाजिक नियंत्रण म्हणजे काय, यासंबधीच वाद झाला. सामाजिक नियंत्रण ही राष्ट्रीयीकरणापेक्षा किती तरी व्यापक आणि सर्वकष कल्पना आहे, असे मी मानतो. १९६७ मधील काँग्रेसच्या निवडणूक जाहिरनाम्यात सामाजिक नियंत्रणाचा आवर्जून उल्लेख करण्यात आला होता. परंतु नंतर सामाजिक नियंत्रण म्हणजे काय, यासंबंधी वेगवेगळी मते मांडण्यात येऊ लागली. सामाजिक नियंत्रण म्हणजे राष्ट्रीयीकरण नव्हे, असे अट्टाहासाने सांगितले जाऊ लागले. अर्थात या वादंगाला आता केवळ तांत्रिक महत्त्व तेवढे उरले आहे, कारण राष्ट्रीयीकरण का सामाजिक नियंत्रण, हा प्रश्न आता शिल्लक राहिलेला नाही. कारण आपण केवळ राष्ट्रीयीकरणाचे तत्त्व स्वीकारूनच थांबलो नाही, तर देशातील चोंदा प्रमुख बँकाही सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या आहेत.

मक्तेदारीविरुद्धचा आपला लढाही त्याचबरोबर चालूच आहे. मक्तेदारीवर नियंत्रण घालणारे विधेयक आपण मंजूर केले आहे. आयात व्यापाराबाबतही आपण हे धोरण अनुसरले आहे. अनेक वस्तूंचा आयात-व्यापार यापुढे केवळ सरकारी यंत्रणेमा्फतच केला जाईल.

बँकांचे राष्ट्रीयीकरण करून आणि मक्तेदारी व्यापारावर निर्बंध लावून आपण जो समाजवादी मार्ग अनुसरायला प्रारंभ केला आहे, त्या मार्गावरील पुढील वाटचाल करण्याच्या दृष्टीने आपण आणखी काही पावले टाकायला हवीत.

सर्वसाधारण विमा व्यवसायाचे (६८१८१३१ ११५११३१७८६) राष्ट्रीयीकरण हे त्यापैकी एक पाऊल होय. कारण केवळ बँका ताब्यात घेऊन भागणार नाही. त्याबरोबर सर्वसाधारण विमा-व्यवसायही सरकारी नियंत्रणाखाली आला पाहिजे.

भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे आणि खास अधिकार हेही काढून घ्यायला हवेत. कारण हे संस्थानिक जुन्या सरंजामशाहीचे अवशेष असून अशा कालबाहय अवशेषांना समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये स्थान राहूच शकत नाही. संस्थानिकांचे तनखे आणि खास हक्क काढून घेण्याबाबत आतापर्यंत भरपूर चर्चा झालेली आहे. याबाबत माझी भूमिका अशी आहे, की आपण हा प्रश्न शक्य तर वाटाघाटी करून सोडवावा. कारण त्यामुळे कटुता निर्माण होणार नाही. मात्र येथे एक गोष्ट केली पाहिजे.

संस्थानिकांचे तनखे आणि हक्क नाहीसे करण्याच्या निर्णयाबाबत तडजोड होऊ शकणार नाही. आमचा पक्ष त्याबाबतीत खंबीर भूमिके वर उभा आहे. म्हणून लवकरच आम्ही संसदेपुढे तसे विधेयक सादर करणार आहोत. संस्थानिक अजूनही खळखळ करीत आहेत. काही घटनात्मक तरतुदींची सबब पुढे करून स्वत:चा बचाव करू पाहत आहेत. मला त्यांची अडचण समजू शकते. परंतु काळ बदलला आहे, इतिहासाचा संदर्भ बदलला आहे, इतिहासाची अपेक्षा बदलली आहे, ही वस्तुस्थिती भूतपूर्व संस्थानिकांनी समजावून घेतली, तर राष्ट्रीय जीवनप्रवाहामध्ये सहभागी होण्याची ही संधी ते दवडणार नाहीत, अशी मला आशा आहे.

शहरी भागातील मालमत्तेच्या धारणेवर कमाल मर्यादा घातली पाहिजे, हा विचार आपण १९६२ पासून बोलून दाखवीत आहोत. त्यावेळी निवडणूक जाहीरनामा तयार करीत असताना, केवळ शेतजमिनीच्या धारणेवर मर्यादा घालून चालणार नाही, शहरातील मालमत्तेच्या धारणेबाबतही कमाल मर्यादा ठरविली पाहिजे, असे तेव्हा सुचविण्यात आले. शहरांमधील रहिवाशांना किती अडचणी सहन कराव्या लागत आहेत, याची आपल्याला कल्पना आहे. तेथील जमिनींच्या किमती भरमसाट वाढत चालल्या असून त्यायोगे राहण्याच्या जागेचा प्रश्न बिकट झालेला आहे.

म्हणून शहरभागातील जमिनींच्या धारणेबाबत निश्चित धोरण ठरवून त्याची क्रमश: अंमलबजावणी करण्याची वेळ आता आलेली आहे. शहरी मालमत्तेवर नियंत्रण घालण्याचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा असल्यामुळे तो एकदम सोडविता येणार नाही. त्यासाठी भिन्नभिन्न पातळयांवर निर्णय घ्यावे लागतील. म्हणून प्रथम स्थूत्र निर्णय घेणे दृष्ट ठरेल.

शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाबद्द किमान वाजवी भाव मिळालेच पाहिजेत, हे आपल्या आर्थिक धोरणाचे एक प्रमुख सूब आहे. शेतमालाचे उत्पादन वाढावे आणि उत्पादक व ग्राहक यांचे शोषण थांबावे, यांसाठी काही नवी पावले उचलावी लागतील. त्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रात प्रमुख अन्नधान्याची घाऊक खरेदी करणे इष्ट ठरेल. अशी एकाधिकार खरेदी सुरू झाली, तरच शेतकऱ्यांची पिळवणूक थांबू शकेल. काही राज्य सरकारांनी या दृष्टीने पावले टाकली आहेत, हे मला माहीत आहे. काही राज्यांमधील शिलकी अन्नधान्य खरेदी करण्याबाबत अन्नधान्य महामंडळ पुढाकार घेत असते. परंतु एकेका वस्तूचा व्यापार सार्वजनिक क्षेत्रात घेऊन हा व्यापक प्रश्न सुटणार नाही. ग्रामीण भागातील उत्पादकांची परिस्थिती सुधारण्यासाठी गहू, तांदूळ, ज्वारी आणि इतर नगदी पिके यांची खरेदी सार्वजनिक शासन यंत्रणेमार्फतच झाली पाहिजे, हा आमच्या नव्या पुरोगामी आर्थिक धोरणातील आग्रहाचा भाग आहे. तेलबियांसारख्या इतर शेतमालाच्या व्यापारात श्रीमंत ठेकेदार अशा रीतीने भाव बांधून घेतात, की त्यामुळे शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही नुकसान सोसावे लागते. म्हणून शेतमालाच्या व्यापारातील मध्यस्थाला आणि त्याच्या नफेबाजीला मुळीच वाव राहणार नाही, अशा रीतीने शेतमालाची खरेदी सुरू व्हावयास हवी.

शेतकऱ्यांनी अपार कष्ट करून नगदी पिकांचे उत्पादन वाढविले, तर त्याचा परिणाम काय होतो? एकदम वस्तूंचे बाजारभाव खाल्ली येतात आणि परिणामी शेतकऱ्याला नुकसान सहन करावे लागते. परंतु हाच शेतमाल कच्चा माल म्हणून कारखान्यात गेला, की त्याची किंमत एकदम चढू लागते. उत्पादक आणि ग्राहक यांची पिळवणूक करण्याची घाऊक बाजारातील ही नेहमीचीच रीत झालेली आहे. उत्पादकांनी राबायचे आणि त्यांच्या कष्टाचा फायदा पैसेवाल्या दलालांनी घ्यायचा, ही अनिष्ट पद्धत यापुढे बंद झाली पाहिजे. सरकारनेच सर्व अन्नधान्य व्यापार

आपल्या हातात घेतला, की शेतकऱ्यालाही योग्य भाव मिळेल आणि ग्राहकांचीही लुबाडणूक होणार नाही. ग्रामीण भागातील अर्थकारणाचा विचार करताना शेतकरी उपाशी राहणार नाही, ही पहिली खबरदारी घेतली पाहिजे. त्याप्रमाणे साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याची व लोकांकडून भरमसाट भाव वसूल करण्याचा कटही उधळून लावायला हवा.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण जागोजागी धरणे बांधण्याचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यामुळे शेतीला पाणी आणि वीज मिळू लागली. गेल्या वीस-बावीस वर्षांमध्ये आपण या बाबतीत खरोखरच आश्चर्यकारक प्रगती केलेली आहे. आपल्या देशाला मोठ्या जलवाहिनींचे वरदान मिळालेले आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा, कृष्णा, गोदावरी अशा किती तरी लोकमाता या भूमीमध्ये नांदत आहेत. परंतु त्यांच्यावर धरणे बांधावीत आणि अडवलेले पाणी शेतीसाठी वापरावे, हा विचार पूर्वीच्या काळी आपल्याला सुचला नव्हता. त्यामुळे एकीकडे नद्यांतील पाणी वाहून जाई, तर दुसरीकडे पाण्याअभावी शेते वाळून जात. पं. जवाहरलाल नेहरूंचे या देशावर फार मोठे क्रण आहे. कारण त्यांनीच प्रथम आपल्या सर्व नियोजनांमध्ये अवाढव्य धरणांना आणि प्रचंड वीजनिर्मिति-केंद्रांना अग्रक्रम दिला. त्यामुळेच भारतीय शेतीचा चेहरामोहरा एकदम बदलून गेला.

शेतीमध्ये अलीकडे नवे तंत्रविज्ञानही अनुसरण्यात येऊ लागले. त्यामुळे आपल्याला ग्रामीण भागात काही सुधारणा दिसून येत आहे. वीस वर्षांपूर्वीचे भारतीय खेडे आणि आजचे खेडे यांत बराच फरक आहे. त्यावेळी खेडेगाव उदास अन् उजाड दिसायचे. आता तेथे प्रगतीची चक्रे फिरत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे साहजिकच मनाला बरे वाटते. पण एवढ्यावरच समाधान मानून चालणार नाही. श्रीमंत शेतकऱ्याचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे, हे खरे आहे. परंतु अजूनही बहुसंख्य शेतकरी गरीबच राहिले आहेत. पडीक जमिनीचे पट्टेच्या पट्टे अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांचे भीषण दारिद्र्य अंत:करण पिळवटून टाकणारे आहे. शेतीचा क्रमश: विकास होऊनही बहुसंख्य ग्रामीण जनता गरीबच राहावी, हे आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेपुढील सर्वांत मोठे आणि महत्त्वाचे आव्हान आहे.

धरणे बांधण्याचे कार्यक्रम आपण यापुढे सोडून द्यावेत, असे मला मुळीच म्हणायचे नाही. तो कार्यक्रम चालू ठेवलाच पाहिजे. परंतु मला हे सांगायचे आहे, की आपण देशातील सारी जलसंपत्ती उपयोगात आणली, तरीदेखील बराच मोठा भूभाग पाण्यापासून वंचितच राहणार आहे. आपण त्या कोरडवाहू जमिनीचे काय करणार आहोत, हा खरा प्रश्न आहे. तो सोडविला नाही, तर देशातील गरिबीचे आपण निर्मूलन करू शकणार नाही. छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणी मिळूनही त्यांचा प्रश्न सुटलेला नाही, हे आपण पाहतच आहोत. म्हणून यापुढे आपल्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांमध्ये बहुसंख्य उपेक्षित शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यावर विशेष भर दिला गेला पाहिजे. त्या दृष्टीनेच कोरडवाहू शेतीचा प्रश्न हाताळला पाहिजे. कोरडवाहू शेतीच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी खास कार्यक्रम संघटित केले पाहिजेत. तसेच अशा शेतांमध्ये कोणती पिके घेता येतील, याचाही विचार व्हायला हवा. त्यासाठी आपल्याला कोरडवाहू शेतीचे नवे तंत्र विकसित करावे लागेल. ही शेती करणाऱ्यांना बी-बियाणे आणि खते यांचा पुरवठा करण्याची आणि त्यांच्या मालाला सहकारी बाजारपेठ मिळवून देण्याची व्यवस्था करण्यासाठी वेगळा निधी उभारावा लागेल.

आपण तहान माणसांना कर्ज कसे उपलब्ध करून देणार आहोत,

हाही पुरोगामी आर्थिक धोरणाच्या संदर्भात महत्त्वाचा प्रश्न ठरतो. ज्याच्याकडे संपत्ती आहे, मालमत्ता आहे, त्यालाच कर्ज द्यायचे, अशी आपल्याकडील बँकांची सर्वसाधारण प्रवृत्ती आहे. लहान माणासाने नव्या योजना अंगीकारिल्या पाहिजेत व त्याने उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये भाग घेतला पाहिजे, अशी जर आपली अपेक्षा असेल, तर त्याला स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी आपण भांडवल कोठून देणार आहोत, याचा विचार व्हावयास हवा. विशेषत:, जो नवीन तंत्र आत्मसात करू इच्छितो, त्याला तर अधिकच भांडवल लागते. ते त्याला कोण देणार? तो जर एखाद्या अर्थ महामंडळाकडे गेला, तर तेथील अधिकारी विचारणार, 'तुझ्यापाशी तारण ठेवायला काय आहे?' त्या बिचाऱ्यापाशी मुळीच मालमत्ता नसते. मग तो तारण काय ठेवणार? त्यामुळे कर्ज देण्याबाबतचे पारंपरिक धोरण यापुढेही चालू राहित्रे, तर ज्याच्यापाशी मालमत्ता आहे, त्यांनाच यापुढेही कर्ज मिळत राहील. या पद्धतीमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होतात आणि गरीब अधिक गरीब होऊ लागतात. म्हणून मालमत्ता आणि भांडवत्र-पुरवठा या दुष्टचक्राचा भेद केलाच पाहिजे. त्यासाठी मालमत्ता पाहून कर्ज देण्याची प्रथा थांबविली पाहिजे. एखादी व्यक्ती जो उद्योग-व्यवसाय सुरू करू इच्छीत आहे, त्या व्यवसायाची संभाव्य क्षमता ध्यानात घेऊनच कर्ज देण्यात आले, तर भांडवलाअभावी अडून पडलेले अनेक प्रकल्प मार्गस्थ होतील. नवा कारखाना वा नवा उद्योग सुरू करायची तरुण उद्योजकाला हिंमत होईल, अशा रीतीने कर्जवाटपाची कार्यपदती ठरविली पाहिजे. या कार्यपद्धतीमुळे देशात स्वयंरोजगारांना खूप चालना मिळू शकेल-मग तो उद्योग छोट्या शेतकऱ्याने सुरू केलेला असो वा एखाद्या शेतमजुराने.

**करपदती सोपी आणि सुटसुटीत केली, तर कर चुकविण्याची प्रवृत्ती कमी होऊ शकेल. म्हणून करपद्धतीची पुनर्घटना करण्यासाठीही तज्ज्ञांची समिती नेमणे आवश्यक ठरते.**

शेतीचा विचार करीत असताना जमीनधारणेचा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. या बाबतीत गेल्या वीस वर्षामध्ये आपण फारसे काही साध्य करू शकलो नाही, हे कटु सत्य मान्य केलेच पाहिजे. तसे पाहिले, तर या प्रश्नाचा विचार आपण अलीकडेच करू लागलेलो आहोत, असे मुळीच नाही. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीही काँग्रेस पक्षाने जमीनदारी-निर्मूननाचा कार्यक्रम पुरस्कारिल्रा होता. त्या काळातही काही राज्य सरकारांनी जमीनधारणेसंबंधी कायदे केत्रे होते. १९३७ मध्ये तेव्हाच्या मुंबई सरकारने कुळांच्या हक्कांचे संरक्षण करणारे विधेयक मांडले होते. नंतर इतर अनेक राज्यांनीही तशा प्रकारचे कायदे केले. परंतु या कायद्यांच्या अंमलबजावणीचे गेल्या वीस वर्षांतील चित्र काय दिसते? शेतजमीन कसणाऱ्याच्या मालकीची झाली पाहिजे, हे तत्त्व मान्य झाले आहे. तसे कायदेही करण्यात आलेले आहेत आणि तरीही छोटा शेतकरी आणि शेतमजूर आहे तेथेच आहे. असे का? कारण कायदे कागदावरच राहिले. त्यांची अंमलबजावणी झालीच नाही. म्हणून यापुढे एक-दोन वर्षांच्या आत या सर्व कायद्यांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्याचा निर्धार आपण केला पाहिजे. आपण तसे काही करू शकलो, तरच लोकांचा आपल्यावर विश्वास बसेल. नाही तर ते वैफल्याने ग्रासले जातील.

मोठे जमीनदार आणि शेतकरी यांच्यात असंतोष धुमसत आहे. तो वेळीच नाहीसा केला नाही, तर ग्रामीण भागात हिंसाचाराचे थैमान निर्माण होईल आणि हरितक्रांतीचे सारे फायदे नाहीसे होऊन जायला वेळ लागणार नाही. म्हणून जमीनवाटपाच्या प्रश्नाची ताबडतोब दखल घेतलीच पाहिजे. याबाबतीत दिरंगाई वा चालढकल चालणार नाही.

शेतीनंतर आर्थिक धोरणामध्ये विचार होतो, तो उद्योगधंद्यांचा. वीस वर्षांपूर्वी आपण जे औद्योगिक धोरण निश्चित केले, त्यांत मूलत: काहीच चूक नाही. परंतु हे धोरण अमलात आणताना काही गफतलरती घडल्या, हे मान्य केलेच पाहिजे. कारखानदारीमध्ये मक्तेदारी अशीच वाढत गेलरी, तर लवकरच धोकादायक परिस्थिती निर्माण होईल. म्हणून काही मूठभर घराण्यांच्या हातांत औद्योगिक सामर्थ्य केंद्रित होण्याची सध्याची प्रक्रिया थांबविली पाहिजे. त्यासाठी औद्योगिक चौकटीत काही बदल वा काही फरक करायला हवेत.

कर चुकविणे आणि काळा पैसा साठविणे, हा आपल्या अर्थव्यवस्थेला लागलेला एक मोठाच शाप आहे. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी आणि त्याचा प्रसार थांबविण्यासाठी कोणते उपाय योजिले पाहिजेत, याचा विचार करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ज्ञांची समिती नेमावी, असे मी म्हणेन. तसेच कोणालाही कर चुकविता येऊ नयेत, अशा रीतीने करपदतीची आखणी करायला हवी. करपदती सोपी आणि सुटसुटीत केली, तर कर चुकविण्याची प्रवृत्ती कमी होऊ शकेल. म्हणून करपद्धतीची पुनर्घटना करण्यासाठीही तज्ज्ञांची समिती नेमणे आवश्यक ठरते.

प्रत्येक माणसाच्या पाच मूलभूत गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या त्या गरजा होत. सध्या आपण आरोग्यसेवांच्या विस्तारावर बराच पैसा खर्च करीत असतो. परंतु सर्वसामान्य माणूस अजूनही प्राथमिक आरोग्यसेवेपासून दूरच राहिलेला आहे. म्हणूनच मला असे वाटते, की ताप, खोकला, पडसे यांसारख्या वारंवार उद्भवणाऱ्या आजारांवरील औषधे तरी लोकांना स्वस्त किंमतीत मिळायला हवीत. सर्वसामान्य नागरिकांना हे आजार नेहमी होत असतात. त्यामुळे या आजारांवरील औषधे जरी लोकांना स्वस्त किंमतीत मिळाली, तरी आपण या बाबतीत बरेच काही साध्य केले, असे म्हणता येईल. म्हणून औषध-निर्मितीकडे केवळ व्यवसाय म्हणून न पाहता त्यातील सामाजिक आशय ध्यानात घेतला पाहिजे.

तसेच बालसंगोपनाचा प्रश्नही दुर्लक्षित राहता कामा नये. मुले राष्ट्राची भावी नागरिक आहेत. आणि म्हणून त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य द्यायला हवे, असे आपण म्हणत असतो. पण

प्रत्यक्षात काहीच घडत नाही. म्हणून बालसंगोपनासाठी वेगळा राष्ट्रीय निधी उभारून तो केवळ लहान मुलांच्या कल्याणासाठी वापरला जाईल, असा प्रयत्न व्हावयास हवा.

**बेकारीचा प्रश्नही अतिशय तातडीचा झालेला आहे. खरे तर गरिबी आणि बेकारी हे आपल्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत मूलभूत प्रश्न आहेत. म्हणून त्यांचा एकत्रित विचार करायला हवा.**

आरोग्याप्रमाणे घरांचा प्रश्नही बिकट झालेला आहे. शहरांमध्ये झोपडपट्ट्या वाढत आहेत तर खेडेगावांमधीलर छोटे शेतकरी आणि शेतमजूर असुरक्षित जीवन जगत आहेत. जमिनीचा मालक केव्हा येईल आणि आपल्याला घर सोडून जायला सांगेल, याची त्यांना सारखी भीती वाटत असते. हे शेतमजूर अत्यंत छोट्या खोपट्यांमध्ये राहतात. पण त्याही, त्या आपल्या आहेत व आपल्याला येथून कोणीही हुसकावून लावणार नाही, याची शाश्वती त्यांना वाटत नाही, हे अगदी खरे आहे. म्हणून शेतमजुरांना राहत्या घरांसाठी त्यांच्या मालकीची जमीन उपलब्ध करून दिल्ली पाहिजे.

आजही आपल्या देशात अशी अनेक खेडेगावे आहेत, की जिथे आपण पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करू शकलेलो नाही. हा प्रश्न जितका व्यापक आहे, तितकाच अवघडही आहे. परंतु म्हणून तो टाळून चालणार नाही. केव्हा तरी प्रारंभ करायलाच हवा. म्हणून येत्या पाच वर्षांमध्ये आपण सर्व खेडेगावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करू शकू, असा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.

बेकारीचा प्रश्नही अतिशय तातडीचा झालेला आहे. खरे तर गरिबी आणि बेकारी हे आपल्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत मूलभूत प्रश्न आहेत. म्हणून त्यांचा एकत्रित विचार करायला हवा. बेकारी नाहीशी झाल्याशिवाय गरिबी दूर होणार नाही आणि गरिबीची समस्या सोडविल्याशिवाय बेकारांना रोजगार देता येणार नाही. दरवर्षी शाळा-महाविद्यालयांमधून हजारो विद्यार्थी बाहेर पडत आहेत. त्यांना रोजगार कोण देणार? या सुशिक्षित तरुणांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे जमले नाही, तर ही युवाशक्ती प्रक्षुब्ध होऊन देशाच्या स्थैर्याला आणि प्रगतीलराच आव्हान देईल. म्हणून बेकारीची समस्या सोडविण्यावाचून आपल्याला पर्यायच उरत नाही. उपाशी पोट आणि निष्क्रिय हात यांतून निर्माण होणारा असंतोष भयावह ठरतो. बेकारी आणि गरिबी यांच्या निर्मूलनाला आर्थिक धोरणात अग्रक्रम द्यायलाच हवा.

या संदर्भामध्ये आणखी एक प्रश्नाचा विचार होणेही आवश्यक आहे. देशातील कोट्यवधी लोक उपासमारीच्या छायेत निरंतर वावरत असताना काही थोड्या लोकांनी विलासी जीवन उपभोगत राहावे, ही खरोखर संतापजनक बाब आहे. एका बाजूस आपण माजी संस्थानिकांचे तनखे काढून घेत असताना हा नव-श्रीमंतांचा वर्ग उदयाला यावा, याला काय अर्थ आहे? श्रीमंत शेतकरी, कारखानदार अन् व्यापारी यांची राहणी जुन्या संस्थानिकांनाही मागे टाकेल, इतकी ऐशारामाची झालेली आहे. हे नवे राजेरजवाडे कसे निर्माण झाले? करपद्धतीमधील उणिवांचा गैरफायदा घेऊन त्यांनी आपले वैभव वाढविले. आपण सर्वसामान्य जनतेचे सेवक आहोत आणि या जनतेसारखेच आपलेही जीवनमान असले पाहिजे, याची या नव-श्रीमंतांना जाणीव करून देण्यासाठी आपण करविषयक आणि अन्य कायद्यांत दुरुस्ती केली पाहिजे. आपण आपल्या आर्थिक जीवनामधील ही बेसुमार विषमता जोपर्यंत नाहीशी करीत नाही, तोपर्यंत आपला समाजवादाचा जयघोष निरर्थक आहे.

समाजवादाचे तीन विशेष निकष असतात. पहिला हा, की सर्वांना विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. सगळेजण कायद्यासमोर समान आहेत, एवढे म्हणून भागत नाही. देशाच्या आर्थिक समृद्धीमध्ये हातभार लावण्याची आणि या समृद्धीचा उपभोग घेण्याची प्रत्येकाला खऱ्या अर्थाने समान संधी उपलब्ध झाली पाहिजे. जीवनमानांतील विषमता नाहीशी करणे हा समाजवादाचा दुसरा निकष आहे. जीवनमान म्हणजे केवळ आर्थिक जीवन नव्हे, सामाजिक जीवनही त्यात अंतर्भूत असते. उत्पादनाच्या प्रक्रियेतील शोषण थांबविणे, ही समाजवादाची तिसरी अट आहे. हे तिन्ही निकष आपापल्या परीने महत्त्वाचे असले, तरी आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करणे, हा समाजवादाचा गाभा म्हटला पाहिजे. म्हणून आपण येत्या पाच-दहा वर्षांमध्ये ही विषमता निपटून काढली पाहिजे. तरच आपली समाजवादाच्या दिशेने खरीखुरी वाटचाल चालू झालेली आहे असे म्हणता येईल.

मला येथे आणखी एक इशारा द्यावासा वाटतो. केवळ घोषणा करून समाजवाद अवतरत नसतो. तसे मानणे म्हणजे आत्मवंचना करण्यासारखे होईल. समाजवादाच्या मार्गावरील प्रवास प्रदीर्घ, कठीण आणि कष्टप्रद असतो. मात्र हा प्रवास आपल्याला केलाच पाहिजे. कारण तशी आपली प्रतिज्ञाच आहे. म्हणून केवळ आर्थिक प्रश्नांचा तात्त्विक विचार करून चालत नाही. तो विचार विशिष्ट कालावधीमध्ये प्रत्यक्षात उतरायला हवा. आज काय करायचे, उद्या काय करायचे, या वर्षातील उद्दिष्ट कोणते, पुढल्या वर्षी किती पल्ला गाठायचा, हे सगळे ठरले पाहिजे, आणि त्याप्रमाणे घडले पाहिजे. समाजवाद पुस्तकातून अवतरत नाही. कृती-कार्यक्रमातून त्याचा प्रत्यय येत असतो.

आपल्या घोषणा जेव्हा कृतीत येतील, तेव्हाच आपण आपल्या कर्तव्याला जागलो, असे होईल. आपला उच्चार आणि आचार यांत तफावत पडली, म्हणूनच काँग्रेसला १९६७ मध्ये अनेक राज्यांत पराभव पत्करावा लागला. कारण लोक म्हणतात, 'तुम्ही बोलता खूप, पण करता मात्र थोडे !' म्हणून यापुढे ही चूक घडता कामा नये, येत्या चार-पाच वर्षांत निश्चित काय करू शकू, याचे आपल्या मनाशी मोजमाप करूनच आपण लोकांना आश्वासन दिले पाहिजे. नाही तर लोकांची फसगत केल्याच्या पापाचे धनी आपण होऊ. म्हणूनच यापुढे आपला सारा भर वचनपूर्तीवर असला पाहिजे. ◆◆

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
# ‘यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०२०’
# लोकहितवादी मंडळ, नाशिक

## मानपत्र

२०२० चा राज्यस्तरीय पुरस्कार १९५० मध्ये कवी कुसुमाग्रजांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या लोकहितवादी मंडळ, नाशिक या संस्थेला देण्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने ठरविले आहे. एरवी नाशिकची प्रसिद्धी एक धार्मिक तीर्थक्षेत्र व दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे पवित्र ठिकाण अशी होती. स्वातंत्र्यपूर्व काळात नाशिक हे क्रांतिकारक चळवळीचे केंद्र होते. १९५० मध्ये नाशिकला कायमच्या वास्तव्यासाठी आलेल्या कुसुमाग्रजांनी नाशिकमध्ये मराठी साहित्य आणि कलाविचार यांच्या संवर्धनासाठी एक सांस्कृतिक संस्था स्थापन करण्याचे ठरविले. दिनांक २ सप्टेंबर १९५० रोजी अग्रणी समाजसुधारक व शतपत्रांचे कर्ते श्री. गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांच्या नावाने लोकहितवादी मंडळाचे उद्‌घाटन म.म. दत्तो वामन पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. तेव्हापासून प्रामुख्याने नाट्यसंगीत, चित्रकला, शिल्पकला व अन्य कला तसेच साहित्यविषयक घडामोडी व सामाजिक विचारसरणीचा पाठपुरावा करणारे कार्य मंडळ पार पाडत आहे.

१९५० च्या डिसेंबरमध्ये श्री. राम गणेश गडकरी यांचे ‘भावबंधन’ हे नाटक सादर करण्यात आले. कुसुमाग्रजांनी त्याचे दिग्दर्शन केले होते. गेली सात दशके नाट्यक्षेत्रामध्ये मंडळाने लक्षणीय कार्य केलेले आहे. राज्य नाट्य स्पर्धेत मंडळाला जवळ जवळ दरवर्षी पारितोषिक मिळाले आहे. हिंदी आणि संस्कृतमध्येही मंडळाने नाटके सादर केली असून बालनाट्य आणि कामगार स्पर्धांमध्येही भाग घेतलेला आहे. मंडळाच्या या कार्यातून अनेक कला दिग्दर्शकांना, नवोदित लेखकांना, संगीत दिग्दर्शकांना तसेच प्रकाश योजना, रंगभूषा आणि नेपथ्य या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आपली कला सादर करण्यास वाव मिळालेला आहे. २०१५ पासून मंडळाने नाटकाच्या अभिवाचन स्पर्धा घेतल्या आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे झाशी येथे किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या श्री गणेश मंदिरात जेथे झाशीच्या राणीचा साखरपुडा झाला होता अशा ऐतिहासिक ठिकाणी २०१२ मध्ये ‘वीज म्हणाली धरतीला’ या नाटकाचे अभिवाचन झाले.

विष्णू दिगंबर पलुसकर हे ख्यातनाम संगीत गुरू नाशिकला स्थायिक झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ शास्त्रीय, उपशास्त्रीय व नाट्यसंगीत स्पर्धा मंडळातर्फे आयोजित केल्या जातात. संगीताला उत्तेजन देण्यासाठी मंडळाने अखिल महाराष्ट्र संगीत स्पर्धांचे आयोजन १९६७ पासून केले आहे. अनेक नामवंत गायकांच्या मैफिली आयोजित केलेल्या आहेत. तसेच नोव्हेंबर १९९९ मध्ये तीन दिवस अखिल भारतीय स्तरावर संगीत शिक्षक अधिवेशन आणि संमेलनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संगीत क्षेत्राशी संबंधित इतर महत्त्वाचे कार्यक्रम, म्हणजे हार्मोनियम वादन, गीत स्वरलेखन कार्य शाळा, बासरी संवाद व ताल समर्पण संवाद असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

भारत सरकारने राष्ट्रीय सांस्कृतिक धोरण मसुदा तयार केला होता. त्यावर नाशिकला तीन दिवसांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळचे मराठी साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. य.दि. फडके यांच्या अध्यक्षतेखाली हा परिसंवाद झाला होता. त्याचे उद्‌घाटन ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक डॉ. शिवराम कारंथ यांनी केले होते. या परिसंवादामध्ये करण्यात आलेल्या मौलिक सूचना राज्य व केंद्र सरकारकडे पाठविण्यात आल्या.

# मानपत्र

साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक विषयांशी संबंधित प्रश्नांवर विचार मंथन व्हावे यासाठी महात्मा फुले यांच्या नावाने जिल्ह्यात ग्रामीण भागात व्याख्यानमाला सुरू करण्यात आली. कालांतराने अशी व्याख्याने मंडळाच्या स्थापना दिनाला आयेजित करण्यात येतात.

कविता या साहित्य प्रकाराला साहजिकच मंडळाने विशेष प्रोत्साहन दिले आहे. त्यासाठी काव्यानुभव समिती गठीत करण्यात आली असून त्यामध्ये नामवंत कवी तसेच नवोदित कवी व बालकवी यांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम केला जातो.

१९९६ मध्ये मंडळाने कला विभाग सुरू केला. त्याचा शुभारंभ ख्यातनाम चित्रकार व माजी कला संचालक, श्री. बाबुराव सडवेलकर यांच्या हस्ते झाला. कला विभागीय उपक्रमांमध्ये पावसाळी सहल, गुरूशिष्य संवाद आणि कलाविषयक कार्यशाळा यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. मंडळाने वार्षिक चित्रकला शिबिर दोन वेळा आयोजित केले होते.

१९९९ मध्ये पहिला राज्यस्तरीय कला मेळावा नाशिकला घेण्यात आला. लोकहितवादी मंडळाचे कार्य स्वतःच्या वास्तूमधून चालावे यासाठी नाशिक महानगरपालिकेने मंडळाला एक भूखंड काही अटींवर दिला. या वास्तूच्या उभारणीसाठी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मुख्यमंत्री निधीतून भरीव अर्थसाह्य केले होते. महात्मा फुले यांचे कार्य स्मरणात असावे म्हणून व वास्तूच्या रचनेत छपरावर कलशाचे शिल्प असल्याने कुसुमाग्रजांनी या वास्तूस 'ज्योतीकलश' हे नाव दिले. ज्योतीकलश उभा आहे त्या परिसराला 'विशाखा प्रांगण' हे नाव देण्यात आले. 'विशाखा' हा कुसुमाग्रजांचा प्रसिद्ध काव्यसंग्रह आहे हे लक्षात घेऊन नामकरण करण्यात आले आहे.

साहित्य क्षेत्रात ज्ञानपीठ पुरस्कार हा अतिशय सन्मानाचा पुरस्कार आहे. तो मराठीतील मोजक्याच साहित्यिकांना मिळाला आहे. कविवर्य कुसुमाग्रज यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा मंडळाने भव्य अभिनंदन सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी कुसुमाग्रजांच्या मनातील साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक जाणीवांना कायमस्वरूप देण्यासाठी 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' स्थापन करण्यात आले. प्रतिष्ठानच्या स्थापनेमध्ये मंडळाचे भरीव योगदान आहे.

कुसुमाग्रज हे मराठीतील नामांकित कवी व नाटककार आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कामगिरीप्रमाणेच समाजाविषयी सजग व क्रियाशील विचारवंत म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. विशेषतः मराठी भाषेचे संवर्धन व विकास यांचा ध्यास असलेले साहित्यिक म्हणून त्यांच्या जन्मदिवशी (२७ फेब्रुवारी) राज्य शासनातर्फे 'मराठी भाषा दिन' साजरा केला जातो.

नामवंत कवी व लेखकांचे स्वतःच्या एखाद्या कृतीशी अभिन्न नाते असते. उदा. केशवसुतांची 'तुतारी' ही कविता, राम गणेश गडकरी यांची 'क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा' ही कविता, भा.रा. तांबे यांची 'मधुघट' व वि.स. खांडेकरांची 'ययाति' यांचा उल्लेख करता येईल. याप्रमाणे कुसुमाग्रजांच्या अनेक कविता जनमानसात खोल रुजलेल्या आहेत – उदाहरणार्थ 'गर्जा जयजयकार,' 'वेडात मराठे वीर दौडले सात,' 'काढ सखे गळ्यातील चांदण्याचे हात.' ज्यावेळी कवीचे काव्य आणि सामान्य वाचकाच्या भावभावना यांच्या तारा एकाच गतीने झंकारतात तेव्हाच ही किमया घडते. नाटककार वि.वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट'मधील 'घर देता का घर' हे स्वगत असेच मराठी माणसाच्या मनात घर करून आहे.

एक साहित्यिक म्हणून कुसुमाग्रजांची अष्टपैलू कामगिरी लक्षात घेता व गेली सात दशके त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेचे बहुमोल कार्य लक्षात घेता या संस्थेला या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'ला विशेष आनंद होत आहे.

शरद पवार
अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विशास ठाकूर, संघटक निलेश राऊत पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, मनीषा खिल्लारे, महेश साळवी कार्यरत आहेत.

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कार जाहीर

कुलदीप आंबेकर व लतिका राजपूत सामाजिक पुरस्कार तर अक्षय राऊत व समृद्धी वामन क्रीडा पुरस्कार लवकरच मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण...

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक व क्रीडा पुरस्कार २०१९' ची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणाऱ्या युवकयुवतींना सामाजिक युवा पुरस्कार देण्यात येतो तसेच महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. सदरील पुरस्कारांचे वितरण नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक व प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येईल.

या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा पुरस्कार कुलदीप आंबेकर, भूम, जि. उस्मानाबाद (सध्या पुणे) (महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शहरात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मेस उपलब्ध करून देणे. तसेच त्यांना खासगी व शासकीय वसतिगृहात जागा मिळवून देणे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणात आर्थिक मदत करणे, तसेच शिक्षण घेत असताना गरजू व होतकरू विद्यार्थी-विद्यार्थिनींना अर्धवेळ नोकरी मिळवून देणे) व लतिका राजपूत, धडगाव, जि. नंदुरबार (आदिवासी भागात अतिदुर्गम ठिकाणी वसलेल्या नर्मदा जीवनशाळांचे २०१० पासून व्यवस्थापन व समन्वय, प्रकल्पग्रस्ताना पुनर्वसन व मदत) तर क्रीडा पुरस्कार युवक व युवती क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल अक्षय राऊत, अंबाजोगाई, ता. बीड (सध्या मुंबई) (बॅडमिंटन - राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये पारितोषिके) व समृद्धी वामन, सावेडी, अहमदनगर (धनुर्विद्या - राज्य व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये पारितोषिके) यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय सामाजिक युवा व क्रीडा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालीक स्पर्धा पुरस्कार जाहीर:

| अनु.क्रं. | कॉलेज | वार्षिक | अभिप्राय | अंकाविषयी |
|---|---|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर -वारणानगर, जि. कोल्हापूर -०२३२८-२२४०४१ | वारणा २०१७-२०१८ | प्रथम | वारणा- २०१७-१८ महिला प्राचार्य डॉ. सौ. सुरेखा शहापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध झालेल्या २८६ पानांच्या या भरगच्च अंकात विद्यार्थ्यांचे साहित्य आणि महाविद्यालयाचे उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने मांडले आहेत. साहित्यामध्ये विद्यार्थ्यांचाच सहभाग असून मराठी , हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांमध्ये विद्यार्थ्यांचे विविध विषयांवर आपली मत मंडळी आहेत. त्यामध्ये वैचारिक , सामाजिक आणि ललित साहित्याचा समावेश आहे . महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून प्रसिद्ध झालेल्या अंकाची भाषा , शुद्धलेखन कौतुकास्पद आहे. |
| २ | के.जे सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग आणि इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी, | Aura -2017 | द्वितीय | ऑरा २०१७ - मुंबईतील तंत्रमहाविद्यालयामध्ये आघाडीवर असलेल्या या महाविद्यालयाच्या अवतरणात ऑरा -२०१७ द व्हाय एक्सिस या नियतकालिकाची निर्मिती मूल्यं अतिशय उत्तम असून संपूर्ण अंकात विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व ठळकपणे जाणवते. महाविद्यालयाच्या प्राचार्य किंवा प्राध्यापकाने दिलेल्या विषयांऐवजी विद्यार्थ्यांनी स्वतःच विषय निश्चित करून लिखाण केले असल्याचे अंकात दिसते. मराठी , हिंदी , इंग्लिश आणि गुजराथी या चार भाषांत विद्यार्थ्यांनी आपले लिखाण केले आहे. |
| ३ | कमला नेहरू महाविद्यालय, आर्टस्,कॉमर्स आणि सायन्स , शक्करवाडा चौक, नागपूर ४४० ०२४ संपर्क- ०७१२-२७४७८५४ | स्त्रियांची आत्मचरित्रे २०१७ | तृतीय | स्त्रियांची आत्मचरित्रे २०१७- ' स्त्रियांची आत्मचरित्रे' या विषयावरती संपुर्ण अंक बांधलेला आहे मराठी आणि इंग्रजी या भाषांत प्रसिद्ध झालेले महिलांच्या आत्मचरित्रांवर विद्यार्थ्यांचे परीक्षण वजा परिचय दिले आहे. अंकाची मांडणी आणि निर्मिती मूल्यं उत्तम आहेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ-४२५२०, संपर्क- २४०६०६/२४०७४६ | तरंग | उत्तेजनार्थ पहिलं पारितोषिक | तरंग – 'तरंग ...बदलत्या भारताचे' असे सूत्र घेऊन सिद्ध केलेल्या या अंकामध्ये मराठी , हिंदी, आणि इंग्रजी अशा तीन भाषांचे स्वतंत्र तीन विभाग आहेत. महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची अनुक्रमणिका देऊन त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचा सविस्तर तपशील दिला आहे. अंकातील साहित्य पूर्णपणे विद्यार्थ्यांचे आहे. ते विद्यार्थ्यांच्या वयाला सुलभ अशाच भाषेत आणि विषयावर आहेत. |
| ५ | कन्नुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय, -४३१५०५, जि. परभणी -संपर्क- ०२४५१-२४०५३५ /९८६०११०१४२ | मानवता | उत्तेजनार्थ दुसरं पारितोषिक | मानवता – नेमकं संपादक आणि रेखीव रचना हे या अंकाचं वैशिष्ट्य आहे. जी.एस.टी. हा या अंकाचा विषय आहे. यावर्षी स्पर्धेसाठी आलेल्या नियतकालिकांपैकी निम्या नियतकालिकांमध्ये हा विषय माहितीपर हाताळण्यात आला आहे. मात्र 'मानवता' मध्ये जी.एस.टी .चा थेट बाजारपेठेवर काय परिणाम होणार आहे हे स्थानिक बाजारपेठेतील विविध व्यावसायिकांपर्यंत पोहोचवून विद्यार्थ्यांनी समजावून घेतले आहे. ते लेख आणि मुलाखतींच्या स्वरुपात छायाचित्रांसह मांडले आहे, हे विशेष |

## सुप्रसिद्ध कवी, समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील यांच्या मुलाखतीचे आयोजन

मुंबई दि. ६ : चंद्रकांत नागेशराव पाटील यांचा जन्म ०३ सप्टेंबर १९४४ रोजी अंबाजोगाई, बीड येथे झाला. ते मराठी कवी, अनुवादक आणि समीक्षक आहेत. महाराष्ट्रातील १९६० नंतरच्या पिढीला मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी लघुनियतकालिकांच्या चळवळीच्या माध्यमाद्वारे केलेले लेखन हे त्यांचे मराठी साहित्यातील महत्त्वाचे योगदान आहे. मराठी प्रमाणेच ते हिंदी भाषेतील नामवंत कवी आणि समीक्षक म्हणून परिचित आहेत. हिंदीतील अखिल भारतीय पातळीवरील महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा 'महाराष्ट्र भारती' हा सर्वोच्च पुरस्कार त्यांना २०१२ साली देण्यात आला आहे. मध्य प्रदेश शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने देण्यात येणारा 'राष्ट्रीय हिंदी सन्मान' हा पुरस्कार त्यांना १४ सप्टेंबर २०१९ रोजी प्रदान करण्यात आला आहे.

मराठी आणि हिंदी अशा दोन भाषांमध्ये त्यांची कविता प्रकाशित झाली आहे. भीष्म सहानी यांची 'तमस' ही कादंबरी, चंद्रकांत देवताले, पाश इत्यादी नामवंत कवींचे मराठी अनुवाद, मराठी कवितांचे हिंदी अनुवाद, परदेशातील कवींच्या निवडक कवितांचे मराठी अनुवाद, मराठी आणि हिंदी भाषेत लिहिलेली साहित्य समीक्षा, वर्तमानपत्रांतून स्तंभ लेखन अशा माध्यमांतून ते व्यक्त होत असतात. हिंदी आणि मराठी भाषेत चंद्रकांत पाटील यांची आजवर ५० पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे डॉ. चंद्रकांत पाटील यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यांची ही मुलाखत ज्येष्ठ पत्रकार, लेखक आणि अभ्यासक सुनील तांबे यांनी घेतली.

या मुलाखतीत कविता, संमेलने, अनुवाद, वाचनीयता, साहित्य व्यवहार या अनुषंगाने डॉ. चंद्रकांत पाटील यांच्याशी संवाद साधण्यात आला. त्यांनी त्यांच्या साहित्याबद्दलचा, त्यांच्या लेखनाबद्दलचा, त्यांनी केलेल्या लेखनाचा, अनुभवांचा उलगडा केला.

आयुष्यातल्या गुंतागुंतीच्या अनुभवांचं प्रभावी शब्दांकन करणं आणि कमीत कमी शब्दांत शब्दांकन करणं आणि त्याच्या आधारे एक सृष्टी निर्माण करणं, एक जग निर्माण करण हीच माझी कवितेबद्दलची भूमिका आहे, असं संक्षिप्त मत त्यांनी व्यक्त केलं.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे, कवी वसंत गुर्जर, श्याम मनोहर, रामदासजी भटकळ, राम दुतोंडे आदि मान्यवर उपस्थित होते.

## स्व-संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा

आजकाल महिलांसोबत नेहमीच छेडछाडीचे प्रकार घडत

असतात. अशा प्रसंगी महिलांनी सक्षम राहावे, यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान तर्फे १३ फेब्रुवारी २०२० रोजी स्व-संरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वरूप आणि उद्देश यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ यांनी सांगितला. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनिषा खिल्लारे यांनी केले. उषादेवी पांडुरंग हायस्कुल, कुलाबा चे मुख्याध्यापक, सुरेश धनावडे, शिक्षक राजाराम भोसले, Combat Tactical Systems CTS चे भूषण चव्हाण यांनी उपस्थित महिलांना प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या कार्यालयातील मिनल सावंत आणि मनिषा खिल्लारे आदि उपस्थित होते.

## विज्ञानगंगा व्याख्यानमाला

### महाराष्ट्रातील दुष्काळ

विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील ४७ वे पुष्प अतुल देऊळगावकर यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२० रोजी गुंफले. त्यांचा विषय होता महाराष्ट्रातील दुष्काळ.

दुष्काळ दोन प्रकारचा असतो. एक कोरडा दुष्काळ आणि दुसरा ओला दुष्काळ. मराठवाड्यात यंदा जून ते सप्टेंबर या काळात कोरडा दुष्काळ अनुभवला तर ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यात पडलेल्या प्रचंड पावसाने ओला दुष्काळ अनुभवला. दोन्ही प्रकारच्या दुष्काळात शेतीचे नुकसान होते. कोरड्या दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्याचे हाल होतात आणि लोक आपापली गावं सोडून पुण्या-मुंबईकडे धाव घेतात. ओल्या दुष्काळात शेतीबरोबर घरांचेही नुकसान होते. गेल्या काही वर्षात आपण अनुभवत असलेला हवामान बदल जगभर असून त्याचा सगळ्यात मोठा धोका आता मानवतेला आहे. हा धोका ओळखून स्वीडनची ग्रेटा थनबर्ग ही ११ वर्षाची मुलगी सातवीत असताना स्विडीश संसदेबाहेर हातात फलक घेऊन एकटीच बसली होती. दुसऱ्या दिवशी तिला ५० लोकांनी साथ दिली. नंतर १००० माणसे झाली. आता मात्र तिला जवळच्या दोन देशातील मिळून दीड कोटी लोकांचा पाठिंबा मिळाला आहे. जगातली ती सर्वात लोकप्रिय व्यक्ती आहे अशी तिच्यावर 'टाइम मासिकाने' मुखपृष्ठ कथा केली आहे. भारतीय माणूस दरवर्षी दीड टन कार्बन उत्सर्जन करतो, अमेरिकन माणूस १५ टन करतो आणि स्वतःचे विमान वापरणारा बिल गेट्स २५०० टन उत्सर्जन करतो. तिने आता Friday for Future अशी घोषणा दिली आहे.

जगात सगळीकडे तापमान वाढत आहे. काल (१७ फेब्रुवारी, २०२० रोजी) मुंबईत ३८ अंश सेंटीग्रेड तापमान होते. उन्हाळ्यात लातूरला ४७ अंश असते, राजस्थानात ५० अंशापर्यंत तापमान जाते. जगात अन्यत्र ५४ पर्यंत जाते. आणि आता पुढील दशकात ही वाटचाल ६० अंशाकडे जाईल असे दिसते. आपण हवामानाच्या आणीबाणीत आहोत. आपण रोज ५५० लिटर शुद्ध ऑक्सिजन घेतो, म्हणजे ३ सिलेंडर. जगाला आता धोका बॉम्बचा नसून हवामानाचा आहे. आता १२ ला फक्त १०० सेकंद बाकी आहेत, एवढा तो धोका जवळ आला आहे. त्यातल्या त्यात या हवामानाचा धोका किनाऱ्यानजीक जास्त आहे. फिनलँड, फिजी, बांगला देश इत्यादी बेटे बुडून जाणार आहेत.

लहान मुलेसुद्धा पर्यावरण जागृतीत मदत करू शकतात. २००० साली, अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना, ८-९वीतील मुलांनी संसदेबाहेर निदर्शने करून शुद्ध हवेचा अधिकार आम्हालाही आहे असे फलक हातात घेतले होते. ते पाहून सरकारने दिल्लीतील डिझेलवर चालणारी वाहने बंद करून ती इंधन वायूवर सुरू केली. आता कमीतकमी वेळात जास्त पाऊस येणारे पाऊस वाढले आहेत. २०४० साली ध्रुवांवर बर्फ असणार नाही. २६% सागराचे आम्लीकरण होईल, ७०० ठिकाणचा ऑक्सिजन नष्ट होईल, २१०० साली प्रवाळाचा अंत होईल. सध्याच जीवसृष्टीतील १० लक्ष प्रजाती नष्ट झाल्या आहेत. सूक्ष्मजीव नष्ट झाले की रोगप्रसार होतो. ऑस्ट्रेलियात गेल्या महिन्यात १० कोटी प्राणी आगीत नष्ट झाले.

वनखात्यात काम करणाऱ्या भागवतराव धोंडे यांनी डोंगरावर पडणारे पावसाचे पाणी डोंगरातच मुरावे म्हणून समतल चर खणल्याने डोंगर हिरवेगार झाले. त्यांनी लाखो झाडे जगवली.

एक लिटर दूध मिळवायला १००० लिटर पाणी लागते. शास्त्रज्ञांपुढे १००० लिटरऐवजी ते कमी पाणी वापरून एक लिटर दूध कसे मिळवता येईल हे आव्हान आहे. कोरड्या मातीत मका काढण्याचे प्रयोग जेनिफर थॉमसन या बाईंनी यशस्वी करून दाखवले. आता काही ठिकाणी गारपिटीचे रूपांतर तोफा मारून पाण्यात केले जात आहे. International Centre for Climate Change अशी संस्था ढाक्यात आहे. तशा संस्था आपल्याकडे हव्यात. १९९५ पासून आतापर्यंत ७५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या आत्महत्या मुलीच्या लग्नापायी किंवा शिक्षणाच्या खर्चापायी होतात. आणि आता दररोज २००० शेतकरी देशात शेती सोडत आहेत. ही धोक्याची घंटा आहे.

## आपली प्रयोगशाळा

डॉ. मानसी राजाध्यक्ष यांनी विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील ४९ वे पुष्प शुक्रवार दिनांक १९ जून, २०२० रोजी 'आपली प्रयोगशाळा' या विषयावर सप्रयोग गुंफले.

कोरोनाच्या महामारीमुळे, मार्च, २०२० च्या मध्यापासून गेले तीन महिने सर्व लोक घरी बसून आहेत. मोठ्या लोकांचे ठीक आहे, पण शालेय विद्यार्थ्यांना घरी डांबून ठेवणे दिवसेंदिवस अवघड होत चालले असल्याने विज्ञान शिक्षणात गेली ३० वर्षे काम करणाऱ्या श्रीमती राजाध्यक्ष यांनी आपल्या घरी उपलब्ध असलेल्या साधनांचा उपयोग करून विज्ञान शिक्षणास उपयोगी पडणारी निरीक्षणे कशी करावीत, प्रयोग कसे करावेत याचे सप्रात्यक्षिक भाषण दिले.

कोबीचे पान आणि अळूचे पान एखाद्या पातळ पिशवीत घालून हाताने ती चापसून ओळखता येतात का, या पद्धतीने आपल्या पंचेन्द्रियांपैकी डोळे सोडून इतर पंचेंद्रियांचा उपयोग कसा करावा याची अनेक उदाहरणे दिली. उदाहरणार्थ, बटाटा आणि सफरचंद यांच्या साली काढून त्या दोन्ही गोष्टी आपल्यापुढे ठेवल्या तर डोळ्यांनी नुसते पाहून कोणता बटाटा आणि कोणते सफरचंद हे ओळखणे अवघड आहे. मग नाकाने वास घेतला तर सफरचंदाचा वास वेगळा जाणवतो. शहरातल्या मुलांना दूध गाय-म्हैस देते हे सांगावे लागते कारण त्यांच्या घरी दूध प्लास्टिकच्या पिशवीतून येते. कणिक ही गव्हापासून बनवतात हे मुलांना ठाऊक नाही, कारण घरी गहू येतच नाहीत, येते ती कणिक अथवा आटा. मिरची हे फळ आहे हे सांगावे लागते कारण त्यामध्ये बिया असतात. शाळेत दहावीत लंबक शिकवतात. तो लंबक घरी दोरीला दगड अथवा घरातील एखादी वस्तू टांगून ठेवून ती हलवल्यावर त्याचा लंबक बनतो. मग जड वस्तू अथवा हलकी वस्तू बांधून काही फरक पडतो का, दोरी लांब बांधून अथवा आखूड बांधून लंबकाच्या आंदोलनात काही फरक पडतो का याची निरीक्षणे करता येतात.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना भावे नावाचे शिक्षक होते. त्यांनी हातात एक बहिर्गोल भिंग घेऊन मुलांना मैदानावर नेले. ते भिंग उन्हात धरून त्याखाली धरलेला कागद जळल्यावर ते म्हणाले, अशी ऊर्जा एकवटली तर आपण कोणतेही काम करू शकतो. मग हे बहिर्गोल भिंग घरी बनवायचे असेल तर स्वच्छ पांढऱ्या व त्यावर कोणतेही डिझाईन नसलेल्या बाटलीत पाणी भरून त्याच्यासमोर धरलेल्या कागदावरील अक्षरे मोठी दिसतात, म्हणजे पाणी भरलेली बाटली बहिर्गोल भिंगाचे काम करते. घरातील हॅन्गरचा तराजू बनवता येतो हे त्यांनी सचित्र दाखवले. वस्तू अडकवायला कपडे वाळत घालायचे चिमटे वापरायचे आणि एका बाजूला वजन म्हणून बटाटे वापरायचे इत्यादी. घरात येणाऱ्या पालेभाज्यांचे रस काढून ते एकमेकात मिसळून रंग कसे बदलतात ते पाहता येते. शेवटी मंदबुद्धी मुलांसाठी काही वेगळ्या खेळांची पुस्तके आहेत का? अरविंद गुप्तांच्या खेळात काय काय असते? असे दहा-बारा प्रश्न विचारले गेले.

या कार्यक्रमाला 'झूम'वर औरंगाबाद, सातारा, नांदेड, यवतमाळ, नागपूर, मुंबई, पुणे अशा ठिकाणचे १०० जण जोडले गेले होते, तर फेसबुकच्या माध्यमातून ३४ लोक होते.

## चंद्रयान - २

फेसबुक आणि झूमच्या माध्यमातून विज्ञानगंगा व्याख्यानमालेत श्री. पराग महाजनी यांनी चंद्रयान - २ या विषयावर १५ मे, २०२० रोजी दिलेल्या भाषणाचा सारांश खालीलप्रमाणे आहे. या भाषणाला ७० श्रोते उपस्थित होते.

कोरोना महामारीमुळे विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील मार्च आणि एप्रिल, २०२० ची दोन भाषणे होऊ शकली नव्हती, पण मे महिन्याचे भाषण झूम आणि फेसबुकच्या माध्यमातून शुक्रवार दिनांक १५ मे, २०२० रोजी संधाकाली ५ वाजता झाले. वक्ते श्री. पराग महाजनी म्हणाले, ५ सप्टेंबर, २०१९ च्या रात्री चंद्रयान-२ चंद्रावर उतरणार होते, पण, शेवटच्या क्षणी ते चंद्रावर पोहोचू शकले नाही. या चंद्रयानानंतर भारत चंद्रयान-३, मंगळयान, गगनयान, आपले अंतराळ स्थानक अशा मोहिमा करणार आहे. हे का करायचे तर त्यामुळे आपली वैज्ञानिक प्रगती होत असते. चंद्रयान पृथ्वीच्या कक्षेतून जेव्हा चंद्राच्या कक्षेपाशी जाते तेव्हा कक्षा लंबवर्तुळाकार होते आणि ते चंद्राच्या अधिक जवळ जाते तेव्हा चंद्राचे गुरुत्त्वाकर्षण यानाला खेचून घेते. यानाचा वेग कमी होतो. ऑर्बिटर चंद्रावर कुठे उतरणार ते जरी अगोदर ठरले असले तरी यान चंद्राजवळ जाताच आतील रडार मॅपिंग करते. हे मॅपिंग झाल्यावर मग विक्रम लँडर चंद्रावर उतरणार होते. या लँडरमधील रोव्हर म्हणजे बग्गी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरून तेथे पाणी आहे का, असेल तर ते कुठे आहे, तेथील माती कशी आहे, त्याचे नमुने गोळा करणे अशी कामे या बग्गीला करायची होती. चंद्रयानाची संपूर्ण घडण देशी होती. यातील क्रायोजेनिक इंजिनातील नोझलच्या एका बाजूला -२२० अंश सेल्सियस तापमान तर दुसऱ्या बाजूला १००० अंश सेल्सियस तापमान द्रवरूप ऑक्सिजन आणि द्रवरूप हायड्रोजनच्या इंधनामुळे निर्माण होते. त्या तापमानाला टिकणारा

धातू बनवून नोझल बनवणे हे मोठे आव्हान होते आणि त्याचा उपयोग आपण क्रायोजेनिक इंजिनानंतर क्षेपणास्त्रे बनवण्यासाठी करू अशा भीतीने ते तंत्रज्ञान आपल्याला नाकारले गेले होते. पण, आपले शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ त्याला पुरून उरले आणि आपण ते बनवले. विक्रम लँडरमध्ये अनेक कॅमेरे ठेवलेले होते. प्रत्येक कॅमेऱ्याला वेगवेगळे काम दिले होते. कॅमेऱ्यशिवाय येथे एक स्पेक्ट्रोमीटर ठेवला होता. त्याच्या मदतीने तेथे गोळा केलेल्या मातीचे तिथल्या तिथे पृथ:करण करून त्या मातीत सोने, चांदी, लोखंड असे कोणकोणते धातू आहेत ते शोधून काढण्याचे काम होते. चंद्राच्या दक्षिण गोलार्धात आपण उतरणार होतो. तो भाग भूकंपप्रवण आहे, त्याची कारणेही शोधायची होती. याचे कारण आपल्याला तेथे इमारती बांधण्यासाठी काय काय अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थिती आहे, ते शोधायचे होते.

हे रोव्हर चंद्रावरून फिरत असताना तेथील भूभाग हा काही हायवे नसल्याने वाटेत दगड-धोंडे, वाळूचा रस्ता, खड्डे अशा गोष्टी असणार आणि तरीही रोव्हर संथ गतीने पुढे जात राहिले पाहिजे अशी त्याची रचना केली होती. यान चंद्राजवळ पोहोचताना त्याचा वेग हळूहळू कमी करत न्यायचा होता. त्यासाठी एक विशिष्ट कोन साधून यान उतरावे लागते. तो कोन जमला नाही तर पृष्ठभागाला धडक बसून प्रचंड उष्णता निर्माण होते आणि यान जळून जाऊ शकते. कल्पना चावलाचे यान अशाच अपघाताला बळी पडले होते. वेग सावकाश सावकाश कमी न करता एकदम कमी केला तर यान उलटते आणि आपल्याबाबतीत नेमके असेच घडून यानाचे २२ तुकडे झाले. यान उलटे झाल्याने आतले कॅमेरे उलटे झाले व भिंग आकाशाकडे वळले आणि चंद्रभूमी अजून दूर आहे असा संदेश संगणकाला मिळून संगणकाने यानाचा वेग वाढवण्याच्या दिलेल्या सूचनेमुळे यानाची धडक पृष्ठभागाला बसली. अशा चुका करणारा केवळ आपलाच देश नाही. नासाने अशा चुका अनेकवेळा केल्या आहेत. मात्र नासा ही सगळी माहिती लोकांना उपलब्ध करून देत असल्याने आपल्याला समजते. आपल्याकडे अशी माहिती देत नाहीत. ५ सप्टेंबर, २०१९ ला यान आपटून २२ तुकडे झाल्यावर बंगलोरचा हौशी खगोल निरीक्षक सुब्रमण्यम याने रोव्हर नेमके कुठे पडले याचा शोध घेतला. त्याला एक तुकडा दिसल्याचे त्याने नासाला कळवले. त्याचे नासाने ताबडतोब अभिनंदन केले. नासाबरोबर त्याने इस्रोलाही कळवले, पण इस्रोकडून मात्र उत्तर आले नाही. सुब्रमण्यमने एक तुकडा शोधून काढल्यावर नासाच्या कॅमेऱ्याने उरलेले २१ तुकडे शोधून काढले आणि त्यांच्या वेबसाईटवर प्रकाशित केले आणि याचे श्रेय नासाने सुब्रमण्यमला दिले. चंद्रयान-२ जरी अयशस्वी झाले असले तरी चंद्रयान-३ लवकरच चंद्रावर जाईल.

१९५९ पासून चंद्रावर अनेक याने गेली. यात रशिया आणि अमेरिकेचा पुढाकार होता. चीनने २००७ मध्ये त्यांचे यान पाठवले तर भारताने २००८ मध्ये पाठवले. भारताला या मोहिमांमधून खालील उद्दिष्टे साध्य करायची आहेत.

१. चंद्रावर मोठमोठ्या दुर्बिणी उभ्या करून चंद्रावर कुठे कुठे पाणी आहे ते शोधायचे आहे.

२. चंद्राच्या पृष्ठभागावर खूप धातू आहेत. ते शोधायचे आहेत,

३. पृथ्वी आणि चंद्राचे नाते शोधायचे आहे.

४. चंद्रावर वातावरण नसल्याने पृथ्वीची जशी सतत धूप होते, तशी तेथे होत नसल्याने पृथ्वीची निर्मिती कशी झाली ते समजेल.

५. चंद्राची भूमी इमारती उभ्या करण्यासाठी सक्षम आहेत का ते पहायचे आहे. कारण दुर्बिणी उभ्या करायला इमारती उभ्या कराव्या लागतील.

भाषणानंतर श्री. महाजनी यांनी श्रोत्यांनी विचारलेल्या १५ प्रश्नांना उत्तरे दिली.

## कोरोनाकाळातील मन:स्वास्थ्य

'कोरोनाकाळातील मन:स्वास्थ्य' या विषयावरचे विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील पन्नासावे पुष्प ठाण्यातील प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी यांनी शुक्रवार दिनांक १७ जुलै, २०२० रोजी संध्याकाळी ५ वाजता झूम ॲपवरून गुंफले.

२००१ साली अमेरिकेतील वर्ड ट्रेड सेंटरवर जो हल्ला झाला, त्यानंतर जेव्हा शाळा सुरू झाल्या तेव्हा शाळाचालकांनी मनोविकारतज्ज्ञांना शाळांत बोलावून मुलांची मन:स्थिती प्रथम ठीक केली हे उदाहरण देऊन डॉ.नाडकर्णी म्हणाले, तो एक वेळेला बसलेला धक्का होता. पण, आता कोरोना काळात चार महिने झाले तरी परिस्थिती सुधारत नाही. यातील धोका दोन प्रकारचा आहे. १) जीवशास्त्रीय आणि २) मनोसामाजिक (सायकोसोशल). कोरोनात ही दोन्ही आव्हाने आहेत. त्यामुळे मनाचा गोंधळ होतो. एखादा धोका केवळ जीवशास्त्रीय असेल तर आपण त्यावर पटकन प्रतिक्रिया देतो. उदा.टी.व्ही. वर कोरोनाचे आकडे आपण रोज ऐकतो, आपल्या बाजूला कोठे कोरोनामुळे कोणी आजारी पडला तर आपण 'अरे बापरे' म्हणतो. पण मनोसामाजिकमध्ये आपण प्रतिक्रिया (रिॲक्शन) देत नाही तर प्रतिसाद (रिस्पॉन्स) देतो. प्रतिक्रिया ताबडतोब येते; प्रतिसाद हा विचारपूर्वक दिलेला असतो. तो

लगेच दिलेला नसतो तर काही काळाने दिलेला असतो. साथ संपली तरी परिणाम संपत नाही. रिॲक्शन इम्पल्सिव्ह असते. टाळेबंदीची खरोखरी गरज होती का, असे लोक विचारतात.

प्रतिक्रिया दोन टोकाच्या असतात. 'बापरे, आता सगळ्याची वाट लागेल, जगाचे कसे होणार?' किंवा 'माझी रोगप्रतिकारशक्ती चांगली आहे, मला काही होणार नाही.' हा या प्रतिक्रियेचाच भाग आहे. ज्या विचाराने आपली धडधड होते, त्यामुळे प्रतिक्रिया उमटते. जास्त काही करू नका अथवा अजिबात काही करू नका, हे प्रतिक्रियेचेच प्रकार आहेत. म्हणून प्रतिक्रियेपासून आपण प्रतिसादापर्यंत जायला हवे. कारण प्रतिसादात उपायांचे बरेच विकल्प समोर येतात व आपल्याला त्याची निवड करता येते, ते केव्हा आणि कसे अमलात आणायचे याचे नियोजन करता येते. म्हणून त्यासाठी खालील सहा पायऱ्या महत्त्वाच्या आहेत.

१. **शक्यता आणि खात्री** : प्रत्येक गोष्टीकडे शक्यता म्हणून पाहा, खात्री म्हणून पाहू नका. कारण शक्यता ४-५ असतात. खात्री एकच असते. आदी मानवासमोर एखादे श्वापद आल्यावर तीनच गोष्टी त्याला करता येण्यासारख्या होत्या. त्या म्हणजे फाईट, फ्लाय, फ्रीज. म्हणजे त्या श्वापदाशी दोन हात करा, नाहीतर पळून जा, नाहीतर थिजून उभे रहा. याला आदिम भावना म्हणतात. समजा यातून माणूस जिंकला तर त्याचा विजय साजरा करताना तो जोरात ओरडतो, अथवा उडी मारतो अथवा नाचतो, हा उन्माद झाला. ही सुद्धा एक भावना झाली. आणि चूक झाली तर अपराधी वाटते. आपराध ही देखील एक भावनाच आहे. माणसात विचाराची बुद्धी ही नंतर विकसित झाली. त्यामुळे पॉसिबिलिटीमधून प्रॉबॅबिलिटी शोधा.

२. **नियंत्रणातील अथवा नियंत्रणाबाहेरचे घटक** : सध्या कोरोनावर लस नाही आणि औषधही नाही, तेव्हा हे घटक आज आपल्या नियंत्रणाबाहेरचे आहेत. उद्या त्या गोष्टी उपलब्ध झाल्यावर परिस्थिती बदलेल.

३. **परिणाम आणि पर्याय** : आपल्याला सत्य आणि सद्य परिस्थितीचा विचार करून, परिणामांचे पर्याय शोधावे लागतात. म्हणजे येथे कॅलक्युलेटेड रिस्क आली. परिणाम हळूहळू लक्षात येतात तसे पर्यायही बदलावे लागतात. तुम्हाला दोन तासच काम करायचे असेल तर चार गट बनवून गर्दीचे चार भाग करता येतात. पण जर २४ तास उपलब्ध असतील, तर कार्यकर्त्यांचे चार गट करून तीन पाळ्यात काम करता येते आणि चौथा गट उरलेल्या तीन गटांना सुट्ट्या देत राहातो. अशावेळी जे जे मदत करू शकतात, त्यांच्याकडून मदत घेत राहावी.

४. **लवचिकता आणि निर्धार** : आपण लव्हाळ्यासारखे लवचिक राहायला हवे. लव्हाळे लवचिक कसे राहू शकते, कारण जमिनीतील त्याचे मूळ घट्ट असते. म्हणून लवचिकतेबरोबर निर्धारही हवा.

५. **उद्दिष्टे आणि प्राथमिकता** : उद्दिष्टे खूप असतात; पण योग्य वेळी योग्य गोष्टच करायला हवी. अग्रक्रम कशाला द्यायचा हे ठरवता आले पाहिजे. एखाद्या अपघातात १० माणसे मेली आणि १० जखमी झाली तर जखमी लोकांकडे लक्ष देऊन त्यांच्या उपचाराला अग्रक्रम दिला पाहिजे. जर असे निर्णय घेताना लवचिकता दाखवली नाही तर तक्रारखोरपणा येतो.

६. **समस्या आणि निर्णय** : समस्या खूप असतात, पण लक्ष कुठे केंद्रित करायचे ते महत्त्वाचे असते. त्यात दुसऱ्याला दोष देत बसू नका. माझे त्यावेळी ग्रह ठीक नव्हते, असा ठपका ठेवण्यात ताकद खर्च करू नका, पर्यायासाठी शक्ती खर्च करा. उद्दिष्ट परिपूर्तीवर लक्ष ठेवा. व्यक्तीवर नको.

या सहा जोड्या लक्षात ठेवल्या तर आपण प्रतिक्रियेवरून प्रतिसादावर जाऊ. विचारी मेंदूला वाव द्या; तर आदिम भावनांचे नियोजन होईल. प्रतिक्रियेत काळजी वाटते तर प्रतिसादात आपण काळजी घेऊ लागतो. दुःखाचे लेबलिंग झाले की आपण आदिम भावनांकडे जाऊ लागतो, पण दुःखावर पर्याय काढावा. सध्या बाहेरचे लोक भेटत नाहीत तर घरातल्या लोकांबरोबर गप्पा मारा, चर्चा करा. मस्त राहा, पण उद्ध्वस्त होऊ नका. संताप होईल तिथून विचारपूर्वक काम केले तर चिडचिड होईल.

स्वत:ची काळजी घेऊन झाल्यावर दुसऱ्यांची चौकशी करा. त्यातून आस्था निर्माण होईल. समोरच्या माणसाला त्याचे प्रश्न सोडवायला मदत करा. मात्र त्यात वाहवून जाऊ नका. एम्पथी, कम्पेशन, करुणा हा मार्ग पत्करा. छोट्या छोट्या गोष्टींनी सुरुवात करा. तीन महिने घरगडी आला नाही तरी त्याला त्याचा पगार द्या. ही एम्पथी. मात्र ते कोणाला सांगू नका. तर ती प्रौढी होईल. भूपृष्ठावरचे पाणी जमिनीत मुरू द्या. मी कविता करतो. त्या मी फेसबुकवर-इंस्टाग्रामावर टाकतो. त्या लोकांना आवडतात, त्यांचे दुःख कमी होते. ते तसे मला कळवतात. त्याने लोकांना धीर मिळतो.

तिसरा सेट आहे प्रोसेस सॅटिस्फॅक्शनचा. म्हणजे तुम्ही जे काही कराल त्यातून तुम्हाला आनंद मिळाला पाहिजे. सध्या मी घरी स्वयंपाक तर करतोच, पण भांडीही घासतो. भांडी घासण्यात एक लय आहे. त्यात खूप मज्जा आहे. अशी मज्जा शोधत रहा.

चौथा सेट आहे. रेझिलीयन्स म्हणजे तितीक्षा. ठरवून केलेली गोष्ट. कमिटेड ॲक्शन. योग्य भावना. बंच ऑफ इमोशन. यात माणूस भरवशाने म्हणतो, 'आय कॅन स्टॅन्ड इट'. ही सुद्धा आदिम भावना आहे. मी हे सहन करू शकत नाही याच्या उलट मी हे सहन करू शकतो. मी सहन करू शकतो यात रेझिलीयन्स आहे. यात एक प्रकारचे धैर्य आहे. साहस आहे. स्वयंशिस्त आहे. यात सगळ्या भावना एकत्र येतात.

महाभारतात अर्जुन हा तणावाखाली आहे, तर या कोरोनाच्या काळात आपण कधी अर्जुन आहोत तर कधी श्रीकृष्ण आहोत. म्हणजे आपल्यावर ताण आला, की आपण अर्जुन आहोत; तर आपण इतरांना धीर देताना श्रीकृष्ण आहोत. एकाच वेळी समाजात संघटन आणि विघटन असते. पण आपण समाजात वावरतो ते एकमेकांची मदत घेत घेत. म्हणजे त्यात इंटर डिपेंडंस असतो. तो नेहमीच असणार. त्यामुळे अचूकतेचा- परफेक्शनचा ध्यास सोडा. पण अत्युत्तमाचा- एक्सलन्सचा ध्यास जरूर ठेवा. आपल्या नियंत्रणावर अवलंबून असणाऱ्या गोष्टींचा पाठपुरावा करा.

शेवटी इंग्लंडच्या प्रा. सतीश देसाई यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे डॉ.आनंद नाडकर्णी यांनी दिली.

झूमवरून ८८ लोकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

## चित्रपट क्षेत्रातील तंत्रज्ञान

शुक्रवार दिनांक १४ ऑगस्ट, २०२० रोजी विज्ञानगंगा व्याख्यानमालेतील ५१ वे पुष्प श्री. उज्ज्वल निरगुडकर यांनी 'चित्रपट क्षेत्रातील तंत्रज्ञान' या विषयावर गुंफले. हे भाषण झूम माध्यमावरून झाले. यासाठी ८१ लोकांनी नोंदणी केली होती. श्री. निरगुडकर यांनी अमेरिकेचे पेटंट मिळवले असून ते ऑस्कर अकादमीच्या तांत्रिक विभागाचे सदस्य आहेत.

१८८५ साली जगातला पहिला सिनेमा पॅरिस येथील एका हॉटेलात दाखवला गेला. मुंबईत जहांगीर आर्ट गॅलरी समोरील वॉट्सन इमारतीत पहिला सिनेमा १८९६ साली दाखवला. तिकीट होते, एक रुपया. आणि संध्याकाळी ७ ते ११ पर्यंत एकेक तासाच्या अंतराने चार खेळ आयोजित केले जायचे. तेव्हाचा एक रुपया तिकीट दर म्हणजे आजचे एक हजार रुपये, पण तरीही लोक जायचे. रंगीत चित्रपट सुरू झाले ते इस्टमन कलरमध्ये. इस्टमन हा काही रंग नसून ते त्या संशोधकाचे नाव आहे. अमेरिकेतील वूस्टव्हेल्ट हॉटेलात पहिला ऑस्कर पुरस्कार वितरण सोहळा झाला. हॉलीवूडजवळील रेल्वे स्टेशनाचा आकार एखाद्या सिनेमा थिएटरसारखा बनवला आहे. भारतात दादासाहेब फाळके यांनी १९१३ साली सिनेमा बनवला. गोरेगावची चित्रनगरी त्यांच्याच नावाने आहे. प्रभात फिल्म कंपनीने चित्रपट बनवले. 'अयोध्येचा राजा' हा मराठीतला पहिला बोलपट. तोवर मूकपट होते. तर 'आलम आरा' हा हिंदीतला पहिला बोलपट.

अंबालाल पटेल यांनी १९५२ साली भारतात फिल्म प्रोसेसिंग सुरू केले. तत्पूर्वी फिल्म प्रोसेसिंग इंग्लंडमधून करून घेतले जाई. निरगुडकर १९८१ सालापासून अंबालाल पटेल यांनी सुरू केलेल्या फिल्म प्रोसेसिंग ऑफिसातच गेली ३९ वर्षे काम करत आहेत. आयमॅक्स कंपनी ३५ आणि ७० मिलिमीटरच्या फिल्म्स बनवतात. फिल्मचा कच्चा माल वाचवायचा तर त्याला दोन किंवा तीन भोकेच (पर्फोरेशन्स) ठेवतात. अशा तीन पर्फोरेशन्सच्या फिल्ममध्ये 'मी शिवाजीराजे बोलतोय' ही फिल्म बनवली आहे तर दोन पर्फोरेशन्स असलेल्या फिल्ममध्ये 'टायटॅनिक' सिनेमा बनवला आहे. दोन पर्फोरेशन्सची फिल्म वापरली तर ५० टक्के फिल्म वाचते तर तीन पर्फोरेशन्सची फिल्म वापरली तर ३३ टक्के फिल्म वाचते. वडाळ्याच्या आयमॅक्स थिएटरचा डोम जगातला मोठा डोम आहे. जर ७० मिमीची फिल्म वापरली तर चित्र अधिक स्पष्ट उमटते. सुपर १६ फिल्ममध्ये एकाच बाजूला पर्फोरेशन्स असल्याने चित्राला जास्त जागा मिळते. अमेरिकेत आता व्हिस्टा मोशन टेक्नोलॉजी आली आहे.

भारतात आपण ॲरी कंपनीचे कॅमेरे वापरतो. हे जर्मनीत बनलेले आहेत. तर अमेरिकेत पॅनव्हिजन कंपनीचे कॅमेरे वापरतात. ॲरी कॅमेऱ्यात एकावेळी ४०० फूट लांब फिल्म वापरता येते आणि ती ४.५ मिनिटे चालते तर पॅनाव्हिजन कॅमेऱ्यात एकावेळी १००० फूट लांबीची फिल्म वापरता येते आणि ती ११ मिनिटे चालते. पॅनाव्हिजन कंपनी कॅमेरे विकत नाही, भाड्याने देते. १९६० सालापूर्वी एअर कंडिशनिंग नव्हते आणि शूटिंग फक्त दिवसा चाले, त्यामुळे दिवसाच्या उजेडात काम करणारे कॅमेरे वापरले जात. हे शूटिंग नुसतेच दिवसाच्या उजेडात नव्हे तर शूटिंगच्या वेळी प्रखर दिवे लावावे लागत. त्यामुळे खूप उष्णता निर्माण होई आणि सगळे नट घामाघूम होत. त्यामुळे त्यांना मिळणारा पैसा हा खऱ्या अर्थाने घामाचा पैसा असे! भारतातील जुने चित्रपट पैशाच्या कमतरतेमुळे १६ मिमी फिल्मवर बनवले जात आणि नंतर ते दाखवताना ३५ मिमीवर ब्लो अप केले जात. पूर्वी जेव्हा रंगीत चित्रांच कॅमेरे नव्हते तेव्हा कॅमेऱ्यात तीन रंगांची फिल्टर्स बसवत शूटिंगमध्ये १) निगेटिव्ह प्रोसेसिंग २) टेलसिने ३) एडिटिंग ४) निगेटिव्ह कटिंग ५) फायनल ६) निगेटिव्ह साऊंड ७) रेकॉर्डिंग/ मिक्सिंग

८) कलर करेक्शन ९) पॉझिटिव्ह प्रोसेसिंग १०) प्रिंट रेडी फॉर एक्झिबिशन अशा वेगवेगळ्या पायऱ्या असतात. आवाजाबाबतही प्रथम मोनो साऊंड आला आणि मग मॅग्नेटिक सिक्स ट्रॅक साऊंड ट्रॅक आला. ज्यांनी शोले सिनेमा मुंबईच्या मिनर्व्हा चित्रपटगृहात पाहिला त्यांना डॉल्बी नसतानाही तेथे आवाजाची प्रत उत्तम ऐकायला मिळाली. आता डॉल्बी डिजिटल झाले. त्याची सोय थिएटरात असावी लागते. सोनी कंपनीने डायनॅमिक डिजिटल साऊंड आणले. हॉलीवूडमध्ये हे वापरले गेले. डिजिटल थिएटर साऊंड दक्षिण भारतात वापरले गेले.

जुन्या फिल्मचे डिजिटायझेशन करण्याचे काम आपल्याकडे चालू आहे. ब्लॅक अँड व्हाईट फिल्म चांगल्या अवस्थेत ५०० वर्षे टिकते. मात्र फिल्म साठवण्याचा खर्च बराच असतो. हळूहळू तो कमी होत आहे. आपल्याकडे ब्लॅक अँड व्हाईट फिल्म हिंदुस्थान फोटो फिल्म कंपनी बनवत असे. रंगीत फिल्म भारतात बनली नाही. डिजिटल कॅमेरे प्रथम आकाराने मोठे होते, ते आता लहान लहान होत चालले आहेत.

ॲरी, सोनी, रेड, ब्लॅक मॅजिक डिजिटल कॅमेरे बाजारात आले. आता ३ डी डिजिटल कॅमेरे आले. यावर शूट करणे सोपे असते. रेझोल्यूशन वाढते तशी चित्राची गुणवत्ता वाढत जाते. डिजिटल फिल्मचे आयुष्य फक्त ३० वर्षे असते.

SMPE म्हणजे सोसायटी ऑफ मोशन पिक्चर्स इंजिनिअर्स ही संस्था १९१६ पासून सुरू झाली. १९५० पासून अमेरिकेत टेलिव्हिजन सुरू झाल्यावर SMPE नावात टेलिव्हिजनचा T येऊन ते SMPTE झाले. डिजिटल सिनेमासाठी SMPTE संस्था प्रमाणीकरणे उर्फ स्टॅन्डर्डस बनवते. SMPTE च्या भारतातील शाखेचे उज्ज्वल निरगुडकर अध्यक्ष आहेत.

ऑस्करचे मूळ नाव 'ॲकेडेमी ऑफ मोशन पिक्चर आर्टस् अँड सायन्स' असे आहे. हॉलिवूडमध्ये 'आर्ट्स-बरोबर' सायन्सलाही तेवढेच महत्त्व आहे. SMPTE ची माहिती देणारे 'डिजिटल डायलेमा' हे पुस्तक मराठीत छापले गेले आहे.

सिनेमाचा आनंद स्पेशल इफेक्ट्समुळे मिळतो. त्यात खालील भाग असतात :

१. मेकॅनिकल अ) छोटी-मोठी मॉडेल्स आ) कृत्रिम पाऊस/ धुके / ढग दाखवणे
२. ऑप्टीकल इफेक्ट्स अ) कॅमेरा स्थिर ठेवणे, ॲनिमेशन आ) स्लो मोशन / फास्ट मोशन
३. केमिकल इफेक्ट्स अ) ब्लीच बायपास आ) कमी/ जास्त डेव्हलपमेंट

१८९४ मध्ये एडीसनने किनेमेटोस्कोप तयार केला. यात प्रत्येकाला वेगळा सिनेमा पहावा लागे. मग आपण थिएटरमध्ये एकत्र बसून सिनेमा पाहू लागलो आणि आता कोरोनामुळे परत घरी एकेकटे बसून पाहू लागलो. पण 'ड्राईव इन' थिएटरमध्ये आपापल्या गाडीत बसून मैदानात आपण सिनेमा मोठ्या पडद्यावर पाहू शकतो. श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री. निरगुडकरांनी शेवटी उत्तरे दिली.

**महाराष्ट्र राज्य मराठी भाषिक असले तरी ते केवळ मराठी भाषिकांचे नाही. भाषिक राज्य हे साध्य नसून साधन आहे. मराठी भाषेचा विकास हा महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा एक स्वाभाविक परिपाक आहे. भाषिक राज्याची स्थापना हे साधन असून जनतेचा सर्वांगीण विकास हे साध्य आहे.**

***- मा. यशवंतराव चव्हाण***

# शिक्षण विकास मंच

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देण्याचे काम २००८ पासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचाने केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे शिक्षण विषयक कार्यक्रम शिक्षण विकास मंचामार्फत आयोजित केले जातात. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. खा. सुप्रिया सुळे या आहेत. डॉ. वसंत काळपांडे मुख्य संयोजक आणि बसंती रॉय या विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. दत्ता बाळसराफ हे संयोजक आहेत. नजमा काझी, शुभदा चौकर, सुरेश पाटील हे सदस्य आहेत. समन्वयक म्हणून माधव सूर्यवंशी, मीनल सावंत काम पाहतात. शिवाय विविध कार्यक्रमानुरूप महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे वेळोवेळी सहकार्य मिळत असते.

## साक्षीभाव आणि जीवन कौशल्ये

शनिवार दि. ४ जुलै २०२० रोजी आयोजित शिक्षण कट्ट्यात 'साक्षीभाव आणि जीवन कौशल्ये' या विषयावर डॉ.यश वेलणकर (मानसोपचारतज्ज्ञ) यांच्याशी काकासाहेब वाळुंजकर यांनी संवाद साधला.

शिक्षण विकास मंचच्या सल्लागार बसंती रॉय यांनी प्रास्ताविकात सांगितले की गेल्या बारा वर्षांपासून कार्यरत असलेल्या शिक्षण विकास समूहात एकूण नऊ हजार सदस्य शिक्षण विकास मंच व फेसबुक समूहाच्या माध्यमातून जोडले गेलेले आहेत. कोरोना संसर्गाच्या काळात आज शाळा बंद शिक्षण चालू अशी अवस्था झाली असताना या शिक्षण विकास मंचच्या शैक्षणिक चळवळीतून जे विचार मंथन होते त्यातून दैनंदिन अध्यापनात चैतन्य निर्माण होत आहे.

प्रास्ताविकानंतर शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक मा. डॉ.वसंत काळपांडे यांनी आपल्या मनोगतात या वेबिनारची मुख्य भूमिका आणि उद्देश स्पष्ट केले.

शिक्षण विकास मंच नेहमीच वेगळे व नावीन्यपूर्ण विषय घेऊन येत असतो. मग पाठ्यपुस्तक, स्वयंअध्ययन, शैक्षणिक नवउपक्रम, उपक्रमशील शिक्षक, शाळा व नवीन शैक्षणिक प्रयोगांना मंचाने नेहमीच अग्रस्थान दिले आहे.

पालक माजी विद्यार्थी, उद्योजक, कलाकार, कार्यकुशल कारागीर, सेवानिवृत्त शिक्षक, वरिष्ठ पदाधिकारी अगदी सारेच या शैक्षणिक अभियानात सहभागी होतात. सन १९९९ साली जागतिक आरोग्य संघटनेने जीवन कौशल्यांचा पुरस्कार केला व शालेय जीवनापासून शिक्षणाच्या माध्यमातून ही जीवन कौशल्ये रुजावीत संक्रमित व्हावीत या उद्देशाने साक्षीभाव कसा जागृत करता येईल? हा नवीन विषय प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. यश वेलणकर हे मुलाखतीच्या माध्यमातून सांगणार आहेत.

या शिक्षण कट्ट्यात श्री काकासाहेब वाळुंजकर माजी मुख्याध्यापक यांनी मुख्य विषयाला अनुसरून खालील प्रश्नांच्या आधारे डॉ वेलणकरांशी संवाद साधला.

१. साक्षीभाव ही गाभाभूत संकल्पना शालेय शिक्षणाच्या अंगाने कशी समजावून सांगाल? अर्थात साक्षीभाव म्हणजे काय?

२. पौगंडावस्थेतील मुलांच्या शारीरिक मानसिक आणि लैंगिक भावनांचे विधायक समायोजन करण्यासाठी शिक्षक पालक यांची भूमिका कशी असावी?

३. पौगंडावस्थेतील मुलांच्या सैराट वर्तनाला आपण कसे समजावून घेतले पाहिजे? पालकांनी मुलांशी पॉर्न आणि ॲडल्ट कंटेंटविषयी बोलावं का? का व कसे? ताणतणावांचे यशस्वीपणे समायोजन करण्यासाठी शिक्षणात साक्षीभाव कोणती भूमिका निभावू शकेल?

४. मुलांमध्ये 'स्व'ची जाणीव जागृती निर्माण व्हावी यासाठी शिक्षक पालक यांनी जीवन मूल्यांकडे कोणत्या साक्षीभावाने पाहावे?

५. बालमनावर दुष्परिणाम होऊ नयेत म्हणून समानुभूतीची जाणीव जागृती साक्षीभाव ठेवून कशी वाढीस लावता येईल?

६. बोर्ड परीक्षा व दहावी बारावीतील विद्यार्थी आणि पालक यांच्यातील अनेक प्रश्न विशेषतः मिळणारे गुण, प्रवेश, शाखा, विशिष्ट कॉलेज व पुढील करिअरच्या दृष्टीने पालक पाल्य यांत टोकाच्या भूमिका असतात, अपेक्षा व क्षमता भिन्न असल्यामुळे या समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य निर्णय घेण्यासाठी पालक शिक्षक यांनी नेमका कोणता सुवर्णमध्य काढला पाहिजे?

७. एकमेकांना समजावून घेण्यासाठी शिक्षक पालक विद्यार्थी व अधिकारी यांचा एकमेकांशी शालेय गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने साक्षीभावाचे सहसंबंध कसे असावेत?

८. मुलांमध्ये मुक्त चिकित्सा व अभिव्यक्ती क्षमता वाढीस लागावी यासाठी आपण शिक्षक पालक व शासकीय योजनासंदर्भात काय उपाय सुचवावा?

९. साक्षीध्यान माईंडफुलनेस थेरपीविषयी आपण आपल्या असंख्य प्रेक्षकांना श्वासाची सजगता ध्यान याविषयी काय संदेश द्याल?

सारांश रूपाने डॉ. वेलणकरांच्या साक्षीभावाचे सार

काढायचे झाले तर आपण प्रत्येकाने आपल्या 'आत' डोकावले पाहिजे. शरीर, मन, मेंदू यांकडे लक्ष दिले पाहिजे. जाणिवांचा व भावभावनांचा सकारात्मकतेने स्वीकार केला पाहिजे. मुलांना स्पर्श, श्रवण, स्वाद यांची माहिती करून दिली पाहिजे. मेंदूची सजगता निर्माण करून कोणत्याही विचारात गुंतून न पडता त्यापासून अलिप्त राहून त्यांच्याकडे पाहणे शिकवले पाहिजे.

अगदी पौगंडावस्थेतील मुलांना समजावून घेऊन त्यांच्या मनातील गंड काढून टाकून पालक शिक्षकांनी त्यांचे मित्र बनावे चांगले वाईट हा नीरक्षीर विवेक जागृत करून त्यांच्यातील सैराट वर्तनाला विधायकतेकडे वळवावे. ताणतणावांचे व्यवस्थापन करताना अनेक छंद, मनोरंजक खेळ व वाचनाची गोडी मुलांना लावता येईल. आपण कोण आहोत, ही 'स्व'ची जाणीव मुलांमध्ये निर्माण केली तर शिक्षण ही प्रक्रिया जीवन केंद्रित बनेल. जीवनाच्या अस्तित्वाचा खरा अर्थ मुलांना समजेल. त्यांच्यात समानुभूतीची जाणीव निर्माण व्हावी व इतरांच्या भावनांची कदर करता यावी हे शिकवावे.

दहावी बारावीतील मुलांना त्यांच्या आवडी-निवडी, क्षमता, कुवत आणि इच्छा काय आहेत याचा विचार करण्याचे स्वातंत्र्य द्यावे. आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्यावर लादणे टाळावे. आपला त्यांच्याशी मुक्त संवाद वाढवावा. परिणामकारक संप्रेषणातून मुलांचा आत्मविश्वास वाढणार आहे. मुलांना समजून घ्यावे.

अशा प्रकारे ध्यान धारणा, मेंदूची सजगता यातूनच साक्षीध्यान (माईंडफुलनेस) वाढेल स्वत:कडे व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निश्चितच विस्तृत होत जाईल व यातूनच जीवन कौशल्यांचा विकास होईल.

हे वेबिनार सुनियोजित पार पाडण्यासाठी मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे सर, मंचाच्या सल्लागार बसंती रॉय, समन्वयक माधव सूर्यवंशी, कोअर कमिटीतील सदस्य अजित तिजोरे, जयवंत कुलकर्णी, टेक्निशियन सतिश पवार आणि सर्व समूहातील लाईव्ह प्रेक्षक व पालक यांचे आभार मा. दत्ता बाळसराफ यांनी मानले.

## कोरोना काळातील ऑफलाइन अभ्यास

दि. ११ जुलै २०२० रोजी कोरोना काळातील ऑफलाइन अभ्यास या विषयावर वेबिनार शिक्षण कटट्याचे आयोजन करण्यात आले होते.

शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय यांनी वेब संवादाचे प्रारंभिक करताना कोरोना लॉकडाऊन काळातही शिक्षण विकास मंचाने आयोजित केलेल्या उपक्रमांतर्गत 'शालेय शिक्षणातील बदलत्या भूमिका' तसेच 'साक्षीभाव आणि जीवन कौशल्य' यासारख्या दर्जेदार शिक्षण कट्ट्याची उपस्थिताना माहिती दिली.

शिक्षण विकास मंचाचे मुख्य संयोजक डॉ. वसंतराव काळपांडे सरांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतातून 'कोरोना काळातील ऑफलाईन अभ्यास' या विषयाच्या निवडीमागील भूमिका विषद केली. सध्याच्या काळात ऑनलाईन शिक्षणाबद्दल बरीच उलटसुलट चर्चा विविध माध्यमांतून होत आहे. मात्र तशा सुविधा फक्त तीस टक्के विद्यार्थ्यांना उपलब्ध असून सत्तर टक्के विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक हे शिक्षणाचे मुख्य साधन मुलांच्या हाती पोहोचते झाले आहे. आता त्याचा प्रभावी वापर करून ऑफलाईन शिक्षण कसे दर्जेदार करता येईल या अनुषंगाने हा कट्टा आयोजित केला आहे, असे नमूद केले.

कोरोना काळातील कडकडीत लॉकडाऊनच्या काळात कोट्यवधी पाठ्यपुस्तके मुद्रण आणि शैक्षणिक वर्षाच्या अगदी प्रारंभीच मुलांपर्यंत पोहोचविण्याचे अशक्यप्राय काम ज्यांनी शक्य करून दाखविले, अशा महनीय अधिकारी द्वयींचे डॉ. काळपांडे सरांनी मुक्त कंठाने अभिनंदन केले आणि समस्त विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या वतीने आभारही मानले.

या वेबसंवादाचे औचित्य साधून बालभारतीच्या पाठ्यपुस्तक निर्मिती विभागाचे प्रमुख श्री. विवेक गोसावी तसेच पुरवठा अधिकारी श्री. दिनकर टेमकर यांना उपस्थिताना संबोधित करण्याची संधी दिली. दोन्ही अधिकाऱ्यांनी आठ भाषेतील सर्व माध्यमांची पाठ्यपुस्तके वेळेत विद्यार्थ्यांच्या हाती पोहचविण्याचे समाधान व्यक्त केले. शिक्षक आणि पालकांनी संयुक्तपणे पाठ्यपुस्तकांमधील आशय आणि कृती कौशल्याचा भरपूर उपयोजनात्मक वापर करून विद्यार्थ्यांच्या कोरोनाकालीन ऑफलाईन शिक्षणाची प्रक्रिया अबाधित ठेवण्याबाबत अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी बालभारतीच्या वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या माझा मराठी-इंग्रजी ई-शब्दकोश, स्वाध्याय पुस्तिका, शिक्षक हस्तपुस्तिका, प्रश्नपेढी, एकात्मिक आणि बाय लिंग्वल प्रकल्प, शिक्षणोत्सव कार्यक्रमातील विज्ञान प्रकल्प, पीडीएफ स्वरूपातील सहज डाऊनलोड करून घेता येईल अशा विस्तृत ई-संदर्भ साहित्याची ओळख करून दिली. सुमारे १ कोटी ५५ लाख पीडीएफ आतापर्यंत डाऊनलोड झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. उपस्थित सर्व प्रश्नांचे अतिशय माहितीपर मार्गदर्शन केले.

## मिश्र शिक्षण पद्धतीतून शिक्षक सक्षमीकरण

कोरोना काळात महाराष्ट्रातील शिक्षकांनी विवध ऑनलाईन आणि ऑफलाईन मार्गांचा अवलंब करत शिक्षण मुलांपर्यंत पोहचविण्याचे सरस कार्य केले. शिक्षक सकारात्मकतेने याकडे बघत आहेत. ते मुलांचा शाळा आणि शिक्षणातील संपर्क टिकविण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. कोविड काळात आपल्या सूप्त क्षमतांचा विकास करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. अशीच समांतर परिस्थिती दुसऱ्या महायुद्धाच्या काळात

उद्ध्वस्त झाल्याने शिक्षण व्यवस्था सहा ते सात वर्ष पूर्ण कोलमडली होती. त्याही वेळी शिक्षणात असंख्य बदल घडून आले. आता आशयाची पुनर्मांडणी आणि प्रयोग करून तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण कसे पोहचविता येईल यावर विचार करत असताना ते साधन आहे, गरज आहे आणि त्यावर मर्यादा देखील आहेत हे विसरता येणार नाही.

म्हणून ऑनलाईन शिक्षणाच्या प्रयोगातून पुन्हा ऑफलाईन शिक्षणाकडे यावे लागेल. सध्या महाराष्ट्रात 'ई-लर्निंग असावं की नसावं,' या बाबतीत एकच एक उत्तर असणार नाही. शिक्षकांना जी साधने उपलब्ध आहेत त्यांचा पुरेपूर उपयोग करता येणे महत्वाचे आहे. त्यासाठी झूम, गुगल मीट, व्हॉटसअप, एसएमएस वापरून शिक्षण मुलांपर्यंत पोहचविणाऱ्या 'ई शाळा,' केवळ पाठ्यपुस्तके उपलब्ध असणाऱ्या आणि त्यातून कृतियुक्त अध्ययन अध्यापनावर भर देणाऱ्या 'कृती शाळा' आणि पाठ्यपुस्तकाच्या पलिकडे जात आपली राहती जागा, परिसर यांचाच अध्ययन अध्यापन सामुग्री म्हणून वापर करणाऱ्या 'मुक्त शाळा' असे संमिश्र शिक्षण हे आजच्या परिस्थितीत आवश्यक ठरणार आहे. शालेय शिक्षणाकडून जीवन कौशल्यांकडे, पाठ्यपुस्तकाकडून अभिरुची विकासाकडे, घर हीच शाळा, शिक्षकांची बांधिलकी, त्यांच्यावरील विश्वास आणि विद्यार्थांना प्रोत्साहित करत शैक्षणिक उपक्रमात गुंतवून ठेवणे या पंचसूत्रीचा अवलंब करावा लागेल. यापुढे जात आपल्या परिसरात असणाऱ्या शिक्षक, पालक, आणि सुशिक्षित तरुण यांच्या लोक सहभागातून ऑफलाईन लर्निंग अधिक सुकर करता येऊ शकते, यावर दिवेकर यांनी विश्वास दर्शविला.

❖ ❖ ❖

## अश्विनी सोनवणे यांचे कौतुक

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्याचा जंगलव्याप्त दुर्गम आदिवासी पाड्यांचा भाग. जिथे वाहने, रस्त्यांचाही संपर्क नाही तिथे इंटरनेट आणि ऑनलाईन शिक्षणाची कल्पना करणेही स्वप्नवत ठरावे, त्यात अशा कोरोनाकालीन परिस्थितीत आपल्या आखत्यारितील ७७ पैकी ६४ शाळा केवळ पाठ्यपुस्तके आणि पूर्वनियोजित अभ्यासगट या जुजबी साधनांच्या पाठबळावर आनंदाने, विनातक्रार सुरू करून दाखविणाऱ्या एक महिला गट शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी सोनवणे यांनी आपले अतिशय स्फूर्तिदायक अनुभव सांगितले. ऑफलाईन शिक्षणापुढेही उभ्या असणाऱ्या असंख्य आव्हानांना त्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालकांच्या सहविचार सभांची जोड देऊन भीतीविरहित वातावरणात शिक्षण कसे सुरू ठेवता येईल, यासाठी उद्युक्त केले. प्रसंगी उच्चपदस्थ अधिकारी, वेगवेगळ्या वयोगटाच्या विद्यार्थी आणि तरुणांचे अभ्यासगट यांचा भरीव सहभाग मिळविला. कधी पालकांचे समुपदेशन तर कधी वेळेचा ताळमेळ बसवत उपलब्ध साधन सामुग्रीचा वापर करून असाध्य परिस्थितीवर विविध तोडगे काढत ६४ शाळांमधील शिक्षणाचे चक्र कसे गतिमान केले, हे अवघ्या काही मिनिटांत त्यांनी कोणताही अभिनिवेश न दाखविता उपस्थिताना सांगितले. त्यांच्यातील एका सुहृद, कुशल संघटक, प्रशासकीय कौशल्याची विशेष दखल घेऊन राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी कौतुक करणे हीच खरी त्यांच्या कार्याला मिळालेली पोचपावती म्हणावी लागेल.

❖ ❖ ❖

## ऑनलाईन – ऑफलाईनमधील दरी सांधताना...

ऑफलाईन शिक्षणाची चर्चा करताना कोणी नेमके काय करावे याचे विचार प्रवृत्त करायला लावणारे विवेचन करताना गिरीश सामंत यांनी अनेक प्रयोग सुचविले.

कोरोनाच्या प्राप्त परिस्थितीत ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत कोणतेही तातडीचे निष्कर्ष न काढता संगणक, इंटरनेट आणि तत्सम साधनांचा या आधीही वापर होत असे. मात्र, कोरोनामुळे जणू काही एकदम नवीन शिक्षण पद्धती अवतरेल असे वाटत नाही. पूर्वतयारी न करता जुनी परीक्षा पद्धत बदलून अचानक सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती आणताना ज्या चुका आणि त्याचे परिणाम शिक्षण व्यवस्थेवर झाले, तीच चूक पुन्हा ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत होईल का, अशी शंका येते. वेळेअभावी काही अध्यापनाचा भाग पुढील वर्षी सुट्ट्या न घेता भरून काढता येईल. शिक्षकांवर पोलिसिंग न करता विश्वास दाखवायला हवा. गरज म्हणून स्वीकारावे लागत असलेले ऑनलाईन दूरस्थ शिक्षण हा शाळा व्यवस्थेला नक्कीच पर्याय नसून तो त्या व्यवस्थेचाच पूरक भाग राहील. पाठ्यपुस्तके हा ऑफलाईन शिक्षणाचा मोठा आधार आहे. लोकसहभागाला देखील कुठे कसा वाव द्यायचा, हे विचारपूर्वक ठरवायला हवे. पाठ्यपुस्तकातून सांगितलेल्या प्रकल्प, कृतींच्या आधारे शिक्षकांनी कोरोना काळात मुलांची कौशल्ये आणि जाणीवा विकसित करण्यावर भर द्यावा. कोरोना लॉकडाऊनच्या काळातच नाही; तर शिक्षक विद्यार्थी आणि पालक यांचा एक त्रिकोण यापुढे कायमस्वरूपी असण्याची गरज आहे.

❖ ❖ ❖

## कोरोनाकाळात ऑफलाईन शिक्षण

कोरोना काळातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाती हमखास पोहोचलेले एकमेव आणि अत्यंत विश्वासू साधन म्हणजे सर्व विषयांची पाठ्यपुस्तके असून ती स्वयंपूर्ण, समृद्ध आणि सक्षम आहेत हे पटवून देत प्रत्येक इयत्तेतील पाठ्यपुस्तके मुलांचा भावात्मक, बोधात्मक आणि क्रियात्मक विकास कसा घडवून आणू शकतात, याची सोदाहरण मालिका प्रस्तुत करून धनवंती हर्डीकर यांनी सप्रमाण सिद्ध केले. 'पाठ्यपुस्तकांच्या बाहेर किंवा पलिकडे तर कधी पुस्तकी शिक्षण' अशी संबोधने वापरली

जातात. हा एक प्रकारे पाठ्यपुस्तकांच्या अल्प निरीक्षणावरून केलेला अप्रत्यक्ष आरोप खोडून काढत शिक्षक, पालक आणि अभ्यासकांनी त्यात विद्यार्थ्यांच्या इयत्तानिहाय दिलेल्या असंख्य रंजक कृतीयुक्त उपक्रमांकडे सर्वांचे लक्ष वेधले. आपल्या अत्यंत अभ्यासू सादरीकरणातून उदाहरणादाखल घेतलेल्या भाषा, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र या पाठ्यपुस्तकांतून कोणकोणते उपक्रम घरच्या घरीच पालक करून घेऊ शकतात याचे त्यांनी सुंदर विवेचन केले. त्यासाठी शिक्षकांनी फक्त धडे, कविता किंवा मुख्य पाठ्यांश शिकविण्यात वेळ न दवडता त्याच्या आधी आणि नंतर देण्यात आलेल्या कृतियुक्त उपक्रमांकडे अधिक सजगपणे पाहण्याची गरज आहे, असे नमूद केले. मात्र दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. तसे झाल्यास पाठ्यपुस्तकातील आशयाची सांगड विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील, घर आणि घराबाहेरील असंख्य गोष्टींशी घालता येते. त्यांना अनुभवातून व्यवहारी शिक्षण घेता येईल. यात विषय शिक्षक आणि पालकांची महत्वपूर्ण भूमिका त्यांनी अधोरेखित केली.

सातत्याने दर्जेदार, सखोल शैक्षणिक विचारमंथनाची परंपरा राखत 'कोरोना काळातील ऑफलाईन शिक्षणा'वर वेबिनारच्या माध्यमातून रंगलेल्या या ऑनलाईन कट्ट्यावर समारोपात श्री. माधव सूर्यवंशी यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची तज्ज्ञांकडून उत्तरे मिळविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती बसंती रॉय यांनी केले. फेसबुक आणि युट्युबच्या माध्यमातून या संपूर्ण कार्यक्रमाची लिंक अल्पावधीतच सर्वांना उपलब्ध करून दिली जाईल असे सांगितले. त्यांनी शिक्षण विकास मंच्याच्या वतीने मान्यवर तज्ञ, उपस्थिती शिक्षक आणि सहभागी शिक्षणप्रेमींचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

✤ ✤ ✤

## शालेय शिक्षणातील शिक्षक, पालक, विद्यार्थी, समाज यांच्या बदलत्या भूमिका

८ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या शालेय शिक्षणातील शिक्षक, पालक, विद्यार्थी, समाज यांच्या बदलत्या भूमिका या विषयावरील वेबिनारमध्ये सर्वांगीण दृष्टीने चर्चा करण्यात आली. शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ.वसंत काळपांडे यांनी प्रास्ताविकात गेल्या बारा वर्षापासून मंच कार्यरत असून आजच्या घडीला दररोज फक्त शिक्षण या विषयावर सुमारे सात हजार शिक्षणप्रेमींबरोबर Whatspp ग्रुप्स आणि फेसबुक ग्रुप्सच्या माध्यमातून संपर्कात असल्याचे असल्याचे सांगितले. कोरोनामुळे विद्यार्थी शाळेत कमी आणि घरात जास्त, शिक्षकांच्या सहवासात कमी आणि पालकांच्या सहवासात जास्त राहायला लागले आहेत. शिक्षकांनी वर्गात शिकवण्यापेक्षा ऑनलाइन आणि स्वयं-अध्ययन यांना अधिक महत्त्व यायला लागले आहे. यापुढे आणखीही अनेक बदल घडतील. या बदलांसाठी कोरोना हे निमित्त असले, तरी आपल्याकडील काही चांगल्या शाळांत अशा अनेक बाबी त्यांच्या दैनंदिन व्यवस्थेचा भाग बनलेल्या आहेत. शैक्षणिकदृष्ट्या काही प्रगत देशांत स्वयंअध्ययन, सहाध्यायांसोबत अध्ययन, सर्वच प्रकारच्या शालेय कामकाजात पालकांचा आणि समाजाच्या सर्वच घटकांचा सहभाग, या गोष्टी खूपच महत्त्वाच्या मानल्या जातात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मसुद्यात सहाध्यायांसोबत अध्ययन, शाळेत आणि शाळेबाहेर पालक, माजी विद्यार्थी, वरच्या वर्गात शिकणारे विद्यार्थी, परिसरातील व्यावसायिक, उद्योजक, कलाकार, कारागीर, निवृत्त शिक्षक, अधिकारी आणि इतर व्यक्ती यांचा शालेय कामकाजाच्या सर्वच अंगांनी शक्य त्या मार्गांनी 'मिशन मोड'मध्ये सहभाग घ्यावा, असे म्हटले आहे. या अनुषंगाने शाळा आणि शिक्षक यांच्या भूमिकांतही विविधांगांनी बदल घडतील.याच बदलांबाबत चर्चा करण्यासाठी हा शिक्षण कट्टा आयोजित करण्यात आला आहे.

प्रास्तविक आणि परिचयानंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या कार्याध्यक्ष आणि शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक मा.सुप्रिया सुळे यांनी आपली भूमिका मांडली. राज्य आणि देशातील आजच्या शिक्षणावर चिंता व्यक्त करतानाच on-line शिक्षणाबद्दल आपण सकारात्मक नसल्याचे सांगितले. शाळेत जाऊन मुलांनी शिकावं या मताची मी असून परीक्षेच्या माध्यमातून मुलाचे मूल्यमापन आपण करावे. आजच्या चर्चेतून शालेय आणि विद्यापिठीय शिक्षणात परीक्षा घ्याव्या की नकोत, सोबतच कोरोनानंतचे शिक्षण यावरही चर्चा करून निष्कर्ष काढावे, त्याची पूर्तता करण्यासाठी सरकारदरबारी पाठपुरावा करण्याची जबाबदारी आपली असे सांगून त्यानी चर्चेत सहभागी झालेल्या सर्वांचे अभिनंदन केले.

✤ ✤ ✤

## लोकसहभागातून आयएसओ मानांकित शाळेची उभारणी

दत्तात्रय वारे सर, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी जिल्हा पुणे यांनी लोकसहभागातून आयएसओ मानांकित शाळेची उभारणी कशी केली याचे अनुभवकथन केले. ऑगस्ट २०१२ मध्ये दोन शिक्षक आणि ३२ विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेचा पट आज सहाशेच्या वर गेला आहे आणि आजही चार हजार विद्यार्थी वेटींग लिस्टवर आहेत याची यशोगाथा सांगितली.

१५ ऑगस्ट २०१२ रोजी ग्रामसभा घेऊन आजच्या पारंपरिक पद्धतीच्या शिक्षणातून बाहेर येऊन शिक्षणात होणारे नवनवीन प्रयोग आपण स्वीकारले पाहिजेत आणि विद्यार्थीस्नेही शाळेची उभारणी केली पाहिजे हा विचार लोकांसमोर मांडला. लोकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि वाबळेवाडीची शाळा उभी राहिली. गावातील लोक जत्रेला होणारा खर्च टाळून शाळेला

आर्थिक मदत करतात. नुसतीच आर्थिक मदत नाही, तर शाळा बांधकामाच्या वेळेस गावकऱ्यांनी श्रमदानही केले. गावकऱ्यांनी दानपत्र दिलेल्या जमिनीवरच आज विद्यार्थी आणि पर्यावरणस्नेही शाळेची सुसज्ज वास्तू उभी आहे. अनेक पालक आज शाळेच्या दैनंदिन कामकाजात सहभाग घेतात. मुलांना शिकवतात, गृहपाठ पाहतात, मुलांचे खेळ घेतात, आर्थिक व्यवहार बघतात. अशा अनेक अंगांनी लोकांचा सहभाग आमच्या शाळेत असतो.

व्हर्जिनिया कॉमनवेल्थ युनिव्हर्सिटी, रिचमंड, युएसए येथे संशोधन करीत असलेल्या प्रीती कामत-तेलंग यांनी संमिश्र अध्ययन पद्धतीवर मांडणी केली. कोविड-१९ नंतर शिक्षणात होणारे बदल याच्या सोबतीने पालकांची मानसिक, शारीरिक, आर्थिक स्थिती यावर मात करून येथील प्रादेशिक आणि सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेणारे शिक्षण संमिश्र अध्ययनातून देता येईल. मात्र याबाबतचे नियोजन महत्वाचे आहे.हे सांगताना त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या शैक्षणिक क्षेत्रातील अनिश्चितता, भविष्याबद्दची काळजी, शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी, शिक्षक, समाज यांच्यांत स्नेहबंध कसे जुळवून घेता येतील ही आव्हाने आहेत. त्यामुळे आज आपण शिक्षणाच्या एका वळणावर उभे आहोत. येथे विद्यार्थीकेंद्री शिक्षणाची गरज आहे. यासाठी आपल्याला स्व-अध्ययन, सह-अध्ययन, कृतियुक्त शिक्षण, यांच्याकडे वळण्याची गरज आहे. यातूनच संमिश्र अध्ययन पद्धती पुढे जाईल.

शिक्षण विषयाचे अभ्यासक किशोर दरक यांनी कोविड-१९ नंतर शिक्षणक्षेत्रात नेमकेपणाने काय बदल होणार आहेत, सध्या काय बदल झाले आहेत, याचा आढावा घेतला. भारतीय शिक्षणाचा पसारा हा अवाढव्य असून यात कोविडच्या काळात व नंतर काही तात्पुरते बदल होणार आहेत. दीर्घकालीन बदल होण्याची शक्यता कमी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. यात मुख्य बदल होणार आहे, तो म्हणजे शिक्षणातील तंत्रज्ञानात अर्थात डिजिटल स्वरूपात. मात्र यातून विषमतेची दरी अधिक रुंदावणार आहे. याकडे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

डिजिटल स्वरूपाच्या शिक्षणातून मुलांच्या भावनिक गरजा पूर्ण होत नाहीत. या गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी कुटुंबावर येऊन पडते. यामुळेच मुलांची सुरक्षितता, शारीरिक वाढ, आरोग्य, लिंगभेद यांचा विचार करतानाच शिक्षणाकडे लक्ष पुरवावे लागते. याचा ताण मुख्यत्वे मुलांवर आणि घरातील महिलांवर येऊन पडतो. मुलांचे शिक्षण पूर्ण करणे ही महिलांची जबाबदारी बनत आहे, ही चिंता करायला लावणारी बाब आहे, असे विवेचन त्यानी केले.

वयम मासिकाच्या संपादक शुभदा चौकर यांनी कोविडच्या काळात मुलांना काय अनुभव आले याचे कथन करून मुलांवर विश्वास ठेवण्याची गरज त्यानी व्यक्त केली. नेहमीच्या सुट्टीपेक्षा कोविड लॉकडाऊनची सुट्टी मुलांनी कशी घालवली याचे अनुभव त्यानी मासिकासाठी मागवून घेतले. हे अनुभव वाचल्यावर असे लक्षात येते की, सकारात्मक रीतीने इष्टापत्ती समजून मुलांनी या सुट्टीचा उपयोग करून घेतला आहे. एरवीच्या सुट्टीत मुलांना जे शिकायला मिळाले नाही ते मुलांनी या सुट्टीत शिकले.

उपक्रमशील संस्थाचालक आणि पालक मिलिंद चिंदरकर यांनी पालकांचा शिक्षणातील सहभाग या विषयावर मांडणी केली. घर हेसुद्धा शिक्षण देणारे केंद्र बनू शकते, मात्र पालकांनी सजगपणे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांनी स्वतःच्या घरी आणि शाळेत जे प्रयोग केले, त्याचेच अनुभवकथन यावेळी केले. मुले ही कृतीतून शिकत असतात. पालकांनी मार्ग दाखवून त्याच्यावर विश्वास टाकायला हवा.

घरच्या घरी पालक अतिशय कमी आणि सहज उपलब्ध होऊ शकतील, अशा साधनांतून मुलांचे शिक्षण कसे करून घेऊ शकतात, हे पटवून देताना त्यानी लिंबू शरबत कसे करतात, याचे उदाहरण दिले. या एकाच कृतीतून त्यांनी एकाच वेळी मुले भाषा+गणित+विज्ञान हे विषय शिकू शकतात, हे दाखवून दिले.

शेवटी धनवंती हर्डीकर निवृत्त विद्यासचिव, बालभारती, पुणे यांनी अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, पाठ्यपुस्तके, उपक्रम, मूल्यमापन, या विषयांवर विवेचन केले. त्यांनी शिक्षणाला फिरत्या चाकाची उपमा देवून कोविडच्या काळात हे चाक बंद पडले आहे, याला पुढे नेण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे, असे प्रतिपादन केले.

पाठ्यपुस्तक हे साधन आहे त्याचा वापर मुलांसाठी करून शैक्षणिक उद्दिष्टे आपल्याला साध्य करायची आहेत. शिक्षक, पालक, विद्यार्थी या सर्व घटकांनी याकडे डोळसपणे पाहिले पाहिजे. अपुऱ्या तयारीमुळे किंवा योग्य मूल्यमापन न करता विद्यार्थ्यांना आपण वरच्या वर्गात पाठवतो. यामुळे मुलांचा पाया कच्चा राहतो आणि ती मागे पडतात.

आजच्या शिक्षणकट्टयाचे सर्व तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षण विकास मंच Whatspp समूहाचे सदस्य होते. त्यांच्या मांडणीमुळे आणि दत्ता बाळसराफ यांनी नेमकेपणाने केलेल्या सूत्रसंचालनामुळे चर्चा योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचली. ◆◆

# अपंग हक्क विकास मंच

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, विजय कसबे आणि या मंचाच्या संघटक म्हणून सौ. सुकेशनी मर्चंडे शेवडे या काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील अपंगांसाठी विविध जिल्ह्यांत मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरांचे आयोजन केले जाते. दिव्यांगांची पूर्वतपासणी करून त्यांना आवश्यक त्या कृत्रिम साधनांसाठी किंवा अवयवांसाठी त्यांचे मोजमाप घेऊन मोफत साहित्य उपलब्ध करून दिले जाते. उदा. जयपूर फूट, कॅलिपर, कुबडी, एल्बो क्रचेस, वॉकिंग स्टिक, वॉकर, सर्जिकल शूज, ट्रायसिकल, व्हीलचेअर, स्प्लिट्स, कमोड चेअर, सी.पी. चेअर, एम.आर. किट, ब्रेल किट, अंध काठी, अंध गूगल, श्रवणयंत्र बेल्ट्स आदी साहित्याचे मोफत वाटप कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिरात करण्यात येते. सन २००९ पासून आजपर्यंत शासकीय योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एकूण ६७,६३८ दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साहित्य साधनांचा थेट लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच मंचाच्यावतीने अपंगांच्या विविध विषयांवर, समस्यांवर नियमित चर्चा व कार्यशाळेचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निरसन करण्यात येते. मार्गदर्शन व सल्लाही दिला जातो.

**कोरोना काळात दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप:** परभणी जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने 'दिव्यांगांना मदतीचा हात' या आपत्ती व्यवस्थापन सामाजिक उपक्रमाचे आयोजन दिनांक ०४ एप्रिल २०२० ते २० एप्रिल २०२० दरम्यान करण्यात आले होते.

कोरोना विषाणूच्या नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी शासनाने संचार बंदीच्या काळात परभणी जिल्ह्यांत हालचाली करू शकत नाही, ज्या दिव्यांगांकडे रेशनकार्ड नाहीत अशा ७१ दिव्यांगांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, विभागीय केंद्र परभणी व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले.

या जीवनावश्यक वस्तूंच्या किटमध्ये प्रामुख्याने ५ किलो कणिक, ५ किलो उत्तम दर्जाचे तांदूळ, ०२ किलो तूरडाळ, १ किलो खाद्यतेल, १ किलो साखर, २०० ग्रॅम चहापत्ती, २ नग लाईफबॉय साबण, १०० ग्रॅम खोबरेल तेल, १०० ग्रॅम मसाला, २०० ग्रॅम मिरची पावडर, ९ नग मिठाचे पॅकेट, सॅनिटायझर बॉटल इत्यादी वस्तूंचा समावेश होता. या किट्स तयार करून परभणी शहरात विविध भागांत वास्तव्यास असलेल्या ७१ दिव्यांगांना त्यांच्या येथे जाऊन वाटप करण्यात आले. या वाटपाच्या वेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक मा. विजय कान्हेकर, मा. विलास पानखेडे (कोषाध्यक्ष विभागीय केंद्र परभणी), मा. श्री. आर.जी. गायकवाड (वै.सा.का. अपंग विभाग जिल्हा परिषद परभणी), श्री. विष्णु वैरागड (समन्वयक दिव्यांग पुनर्वसन केंद्र परभणी), जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, परभणीचे कार्यकर्ते श्री. कलीम शेख आणि श्री. एकनाथ बावळे यांनी सहकार्य केले.

**२) वेबिनार**

**कोरोना – दिव्यांग मुले आणि बदलती शिक्षण प्रणाली:** कोरोनासारख्या जीवघेण्या, दीर्घकाळ चालणाऱ्या संसर्गाने मानवी जीवनाच्या नियमिततेवर प्रकर्षाने परिणाम केला आहे. विशेषत: शालेय विद्यार्थी व त्यांच्या दैनंदिन शालेय पाठ्यक्रमावर याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे. त्याला दिव्यांग बालकेही अपवाद नाहीत. ही बाब लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक विजय कान्हेकर यांनी 'सुंदर माझी शाळा' या व्यासपीठावरून वेबिनारद्वारे महाराष्ट्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे पालक, विशेष शिक्षक तथा सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था व नागरिकांसाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केला. यामध्ये दिव्यांगत्व निहाय मुलांच्या गरजा, कोरोनाच्या काळात त्यांची घ्यावयाची काळजी, वैद्यकीय सोयी सुविधा, आहार व त्याचे नियोजन, स्वच्छता, सुरक्षित अंतर, शिक्षणातील अडथळे व उपाय, शाळा सुरू झाल्यानंतर घ्यावयाची काळजी, अवलंबून असलेल्या दिव्यांगांची केअर टेकींग, व्हीलचेअरचा वापर, कृत्रिम अवयव व साहाय्यभूत साधनांचा वापर, त्यांची स्वच्छता व सॅनिटायझरचा वापर, मास्कचा वापर या सर्व बाबींवर प्रकाशझोत टाकला. यानंतर या सर्व विषयांवर सहभागींनी प्रश्न विचारले व शंकांचे निरसन करून घेतले. या वेबिनारच्या सफलतेसाठी 'सुंदर माझी शाळा' या संकल्पनेचे प्रमुख मा. गणेश घुले, श्रीराम पोतदार इत्यादींचे सहकार्य लाभले.

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्यावतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा विविध दृष्टींनी सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना संतोष पवार यांचे सहकार्य असते.

सामाजिक तसेच माहितीपर असे अनेक कार्यक्रम महिला व्यासपीठातर्फे होत असतात.

व्यासपीठाच्या सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण अभ्यासक्रम या कार्यशाळेचे २३ वर्ग यशस्वी झाले. आतापर्यंत ६५० हून अधिक प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. दिनांक १ फेब्रुवारी २०२० पासून या वर्गाच्या २४ व्या शनिवार-रविवार तुकडीचे खास वर्ग सुरू झाले आहेत. या वर्गाबरोबरच मागणीनुसार GDC या सरकारी परीक्षेचे नवीन प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. ४५ प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थाकडून त्यांच्या कामकाजाकरिता प्रशिक्षित व्यवस्थापकांची मागणी वाढू लागली आहे. त्यामुळेच पूर्णवेळ, अर्धवेळ व्यवस्थापक तसेच सल्लागार म्हणून या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी शिक्षित लोकांसाठी उपलब्ध आहेत. स्त्रियांचा, त्याचबरोबर समाजाचा सर्वांगीण विकास हेच उद्दिष्ट सामोरे ठेऊन आम्ही स्त्री व पुरुष ह्या सर्वांना उपयुक्त असे सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण सुरू केले. येथून प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रिया व पुरुष अनेक गृहनिर्माण संस्थेत व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत. संस्थेचे हिशोब व इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही पार पाडत आहेत. आमच्या काही महिलांनी स्वत:ची सल्लेविषयक संस्थाही सुरू केली आहे. स्त्रियांसाठी सुरू केलेले हे प्रशिक्षण पुरुषांनाही मोलाचे ठरले. प्रशिक्षणानंतर परीक्षा घेतली गेली व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली. प्रशिक्षणादरम्यान को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे इन्कम टॅक्स, जीएसटी आणि इलेक्ट्रिसिटी संबधित व्याख्यानही यात समाविष्ट केले जाते.

वर नमूद केलेली सर्व प्रशिक्षणे व कार्यक्रम अत्यंत माफक फीमध्ये ना नफा ना तोटा या तत्वावर सुरू आहेत. या सर्व प्रशिक्षणात आम्ही प्रशिक्षणार्थींची संख्या मर्यादित ठेवली आहे, जेणेकरून मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता येईल.

आमची उद्दिष्टे सरळ, सोपी व समाजाचे भले व्हावे या दृष्टीकोनातूनच आहेत. आम्ही सतत लोकांना काय उपयुक्त देऊ शकतो हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे, यात आमचा खारीचा नाही पण मुंगीचा वाटा नक्कीच आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यातही स्त्रियांसाठी व समाजासाठी काहीतरी भरीव कार्य करण्याचा प्रयत्न करत राहणार आहोत. ◆

**आशा-निराशा वादाचा माझ्या आयुष्यातील हा कालखंड मी फार महत्त्वाचा मानतो. निराशेच्या काळात मनुष्य पुष्कळवेळा अंतर्मुख होतो. आपल्या उणिवा तपासतो. त्या अर्थाने निराशेचे क्षण हे जीवनाला शक्ती देणारे क्षण असतात, असे मला वाटते. यातूनच कर्तृत्वाची संधी प्राप्त होत असते.**

***- मा. यशवंतराव चव्हाण***

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय, मुंबई

यशवंतराव चव्हाण साहेब हे ग्रंथप्रेमी म्हणून प्रचलित होते. त्यांच्या नावाने आज राष्ट्रीय ग्रंथालय यशवंतराव चव्हाण मुंबई येथे सुसज्ज आहे, ग्रंथालयाचा विचार केला असता, माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालय सेवांचे स्वरूप बदलेले आहे. प्रामुख्याने वाचनसाहित्य प्रकारातील बदल आणि बदलांच्या अनुषंगाने द्यावयाच्या सेवा हा भाग महत्त्वपूर्ण आहे. ग्रंथालयांनी आता बदलत्या परिस्थितीत वाचकांना आवश्यक असणाऱ्या सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ह्या सेवा केवळ ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांसाठी उपलब्ध करावयाच्या आहेत असे नसून जे वाचक ग्रंथालयात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठीही ग्रंथालय सेवांची पूर्ती होणे आवश्यक आहे. ग्रंथालयात यासाठी महत्त्वाची दुर्मीळ पुस्तके, वर्तमानपत्रातील बातम्या, मासिकामधील लेख अशा प्रकारची महत्त्वाची, संग्रहित केलेली माहिती व्यवस्थितरित्या स्कॅन करून ग्रंथालयाच्या सर्व्हरवर अपलोड केली आहे. त्यामुळे सभासदांना ती वाचणे सोयीस्कर झाले आहे. ग्रंथालयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देण्याच्या तयारीकरिता येतात. यासाठी ग्रंथालयाने काही महत्त्वाच्या विषयांची वृत्तपत्रीय कात्रणे वाचकांना हाताळता यावी याकरिता त्यांची व्यवस्थितरित्या बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थी, संशोधक यांच्याकरिता अद्ययावत माहितीकरिता नियतकालिकांची बांधणी करून संदर्भाकरिता ठेवली आहेत. ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, गॅझीटीयर, ॲटलास, इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरून नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात.

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथालय असून बदलत्या परिस्थितीनुसार सभासदांना आवश्यक असणाऱ्या सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. जे वाचक ग्रंथालयात येऊ शकत नाहीत त्यांच्या साठीही ग्रंथालय सेवांची पूर्तता केली जाते.

या व्यतिरिक्त महत्त्वाची दुर्मीळ पुस्तके, वर्तमानपत्रातील बातमी, मासिकामधील लेख अशा प्रकारची महत्त्वाची, संग्रहित केलेली साधने यांचा कागद खूप जुना होऊन ठिसूळ बनल्याने त्याची प्रतिलिपी सुद्धा काढता येत नाही. याकरिता हे वाचनसाहित्य भविष्यात इतरांसाठी संग्रहित करण्यासाठी त्यांना व्यवस्थितरित्या स्कॅन करून ते ग्रंथालयाच्या OPC वर अपलोड केले आहे. त्यामुळे सभासदांना वाचण्यास सोयीस्कर झाले आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालयामध्ये सभासदांना सेवा जलद, अद्ययावत व अचूक पुरविल्या जाव्यात या करिता ग्रंथालयामध्ये SLIM21 हे सॉफ्टवेअर घेतले आहे.

### ग्रंथालयाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवा:

**ग्रंथालय तालिकेची व्याप्ती** (Cataloguing) : ग्रंथालयात तालिकेचा उपयोग प्रामुख्याने ग्रंथाचे स्थान शोधण्यासाठी केला जातो. तालिकेमध्ये ग्रंथाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशकाचे नाव, ग्रंथाचे प्रत्यक्ष चित्र, ग्रंथाची प्रस्तावना, विषयसूची, प्रकाशन व प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाचे वर्ष, वर्गांक, की-वर्डस् (Key Words) या आधारे ग्रंथ शोधू शकतो.

**देव घेव सेवा** (Circulation) : ग्रंथालयातील सभासदांची वर्गवारी तसेच नोंद केली जाते. प्रत्येक वाचकांना त्यांचे बारकोडसहित ओळखपत्र अज्ञावालीद्वारे निर्मित केले जातात. ज्या वेळेस वाचक ग्रंथालयात येतो त्यावेळेस तो ते ओळखपत्र ग्रंथपालास देतो ग्रंथपाल त्यास बारकोड मशीन (barcode scanner) द्वारे पडताळणी करून नवीन ग्रंथ त्यास देतो अथवा घेतो व ही सर्व माहिती अज्ञावली लगेच समोर दाखवते व त्यानंतर गेट पास तयार होतो व वाचकाला ग्रंथ दिला जातो.

**संदर्भ सेवा** (Reference Service)**:** ग्रंथालयामध्ये नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, तसेच इतर अभ्यास विषयक ग्रंथांच्या स्वरूपात सदर सेवा दिली जाते. हे संदर्भ ग्रंथ सभासदांना ग्रंथालयामध्ये बसूनच वाचावे लागतात. ग्रंथालयामध्ये तत्त्कालिक आणि व्यापक अशा दोन स्वरुपाची संदर्भ सेवा दिली जाते. वाचक / सभासदांची गरज पाहता माहिती मिळवणे लगेच शक्य असल्यास तत्काळ माहिती पुरविली जाते. अन्यथा मुदत देऊन पुन्हा विचारणा करण्यास वाचकांना सांगितले जाते.

ग्रंथालयात उपलब्ध असलेले संदर्भ ग्रंथ, तसेच संपूर्ण ललित व ललितेतर ग्रंथांचा येणाऱ्या प्रत्येक वाचकाला मुक्तद्वार पद्धतीमुळे हाताळता येतात.

**रेफरल सेवा** : ग्रंथालयांमध्ये उपलब्ध नसणाऱ्या माहितीसाठी जेथे माहिती उपलब्ध असते, अशा स्रोतांचा संदर्भ दिलेला आहे.

करंट अवेअरनेस सर्व्हिस अद्ययावततेच्या दृष्टीने नियतकालिके, नवीन ग्रंथ, अहवाल, दृकश्राव्य अशा साधनांची यादी वाचकांसाठी अंतर्गत वेबवर प्रदर्शित केली जाते.

**वृत्तपत्र कात्रण सेवा :** संशोधक किवा विद्यार्थांना योग्य वेळी योग्य माहिती कमी वेळात देता यावी याकरिता ग्रंथालयात विशेष प्रकारे माहिती संघटित करू ठेवली आहे. ग्रंथालयात वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींची कात्रणे करून त्यांच्या फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. तसेच झेरॉक्स काढून त्यांना व्यवस्थितरित्या बाईंडिंग करण्यात आल्या आहेत त्यांची यादी खालील दिलेल्या प्रमाणे:-

१) १८५७ चा इतिहास
२) हीरक महोत्सव महाराष्ट्र, २००७
३) हिंदुस्तान टाइम्स इन मुंबई,२००७ : मुंबई मेट्रो, मुंबई एअरपोर्ट, मुंबई सिटी ट्रान्सफॉरमेशन प्रोजेक्ट
४) मुंबईत रेल्वेवरील अतिरेकी हल्ला, ११ जुलै २००६
५) मुंबई राज्यात पावसाचा धुमाकूळ, २६ जुलै २००५
६) २६ नोव्हेंबर २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला
७) अयोध्येत राममंदिर उभारणी बाबतीत निकाल, २०१०
८) साहित्य संमेलन २००३-२०१०
९) पुरस्कार (२००२-२००६) : साहित्य अकादमी पुरस्कार, भारत रत्न, नोबेल, ज्ञानपीठ, महाराष्ट्र भूषण
१०) पुरस्कार (२००६-२००९) : महात्मा फुले समता पुरस्कार, पद्मश्री, उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार नोबेल पुरस्कार
११) पुरस्कार (२००९-२०१२) : आल्फ्रेड नोबेल, झी गौरव, जीवन गौरव, भारतरत्न, कला गौरव, कालातिलक, महाराष्ट्र भूषण, आदर्शशिक्षक, गोदागौरव
१२) मराठा आरक्षण मोर्चा २०१७
१३) मराठा आरक्षण मोर्चा २०१८
१४) मा. अटलबिहारी वाजपेयी (१९२४-२०१८)
१५) पावसाळा २०१८
१६) वी. एस. नायपॉल (नोबेल पुरस्कार विजेते)
१७) Stephen Hawking
१८) पावसाळा २०१९ (कोल्हापूर- सांगली पूर
१९) काश्मीर कलम ३७०
२०) लोकसभा / विधानसभा निवडणूक
२१) नागरिकत्व सुधारणा कायदा (C), २०१९

**उपयुक्त नियतकालिके:** ग्रंथालयात येणारे सभासद हे संशोधक, MPSC, UPSC अशा स्पर्धा परीक्षा देण्याच्या तयारी करिता येतात. स्पर्धा परीक्षेच्या सभासदांना तसेच संशोधन करणाऱ्या सभासदांना हवी असलेली माहिती योग्य प्रकारे देण्यात येत असते. यासाठी ग्रंथालयाने काही महत्त्वाच्या नियतकालिकांची व्यवस्थितरित्या बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता ठेवण्यात आल्या आहेत.

१) Bulletin Unique cademy
२) Pratiyogita Darpan
३) Kurukshetra
४) Yojana
५) Seminar
६) Competition Success Review
७) The Economist
८) Economic Political Weekly
९) Foreign ffair
१०) Business India
११) Front Line
१२) Science Reporter
१३) Sanctuary sia
१४) पंचधारा
१५) साधना
१६) सत्याग्रही विचारधारा
१७) समाजप्रबोधन पत्रिका
१८) नवभारत
१९) साहित्य सूची
२०) स्वतंत्र नागरिक
२१) चाणक्य मंडळ
२२) यशाची परिक्रमा
२३) चित्रलेखा

**नवीन ग्रंथांची यादी:** ग्रंथालयात नव्याने आलेल्या

ग्रंथांच्या कव्हर पेची कलर प्रिंट काढून वाचकांसाठी फलकावर लावल्या जातात. त्यामुळे नवीन ग्रंथांची माहिती ग्रंथप्रेमी वाचकांना मिळू शकेल.

**ओपेक सेवा** (OPC Services) : ऑनलाईन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग (OPC) ओपेकच्या साहाय्याने ग्रंथसूचीय माहिती अधिक सक्षमतेने मिळविणे शक्य झाले आहे. यामुळे ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथाची तालिका मिळते. सभासदाना/ वाचकांना / विद्यार्थ्यांना कोणत्याही ठिकाणाहून, कमी वेळेत आणि योग्य तो ग्रंथ व माहिती मिळविणे सोयीचे झाले आहे.

**ग्रंथालयाचे नियम:** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतः च्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरून त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहेः

**१. सर्वसाधारण सभासद:–** सर्वसाधारण सभासदाकरिता रु. ५००/– वार्षिक वर्गणी तसेच रु. ५००/– अनामत रक्कम (१९९६)

**२. विद्यार्थी सभासद:–** महाविद्यालयीन/ उच्चशिक्षण/ संशोधन विद्यार्थ्यांकरिता वार्षिक रु. ५०/– नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु.१००/–

३. यशवंतराव चव्हाण ग्रंथलायामध्ये संदर्भाकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून रु. ५०/– फक्त एका आठवड्याकरिता फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डावर त्यांची वैयक्तिक माहिती भरून घेण्यात येते.

४. माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता वेगळी फी आकारत नाही.

**अ) संयुक्त संस्था सभासदत्व** (Corporate Membership): कॉर्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वसाठी पत्र असेल. एकावेळी वर्गणी रु. ५०,०००/– ५ वर्षासाठी.

अनामत रक्कम : सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येत नाही. परंतु एखाद्या दुर्मीळ व किंमती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी अनामत रक्कम घेण्यात येईल.

एका वेळी देण्यात येणारी पुस्तके: एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

**ब) संस्था सभासदत्व :** यासाठी शिक्षण व संशोध संस्था व सांस्कृतिक संस्था पत्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी, आयसीएसएसआर किंवा आयसीएचआर यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी. तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभासदत्वासाठी :** प्रवेश फी रु. १,०००/– ना परतावा

**वार्षिक वर्गणी :–** रु. ५,०००/–

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद:** एकावेळी ५ वर्षासाठी वर्गणी रु. २०,०००/–

**एकावेळी देण्यात येणारी पुस्तके:** एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. अ व ब नुसार सभासदत्व हे सबंधित संस्थेस प्रमुखास देण्यात येईल.

त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्याच्या वतीने पुस्तके घेण्यास/ प्रत करण्यास नामनिर्देशित करू शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन काणे यांची जबाबदारी संस्था प्रमुखाची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

**५) सर्वसाधरण सभासद:** सभासदाला एकावेळी एक पुस्तक/ ग्रंथ देण्यात येईल. ते ८ किंवा १५ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामतरक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकाच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरून पुस्तक घरी नेता येईल.

६) महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/ संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ ग्रंथालयाबाहेर नेण्याकरीता देण्यात येणार नाही.

**७) ग्रंथालयाच्या वेळा व सुट्ट्या:** सकाळी ११.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यत ग्रंथालय वाचाकांकरिता तसेच पुस्तके परत करणे/ नवीन घेणे यासाठी उघडे राहील. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय चालू राहील.

८) सभासदाचे कार्ड हरविल्यास त्यांना पुस्तक देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वतः

च्या हस्ताक्षरात अर्ज करून ग्रंथालयास सादर करावा. त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केल जाईल.

९) सभासदांकडून ग्रंथ हरविल्यास त्यांना १५ दिवसात नवीन खरेदी करून द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाची अद्ययावत रक्कम मूल्याइतकी रक्कम अनामत रकमेतून कमी करण्यात येईल व गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदास भरावी लागेल. अनामत रकमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

१०) सभासद ग्रंथालयामध्ये शांतता राखावी, आपसामध्ये किंवा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करणे टाळावे, धूम्रपान, थुंकणे, झोपणे याकरिता मनाई राहील. ग्रंथालयात मोबाईल फोन बंद ठेवावे.

११) ग्रंथालयातून बाहेर पडताना सभासदास दिलेल्या ग्रंथाचा वर्गांक, दाखलअंक ग्रंथालयाच्या गेटवर तपासला जाईल.

१२) सभासदास ग्रंथालयाचे सभासद राहावयाचे नसल्यास त्यांनी तसा लेखी अर्ज द्यावा. त्यासोबत कार्ड परत करावे. त्यांवर निर्णय घेऊन इतर येणे नसल्यास अनामत रक्कम बिनव्याजी वजा करण्यात येईल. ◆◆

**वाचकांची भूमिका खऱ्या अर्थाने स्पर्धातीत व टिकून राहणारी भूमिका आहे. नवनिर्मितीचे सर्जनशाली कार्य जसे शब्द करतात, तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळवण्याचे सामर्थ्यही शब्दात आहे. कल्पना, विचार आणि शब्द यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील एक जबरदस्त शक्ती आहे. शब्द हे साहित्यिकांचे प्रमुख शस्त्र आहे. तर मी ज्या कार्यक्षेत्रात गेली जवळजवळ पन्नास वर्षे क्रियाशील आहे, त्या राजकारणाचेही प्रमुख माध्यम शब्दच आहेत. या अर्थाने साहित्यिक व राजकारणी शब्दबंधू आहेत. शब्दांचे आणि आमचे हे साहचर्य व सौहार्द पुराने आहे. साहित्याच्या क्षेत्राशी काही नाते सांगावयाचे असेल तर तेवढेच आहे.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी

## फेब्रुवारी ते जुलै २०२०

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीकडून फेब्रुवारी ते जुलै २०२० दरम्यान पुढील विविध प्रशिक्षण वर्ग व कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कोविड-१९ महामारीमुळे मार्च महिन्याच्या अखेरीस देशात झालेल्या टाळेबंदीमुळे ह्यावेळी मुलांनी आणि प्रबोधिनीने कामाच्या पद्धतीमध्ये आलेला बदलही अनुभवला.

### पी जी डॅक (केंद्र सरकारचा प्रमाणित कोर्स)

१. सी-डॅक कडून पी जी डॅक कोर्सच्या वर्षाला दोन बॅचेस सुरू होतात. एक फेब्रुवारीमध्ये आणि दुसरी ऑगस्ट महिन्यात.

२. या वर्षीची फेब्रुवारी बॅच १८ फेब्रुवारी २०२० ला सुरू झाली. या बॅचमध्ये ९७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. ही बॅच ऑगस्ट २०२० ला पूर्ण होणार होती. पण, वैश्विक महामारीच्या परिस्थितीमध्ये सी-डॅकने बॅचला स्थगिती दिली. अनेक ऑनलाईन बैठकींनंतर सी-डॅकच्या मार्गदर्शनानुसार १५ जुलैला कोर्सचे ऑनलाईन वर्ग सुरू करण्यात आले. हा अनुभव मुलांसाठी नवीनच होता तरीही सर्व शिक्षकांनी आणि मुलांनी स्वतःला त्या साच्यात व्यवस्थित बसवले.

३. पी जी डॅक - फेब्रुवारी बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वर्ग तसेच त्यांच्या व्यक्तीविकासाकरिता ग्रुप डिस्कशन, मुलाखत सराव, योग्यता प्रश्नावली इत्यादी ऑनलाईन कार्यक्रम सुरू आहेत.

४. या कोर्समध्ये संगणकीय भाषा (कोडिंग लँग्वेजेस उदा सी प्लस प्लस/ जावा/ एमएस एनईटी इ.) शिकविल्या जातात. त्याच्या परीक्षा घेण्यासाठी एआयटीने स्वतःच्या सर्वरवर सोय केली आहे.

५. ही बॅच फेब्रुवारी २०२१ पर्यंत संपेल.

६. पीजी डॅक कोर्सची नवीन ऑनलाईन बॅच ऑगस्ट ऐवजी २९ सप्टेंबर २०२० ला सुरू होणार आहे. बॅचमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी पूर्व परीक्षा (सी-कॅट) २९ व ३० ऑगस्टला ऑनलाईन घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी www.ycpait.org ही वेबसाईट पाहावी.

७. महामारीचे संकट लक्षात घेता हा संपूर्ण अभ्यासक्रम ऑनलाईन असणार आहे आणि तोही अर्ध्या फीमध्ये दिला जाईल. कोर्सनंतर विद्यार्थ्यांना नोकरीसाठीदेखील मदत केली जाणार आहे.

### प्लेसमेंट

८. पीजी डॅक ऑगस्ट २०१९ च्या विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट फेब्रुवारी २०२० मध्ये सुरू करण्यात आली. CYBAGE SOFTWRE, 3i INFOTECH, ETP INTERNTIONL, Corecard, EzyTek Consulting Pvt. Ltd. ACCELYA या सारख्या जवळजवळ १०० कंपन्यांची उपस्थिती होती. मार्च महिन्यानंतर मात्र ह्या सर्व कंपन्यांनी प्लेसमेंट प्रोसेस ऑनलाईन करण्याच्या निर्णय घेतला. सर्वत्र टाळेबंदी असूनही मुलांच्या ऑनलाईन प्लेसमेंट प्रोसेस सुरूच होत्या, ही मुलांसाठी फायद्याची बाब ठरली.

### एम के सी एल चे कोर्सेस

९. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे MS-CIT व KLiC Certificate Courses प्रबोधिनीमध्ये घेतले जातात. या कोर्सेससाठी दर महिन्याला नवीन बॅच सुरू केली जाते. सद्य परिस्थिती पाहता MKCL ने सर्व वर्ग ऑनलाईन सुरू केले. Covid 19 आणि लॉकडउनच्या परिस्थितीमध्ये MKCL च्या मार्गदर्शनानुसार MS-CIT व KLiC Certificate Ccourses चे Online वर्ग सुरू करण्यात आले.

10. KLiC Certificate Courses हे व्यावसायिक शिक्षण देणारे कोर्सेस आहेत. या कोर्सेसची विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत होते. हे कोर्सेस आता मुलांना घरी बसून करता येतील आणि त्याचा घरच्या घरी काम मिळवण्यास फायदा होईल.

११. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीकडून मल्टीमीडिया आणि ॲनिमेशनचे खास वर्ग या काळात घेण्यात आले. मल्टी मीडियामध्ये विद्यार्थी Adobe Photoshop, Adobe Illustrator, Adobe Flash, 3D Animation etc. शिकतात.

### उद्दिष्ट :

१२. प्रबोधिनीतर्फे लष्कर आणि पोलीसखात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फीमध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधासुद्धा देण्यात येते.

१३. गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी प्रबोधिनी देते. अनेक कोर्समध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो.

१४. वेगवेगळ्या कार्यक्रमांद्वारे तसेच इतर संस्थांच्या साहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणवर्ग चालवणे, हेच प्रबोधिनीचे उद्दिष्ट आहे. ◆◆

# विभागीय केंद्र, नाशिक

**चित्रपट चावडी**
**'मर्डर ऑन द ओरीयंट एक्सप्रेस'**
**शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२०**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक सिडने ल्युमेट यांचा 'मर्डर ऑन द ओरियंट एक्सप्रेस' हा चित्रपट दाखविण्यात आला. कादंबरीकार अॅगाथा ख्रिस्ती यांच्या कादंबरीवर आधारित त्याच नावाचा हा चित्रपट होता. बेल्जियमचा गुप्तहेर व्हर्क्युल पॉयरॉटवर ओरीएंट एक्सप्रेस ट्रेनमध्ये अमेरिकन व्यावसायिकाच्या हत्येच्या शोधाची जबाबदारी देण्यात येते. रहस्यमयता आणि भयपटाची आठवण करून देणारी ही कलाकृती मानवी मेंदूच्या कल्पित आणि वास्तवाचा शोध घेते व चक्रावून टाकते, अचंबित करते. बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरलेला व अनेक पुरस्कारप्राप्त हा चित्रपट होता. १९७४ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १३१ मिनिटांचा होता.

**सूर विश्वास**
**मधुरा बेळे (गायिका)**
**शनिवार, २२ फेब्रुवारी २०२०**

विश्वास ग्रुपतर्फे 'सूर विश्वास'च्या मैफिलीचे १३ वे पुष्प मधुरा बेळे यांनी गुंफले. रसिक कुलकर्णी (तबला), संस्कार जानोरकर (संवादिनी) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. 'विश्वास ग्रुप'चे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक असून, संकल्पना विनायक रानडे यांची आहे. मैफिलीची सुरुवात भैरव रागाने झाली. शब्द होते 'बालमवा मोरे सैंय्या.' मनातील आर्तता आणि प्रेमाच्या व्यापक विचारांचे दर्शन समर्पण भावनेतून समोर आले. गायनातील सहजता व आर्त स्वरांनी मैफिलीला रंग चढला. त्यानंतर कुकुभ बिलावल-राग सादर केला. झपताल-घनघुमार होता. जाणिवांनी आतल्या ऊर्मीला दिलेली साद आनंदस्वरांची पर्वणीच होती.

मैफिलीचा समारोप संत ज्ञानेशरांच्या अभंगाने केली. 'पडिले दूर देशी, मज आठवे मानसी' यातून आत्मानुभूती आणि ईश्वर भक्ती यांचा अनोखा संगम व्यक्त झाला. ही नव्या उन्मेषाने जगण्याची प्रार्थनाच होती. उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तिंचा सन्मान 'सूरविश्वास' मैफिलीत करण्यात येतो. त्यात नागपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय टायगरमॅन ह्या ट्रायथलॉन स्पर्धेत वयाच्या ६४व्या वर्षी प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल डॉ. सुभाष पवार यांचा सन्मान 'विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इस्टिट्यूट'चे अध्यक्ष डॉ. मनोज शिंपी यांनी केला. श्रीमती बेळे यांचा सन्मान डॉ. विजयालक्ष्मी गणोरकर यांनी केला. रसिक कुलकर्णी यांचा सन्मान ओझर मर्चंट बँकेचे संचालक रत्नाकर कदम तर संस्कार जानोरकर यांचा सन्मान राहुल फाटे यांनी केला. स्वराली जोगळेकर यांचा सन्मान 'माधव बाग'च्या आरोग्य समन्वयक मधुरा गुर्जर-वाणी यांनी केला. पंडित अविराज तायडे यांचा सन्मान विश्वास ठाकूर यांनी केला.

**चित्रपट चावडी**
**'दि ट्रेन'**
**शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२०**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक सिडने ल्युमेट यांचा सुप्रसिद्ध दिग्दर्शक जॉन फ्रँकनहायमर व आर्थर पेन यांचा 'दि ट्रेन' हा चित्रपट दाखविण्यात आला. दि ट्रेन हा अमेरिकन युद्धपट असून रोझ व्हॅलँड लिखीत 'ले फ्रंट डीलार्ट' या पुस्तकावर आधारित आहे. आधुनिक चित्रकलेतील अभिजात चित्रांचा खजिना जर्मनीला पाठवण्याची तयारी सुरू असते. परंतु, त्यासाठी ही रेल्वे काही काळासाठी उशिरा पाठविण्याची गरज आहे. परंतु, हा निर्णय चित्रे नेण्यासाठी धोकादायक ठरू शकतो का, इतक्या महत्त्वाच्या कलाकृतींचा पुढील प्रवास कसा होतो, हे दर्शविणाऱ्या या युद्धपटात अॅक्शन, थरारक प्रसंग, संवाद यांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. जर्मनीतील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाची जाणीव येथे समोर येते. १९६४ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १३१ मिनिटांचा होता. चित्रपटास अश्विनी वाघ, दिलीप पाटील, विजय अहलुवालीया, चंद्रशेखर कुलकर्णी व चित्रपट रसिक उपस्थित होते.

## जागतिक महिला दिन

आजच्या धावपळीच्या युगात महिलांनी आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे असून मनाची व शरीराची काळजी घेणे म्हणजेच जीवनाचा आनंद घेण्यासाठी सक्षम होणे होय. त्यासाठी जीवनसत्वयुक्त आहार, व्यायाम व सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कल्पना सुधीर संकलेचा यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला व आरोग्य' या विषयांवर डॉ. सौ. संकलेचा यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम 'विश्वास हब' येथे संपन्न झाला. डॉ. सौ. संकलेचा यांनी यावेळी ॲनेमिया, फायब्रॉइड, विविध कॅन्सर या आजारांची लक्षणे व वेळीच घ्यायची काळजी तसेच रक्तदाब, हिमोग्लोबिन, बोन डेन्सिटी या तपासण्यांची गरज सांगितली व उपस्थित महिलांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करताना विश्वास ठाकूर म्हणाले की, कुटुंबाला घरपण देणारी महिला, अनेक आघाड्यांवर मेहनतीने, निरपेक्षपणे लढत असते. तिचे आरोग्य उत्तम तरच कुटुंबाचे आरोग्य उत्तम असते. म्हणूनच महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. यावेळी कोरोना व्हायरस विषयी जनप्रबोधनपर माहिती व उपायांविषयी माहिती देण्यात आली. बँकेच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना हँड सॅनिटायझर, ग्लव्हजचे वाटप करण्यात आले. डॉ. सौ. संकलेचा यांचे स्वागत वैशाली जामदार यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी बँकेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सारिका देशपांडे, प्रियांका ठाकूर आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❖ ❖ ❖

## 'गझलदीप' मैफल

मराठी-उर्दू-हिंदी शायरांनी जगण्याचं प्रतिबिंब आपल्या लेखनातून तरलपणे मांडले आणि साहित्यविश्व समृद्ध केले. सर्वसामान्यांच्या कष्टप्रद जीवनाला चव दिली, आशय दिला. शब्दांच्या विलक्षण छटा आणि जीवनाचे तत्त्वज्ञान दिले. माधव ज्युलियन, सुरेश भट, फैज, मीर, हसरत मोहानी, गुलाम अली अशा शायरांच्या एकाहून एक सरस गझलांतून गझलकार प्रदीप निफाडकरांनी सायंकाळ सोनेरी केली. निमित्त होते 'गझलदीप' मैफिलीचे.

'उष:काल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली...' अशी चेतना जागवणारे सुरेश भट आणि तितक्याच तरलपणे प्रेमाची महतीही भटांनी विषद केली. कवी असतो म्हणून झाडं बहरतात असा आशावाद निफाडकरांनी गझलेतून मांडला. सूर्याला सकाळी उठवण्याचे काम किंवा चंद्राला निजवण्याचे काम कवी आपल्या शब्दांतून करतो आणि आपले वेगळेपण व्यक्त करतो, प्रतिभेची ताकद व शक्यता व्यक्त करतो. कवीचं जगणं असो किंवा सामान्यांची जगरहाटीची वाताहातही कवी प्रभावीपणे शब्दांतून मांडतो व ते नंतर जीवनाचे सार होते.

महाराष्ट्राचे थोर शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०७ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला सुप्रसिद्ध गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या 'गझलदीप' या कार्यक्रमाचे आयोजन 'विश्वास हब' येथे करण्यात आले होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिकचे पोलीस अधीक्षक सुनील कडासने यावेळी म्हणाले, भाषा ही माणसांधील पूल आहे. त्यातून माणूस जोडण्याचे काम होते. एकमेकांविषयी आपुलकी, विश्वास निर्माण होतो. भाषा ही आईसारखीच असून ती प्रेम, वात्सल्य यांचा अनोखा मिलाफ आहे. मराठी, हिंदी, उर्दू यांच्या समन्वयातून जीवनाचा नवा अर्थ रसिकांना सापडत असतो. अनेक शायरांनी एकात्मभावाची, समानतेची शिकवण दिली व नवा विचार दिला. यावेळी श्री. कडासने यांनी उर्दू, हिंदी भाषेच्या बंधुत्वाची ओळख विविध शेर व कवितांतून करून दिली व रसिकांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. श्री. कडासने यांचा परिचय डॉ. हरीभाऊ कुलकर्णी यांनी करून दिला. त्यांचा सन्मान बी.एस.एन.एल.चे वरीष्ठ महाप्रबंधक नितीन महाजन यांनी करून दिला. निफाडकर यांचा परिचय यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नाशिकचे कोषाध्यक्ष डॉ. सुधीर संकलेचा यांनी केला. त्यांचा सन्मान डॉ. मनोज शिंपी यांच्या हस्ते करण्यात आला. मा. डॉ. सुभाष पवार यांचा निफाडकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास विश्वास को-ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील, कवी संजय चौधरी, नरेश महाजन, राजेश्वर सूर्यवंशी, सौ. रश्मी अंधारे, प्रदीप जोशी, उदय जोशी, सुनील भणगे, प्रज्योती शेलार, धनंजयराव थेटे, प्रवीण बिडवे, फ्रान्सिस वाघमारे, शशांक हिरे, प्रसाद कुलकर्णी, इर्शाद वसीम, अख्तर पठाण, गुलशनाबादी, सुशिला संकलेचा, डॉ. गिरीश औताडे, अश्विनी बोरस्ते, ॲड. मिलींद चिंधडे,

अलका जोशी, सतीश बोरा, नीरजा साठे, रघुनाथ साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

✧ ✧ ✧

## चित्रपट चावडी
## 'नाईट ट्रेन'

**शुक्रवार, १३ मार्च २०२०**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक जर्झी कावलेरोविच यांचा 'नाईट ट्रेन' हा चित्रपट दाखविण्यात आला. गर्दीने भरलेल्या एका रेल्वेत एक स्त्री व एक पुरुष येतात. त्याच डब्यात पोलीस एका गुन्हेगाराला शोधण्यासाठी येतात आणि एक रोमांचक थरार असलेले नाट्य उभे राहते.

रहस्य, भय, गूढता, प्रेम यांचा संगम असलेला हा चित्रपट अभिजात म्हणून गौरविला गेला आहे. जर्झी कावलेरोविच १९५९ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १०० मिनिटांचा होता.

✧ ✧ ✧

## चित्रपट चावडी
## 'अतासी'

**शुक्रवार, १७ जुलै २०२०**

मुंबई इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल २०२०, केरळ लिटरेचर फेस्टीवल, आंतरराष्ट्रीय लघुपट माहितीपट महोत्सवात आलेला केरळ, कोलकाता आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवलमध्ये गौरविण्यात आलेला अतासी हा डॉक्युफिक्शन ऑनलाईन दाखविण्यात आला. मानसिक आरोग्याकडे बघण्याचा दृष्टीकोन समाजात बदलला आहे, याकडे लक्ष वेधणारा हा डॉक्युफिक्शन आहे. 'सत्यजीत रे फिल्म अँड टेलिव्हिजनचे इन्स्टिट्यूट'चे सहयोगी प्राध्यापक पुतुल महमूद यांचे दिग्दर्शन आहे. अतासी नावाच्या एका युवतीची ही कहाणी आहे, जिने बऱ्याच वर्षाच्या भावनिक आणि शारीरिक अत्याचारानंतरही बरे होण्याचे सामर्थ्य मिळवले आहे.

✧ ✧ ✧

## कोविड रुग्णांसाठी पुस्तकांची अनोखी भेट

**शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२०**

समाजाचं दु:ख, हे आपल्या जवळच्या व्यक्तिचे आहे. आणि त्या जाणिवेतून अनेक सेवाभावी संस्था, व्यक्ती ह्या प्रशासनाचा मदतीचा हात झाल्या आहेत. त्यातूनच कृतीशील कार्याचे योगदान मिळत आहे. हे दिलासा देणारे आहे. सर्व जनतेचे सुरक्षेविषयक नियमांचे पालन करावे आणि कोविड रोखण्यासाठी सहकार्य करावे. विश्वास ग्रुप सारख्या संस्था याकामी पुढाकार घेत आहेत हे अभिनंदनीय आहे, असे प्रतिपादन नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त राधाकृष्ण गमे यांनी केले. विश्वास ग्रुप व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, ग्रंथ तुमच्या दारी यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या कोविड हॉस्पिटलला ३०० पुस्तके भेट देण्यात आली. त्याप्रसंगी श्री. गमे यांनी हे विचार व्यक्त केले. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी याकामी पुढाकार घेतला.

यावेळी बोलताना श्री. ठाकूर म्हणाले, कोविड हे आपल्या सर्वांवर आलेले संकट असून ते दूर करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा. सोशल डिस्टन्सिंगबरोबरच मनाचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही. त्यामुळे मन आनंदी राहण्यासाठी मदत होईल. महानगरपालिकेतर्फे जनतेसाठी आरोग्यसुविधा तातडीने उपलब्ध होत आहेत हे निश्चितच सर्वसामान्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे आहे. यावेळी 'ग्रंथ तुमच्या दारी'चे शिल्पकार विनायक रानडे उपस्थित होते.

✧ ✧ ✧

**वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे चिंतन करावे लागते कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू शकणार नाही.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# विभागीय केंद्र, ठाणे

रविवार दि.१६.०२.२०२० रोजी 'बहुभाषा काव्यसंमेलना'चे आयोजन केले होते. या कार्यक्रमात मराठी, हिंदी, गुजराथी, कोंकणी व गझल प्रकारातील नावाजलेल्या कवींनी कविता सादर केल्या.

डॉ. महेश केळुसकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संध्येची सुरुवात ज्येष्ठ कवी श्री. शशिकांत तिरोडकर व श्री. दिलीप सावंत यांनी मराठी कवितेने केली तर हिंदीतील श्री. हरी मृदुल यांनी त्यांच्या हिंदीतील गाजलेल्या कवितांचे सादरीकरण करून लोकांना मंत्रमुग्ध केले. सौ. प्राजक्ता सामंत यांच्या मालवणी कविताना लोकांनी उस्फूर्त दाद दिली. सौ. राजुल भानुशाली यांनी गुजराथी तर फिलोमीना सामफ्रान्सिस्को यांनी कोंकणी कविता सादर केल्या. गझलकार गोविंद नाईक यांच्या गझलांनी रसिकांची मने जिंकली.

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त रविवार दि.१५ मार्च २०२० रोजी सायंकाळी ५ वाजता ठाणे नगरवाचन मंदिर, टेंभी नाका, ठाणे(प) येथे यशवंतराव चव्हाण साहेबांनी वेणूताईंना लिहिलेल्या पत्रांचे अभिवाचन (निवृत्त प्राध्यापिका डॉ.वसुधा सहस्रबुद्धे व श्री. मकरंद सावंत) करण्याचे योजिले होते.त्यासंदर्भातील आरक्षणे, निमंत्रण व वर्तमानपत्रात प्रसिद्धी देखील देण्यात आली होती. परंतु, लॉकडाऊनमुळे हा कार्यक्रम रद्द करावा लागला. तो योग्य वेळी आयोजित केला जाणार आहे.

शनिवार दि.११ एप्रिल २०२० रोजी 'अनघोत्सव' या साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन अनघा प्रकाशन या संस्थेबरोबर संयुक्तरित्या करण्याचे योजिले होते. या कार्यक्रमात अनघा प्रकाशनाची १२ पुस्तके जागतिक मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री. रामदास फुटाणे व श्री. दिलीप पांढरपट्टे (भाप्रसे), महासंचालक, माहिती व प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत करण्याचे योजिले होते. यावेळी गझलनवाज श्री. चंद्रशेखर सानेकर यांच्या 'गझल टॉकीज' या आगळ्यावेगळ्या गझल कार्यक्रमाचेदेखील आयोजन केले होते. त्यादृष्टीने सर्व आरक्षणे झाली होती परंतु लॉकडाऊनमुळे हा कार्यक्रमदेखील पुढे ढकलावा लागला.

एप्रिल महिन्यात मा. कार्याध्यक्ष सौ. सुप्रियाताई सुळे यांच्याशी झूम मीटिंगद्वारे तर कधी श्री. सुरेश पाटील यांच्या माध्यमातून संस्थेचे सचिव श्री. अमोल नाले यांनी संवाद साधून ठाणे पूर्व येथील ज्या लोकांकडे रेशनकार्ड नाही, अशा गरजू कुटुंबांना रेशनिंग मिळवून द्यावयाचे काम केले. महाराष्ट्र शासनाने सुरुवातीला दिलेल्या (कणीक, तांदूळ, डाळ, तेल, साखर) वस्तूंचे विभागात वाटप केले.

मे महिन्यात महाराष्ट्र शासनाने दिलेल्या (मसूर, मटकी, मूग, चणे, तेल) या वस्तूंचे विभागात वाटप केले गेले.

माहे जून व जुलै मध्ये विलगीकरणामुळे कुठलेही नियोजित कार्यक्रम करता आले नाहीत.

**जातीयतेच्या अंधारामध्ये कोणालाही वर येता येणे शक्य नाही. का कोण जाणे? निव्वळ या कामासाठी आयुष्य वाहून घेण्याची जरुरी आहे असा तीव्र विचार माझ्या मनात येऊन गेला. हे कार्य संपवायचे म्हटले तर सर्वांनी पराकाष्ठा केली पाहिजे. नाहीतर आमच्या समाजात निराशेच्या अंधाराशिवाय दुसरे काहीच उरत नाही.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# विभागीय केंद्र, अंबाजोगाई

## यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ. आबादास घुले यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**दि. ११ मार्च २०२०**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान; मुंबई- केंद्र अंबाजोगाई व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त 'यशवंतराव चव्हाण - एक अष्टपैलू व्यक्तिमत्व' याविषयी प्रा. डॉ. आबादास घुले, अमरावती यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि. ११ मार्च २०२० राजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार पृथ्वीराज साठे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र अंबाजोगाईचे अध्यक्ष अनिकेत लोहिया, उपाध्यक्ष दगडू लोमटे, सचिव डॉ. नरेंद्र काळे, बबन लोमटे, अभिजीत जोंधळे, प्राचार्या वनमाला गुंडरे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. नरेंद्र काळे यांनी केले तर डॉ. घुले यांचा परिचय दगडू लोमटे यांनी करून दिला.

डॉ. घुले म्हणाले, यशवंतराव चव्हाण हे सर्वसामान्य माणूस राजकारणात आला पाहिजे, यासाठी कायम प्रयत्नशील होते. मानवतावादी दृष्टीकोन साहित्याची उपलब्धता सध्या नाही. यशवंतराव चव्हाण यांचे चरित्र 'कृष्णाकाठ' आज वैचारिक जडणघडणीसाठी वाचणे गरजेचे आहे. यावेळी कार्यक्रमात प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे, आमदार साठे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दिलीप भिसे यांनी केले, तर आभार प्रा. मुकुंद राजपंखे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र- अंबाजोगाई व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## स्वा. रा. ती. ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात एन ९५ मास्क सुपूर्द ३१ मार्च २०२०

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र-अंबाजोगाई व मानवलोक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना संसर्गापासून संरक्षण व बचावासाठी आवश्यक असे एन् ९५ मास्क स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर, नर्स व इतर कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी ३००० एन ९५ मास्क अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी मानवलोक संस्थेचे कार्यवाह तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र-अंबाजोगाईचे अध्यक्ष अनिकेत लोहिया, सचिव डॉ. नरेंद्र काळे, उपाध्यक्ष दगडू लोमटे, डॉ. राकेश जाधव उपस्थित होते.

❖ ❖ ❖

## बीड जिल्ह्यातील कोरोना रुग्णांना व आरोग्य सेवकांना पोषक आहार वाटप

**१ जून २०२०**

कोरोना रुग्णांना रोगावर मात करण्यासाठी औषधोपचरासोबतच सात्विक व पोषक आहाराची गरज असते, हे लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, केंद्र- अंबाजोगाई व 'मानवलोक, अंबाजोगाई' च्या वतीने बीड जिल्ह्यातील कोविड रुग्णांना पोषक आहार म्हणून सुका मेवा देण्यात आला. कोविड वॉर्ड मध्ये रुग्णांची काळजी घेणाऱ्या डॉक्टर, नर्सेस, वॉर्ड बॉय, सफाई कामगार इत्यादींना वॉर्डमधील ७ दिवसांच्या ड्युटीनंतर काही दिवस क्वारंटाईन (विलगीकरण) केले जाते. त्यामुळे या आरोग्य सेवकांसाठी देखील हा पोषक आहार देण्यात आला. या पोषक आहारात दहा दिवस पुरेल इतका सुका मेवा (बदाम, काजू, खिसमिस) बंद पिशवीतून देण्यात आले.

बीड जिल्ह्यातील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई व जिल्हा रुग्णालय, बीड येथे मुख्यत्वे कोविड पॉझिटिव्ह रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. त्यामुळे या दोन्ही रुग्णालयात पोषक आहाराची पाकिटे देण्यात आली.

हा उपक्रम कोविडची साथ आटोक्यात येईपर्यंत बीड जिल्ह्यात चालवण्यात येईल. यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई केंद्र अंबाजोगाईचे अध्यक्ष तथा मानवलोकचे कार्यवाह मा. अनिकेत लोहिया, उपाध्यक्ष मा. दगडू लोमटे, माजी आमदार उषाताई दराडे, अमर हबीब, कोषाध्यक्ष श्री. अभिजीत जोंधळे इ. प्रयत्नशील आहेत

❖ ❖ ❖

## कोविड बॅग वाटप दि. ९ जुलै २०२०

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, केंद्र- अंबाजोगाई व सांगाती संस्था - पुणे यांच्या वतीने सहा कोविड बॅग स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाईचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्याकडे देण्यात आल्या. त्यावेळी केंद्राचे सचिव डॉ. नरेंद्र काळे, श्री. बबन (भैय्या) लोमटे, केंद्राचे अध्यक्ष श्री. अनिकेत (भैय्या) लोहिया, श्री.प्रमोद भुंबे, श्री. सुनिल चिखले, श्री.बालाजी शेरेकर हे उपस्थित होते. आणखी सहा बॅग सिव्हिल हॉस्पिटल बीड यांना देण्यात येणार आहेत.

# विभागीय केंद्र, अहमदनगर

**एप्रिल २०२०**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र अहमदनगर व यशवंत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथदूत ही संकल्पना लॉकडाऊनच्या काळात राबविण्यात आली. या संकल्पनेमध्ये लॉकडाऊनच्या काळात ६५ गावात यशवंत वाचनालयाच्या माध्यमातून घरोघरी पुस्तके पोहोचवता आली. समाजातील सर्व घटकांनी वाचनाचा आनंद घेतला.

**मे २०२०**

कोविड-१९च्या आजारामुळे पेशंटला रक्ताची कमतरता भासू नये याकरिता रक्तदान करा असे आवाहन केले होते. त्यामुळे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र अहमदनगर अंतर्गत दिनांक २९ मे २०२० रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. नागरिकांनी या शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला.

**जुलै २०२०**

दिनांक २३ जुलै हा दिवस वनसंवर्धन दिन म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र अहमदनगर या प्रतिष्ठान अंतर्गत संपूर्ण नेवासा तालुक्यात वृक्षारोपणाची चळवळ राबविली गेली. त्या अंतर्गत नेवासा तालुक्यातील विविध गावांमध्ये वृक्ष लागवड करण्यात आली.

# विभागीय केंद्र, सोलापूर

**केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र सोलापूर, श्रमिक पत्रकार संघ सोलापूर आणि मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा आयोजित करण्यात आली. या चर्चेत ज्येष्ठ लेखापरीक्षक राजगोपाल मिनियार, बांधकाम व्यावसायिक राजेंद्र कासवा, टेक्सटाईल फौंडेशनचे राजेश गोसकी, यंत्रमाग धारक संघाचे पेंटप्पा गडम, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यांनी आपले विचार मांडले.

राजेंद्र कासवा यांनी 'जीएसटी हा विषय अर्थसंकल्पाचा भाग नाही, परंतु तो किती घाईने आणला तसेच सदर कायद्याचा अर्थ 'एक राष्ट्र एकच करप्रणाली' असा असताना कोणकोणते कर आजही लागू आहेत, तसेच सदर कायद्यात होणारे सततचे बदल-यामुळे होणारा त्रास,' यावर आपले विचार मांडले तर राजगोपाल मिनियार यांनी 'सार्वजनिक न्यासासाठी घेतलेली खबरदारी योग्य की अयोग्य तसेच करप्रणालीमध्ये केलेली दिशाभूल' विषद केली. वस्त्रउद्योगासाठी सरकारच्या नव्या धोरणात कोणत्या बाबी असल्या पाहिजेत यावर विचार मांडले. राजू राठी यांनी तरुणांना करप्रणाली समजावून सांगितली. या चर्चेत व्यापारी, पत्रकार, जाणकार व वाणिज्य व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

# विभागीय केंद्र, लातूर

## यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र लातूरच्यावतीने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, द्वैभाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे माजी उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०७ व्या जयंतीच्या निमित्ताने लातूर शहरातील महानगरपालिकेच्या आवारात असलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक, माजी कुलगुरू तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, लातूरचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. डॉ. वाघमारे यांनी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा दिला.

प्रतिष्ठानचे सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे, प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, ॲड. वसंतराव उगले, ॲड. शेखर हाविले, भीमराव दुनगावे, साहेबअली सौदागर, प्रबुद्ध कांबळे, डी. एच. सोनफुले, रमेश पिडगे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

## परिसंवादः महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

'प्रत्येक काळात आव्हाने असतातच. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळीही खूप मोठी आव्हाने होती. यशवंतराव चव्हाणांकडे महाराष्ट्राचे नेतृत्व होते. सन १९५७ ते १९६० हा अत्यंत संघर्षाचा काळ होता. महाराष्ट्रासमोर निधी, शिक्षण, दारिद्र्य अशी अनेक आव्हाने होती. यशवंतराव चव्हाण यांनी सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राला आर्थिक स्वातंत्र्य देण्याचे आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे उत्तुंग काम केले. बहुजनांची मुले शिकली पाहिजेत यासाठी ईबीसी सवलत मंजूर केली. राजकारणात तोच टिकून राहतो, जो आव्हाने पेलतो. राजकारणामध्ये सगळ्यांना सगळंच करावं लागतं, पण मिळवलेली सत्ता कोणासाठी वापरायची हे ज्याला कळलं तोच यशस्वी राज्यकर्ता ठरतो, असं ते म्हणत. विरोधकांनाही सन्मान देणारा नेता म्हणून त्यांचा लौकिक होता. विरोधी पक्षातील भाई उद्धवराव पाटील सभागृहात मत व्यक्त करताना सत्ताधारी सुद्धा शांत बसत. परंतु हल्ली सभागृहात लोकप्रतिनिधी दंगा करताना दिसतात. आपण का दंगा करतो आहोत, हे देखील त्यांना समजत नाही. केवळ दंगा करणे म्हणजे आव्हानाला तोंड देणे नव्हे, तर आव्हानांना प्रतिआव्हान देणारा समाज निर्माण झाला पाहिजे,' असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते, माजी उपप्राचार्य प्रा. आनंदराव जाधव यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, लातूरच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०७ व्या जयंतीच्या निमित्ताने लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात 'महाराष्ट्राची जडणघडण आणि यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार, माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे होते. परिसंवादातील वक्ते म्हणून रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद येथील निवृत्त उपप्राचार्य प्रा. आनंद जाधव व दुसरे वक्ते तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथील मराठी विभाग प्रमुख मा. प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख हे होते. मंचावर प्रतिष्ठानचे सदस्य डॉ. मनोहरराव गोमारे, कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर, सोलापूर येथील विजयरत्न डेव्हलपर्सचे विजय जाधव उपस्थित होते.

परिसंवादातील दुसरे वक्ते प्रा. डॉ. देशमुख म्हणाले की, 'महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पायाच मुळात यशवंतराव चव्हाण यांनी रचलेला आहे. त्यावरच आजचा हा डोलारा उभा आहे. वंचितांबद्दल त्यांना प्रचंड जिव्हाळा होता. सर्व सामाजिक स्तरावर त्यांची निष्ठा होती. ग्रामीण भागापर्यंत ग्रंथालय योजना, कोयना, उजनी सारख्या प्रकल्पांची उभारणी, सहकारी कारखाने, उद्योगधंदे, रंगभूमी, तमाशा- लोककला, सहकार, कृषी अशा विविध क्षेत्रांमध्ये यशवंतरावांचं योगदान अनन्यसाधारण आहे. मराठवाड्यावरही यशवंतरावांचे खूप प्रेम होते. मराठवाडा ही ज्ञानाची ज्ञानपोई व्हावी, असे त्यांना वाटत असे. या उद्देशातूनच त्यांच्या कार्यकाळात मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. महाराष्ट्र जो उभा आहे, तो यशवंतरावांच्या विचारांवरच आहे. प्रत्येक माणसाला नावाने ओळखणारा लोकनेता म्हणजे यशवंतराव चव्हाण,' असे विचार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. वाघमारे म्हणाले, 'माणसं उभी करण्याचं आणि माणसं पेरण्याचं काम यशवंतराव चव्हाण यांनी केलं. यशवंतरावांनी जसा महाराष्ट्र घडवला, तसाच महाराष्ट्राने यशवंतराव घडविला असे म्हणावे लागेल. महाराष्ट्रात दोन महत्त्वपूर्ण घटना घडल्या. त्यामध्ये पहिली घटना

म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि दुसरी घटना म्हणजे यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेबाबत पंडित जवाहरलाल नेहरू यांचं मन वळविण्याचे काम यशवंतरावांनीच केले. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेमध्ये यशवंतरावांचा वाटा अत्यंत मोलाचा ठरतो,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक सौताडेकर यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. मनोहरराव गोमारे यांनी केले तर सूत्रसंचालन शैलजा कारंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, रुक्साना मुल्ला, डॉ. कुसुम मोरे, भीमराव दुनगावे, प्रबुद्ध कांबळे, ॲड. शेखर हाविले, ॲड. वसंतराव उगले, सुनिता राठोड आदींनी परिश्रम घेतले.

**परिसंवाद : प्रसिद्धी माध्यमे आणि आजची आव्हाने**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, लातूरच्यावतीने 'प्रसिद्धी माध्यमे आणि आजची आव्हाने' या विषयावर भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात परिसंवादाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ.जनार्दन वाघमारे तसेच मंचावर वक्ते म्हणून कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, 'झी २४ तास'चे जिल्हा प्रतिनिधी शशिकांत पाटील, 'लोकसत्ता'चे जिल्हा प्रतिनिधी प्रदीप नणंदकर होते.

श्री. पाटील म्हणाले, पत्रकारांसाठी व्हिजन, वर्क आणि कमिटमेंट या तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. वास्तव रिपोर्टींग निर्भयपणे करणं हे वर्तमान स्थितीत अत्यंत अवघड काम झालं आहे. आज इलेक्ट्रॉनिक मीडियासमोर सोशल मीडियाचे मोठे आव्हान आहे. इलेक्ट्रॉनिक मीडियाचा पत्रकार हा अत्यंत तत्पर व स्मार्ट असायला हवा. त्याला मल्टि टास्किंग व इलेक्ट्रॉनिक गॅजेट सफाईने हाताळता यावीत.

श्री. नणंदकर म्हणाले, अमर्याद वाढलेल्या वृत्तपत्रांच्या संख्येमुळे वृत्तपत्रांचा वीट आला आहे. स्वातंत्र्यापूर्वी माध्यमांमध्ये वृत्त, वसा, ध्येय होतं. आज पत्रकारितेची घसरण होत आहे. दुहेरी दायित्वामुळेत पत्रकारितेत अडचण निर्माण होत आहेत.

डॉ. गव्हाणे म्हणाले, गेल्या ९० दिवसात कश्मीरमध्ये काय झालं, तिथल्या नागरिकांवर का दबाव टाकला जातो आहे, यावर कोणीच पत्रकार का लिहीत नाही? येथील नागरिकांची मते जाणून घेतली जात नाहीत. येथील नागरिकांवर नियंत्रण राहिले नाही तर ते आतंकवादी होतील. गेल्या कित्येक दिवसांपासून देशात सी. ए.ए. तसेच एन.आर.सी.चा प्रश्न धुमसत आहे. ठिकठिकाणी उपोषणे, आंदोलने सुरू आहेत. लाखो महिला, मुले, नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. यावर का बोललं जात नाही, यावर संवाद का होत नाही, असे प्रश्न त्यांनी विचारले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. वाघमारे म्हणाले, प्रत्येक व्यवसायाचा एक धर्म असतो, तसाच पत्रकारितेचाही धर्म असतो. आव्हाने प्रत्येक काळात असतातच. त्यांचा प्रत्येकाने स्वीकार करायला हवा. पत्रकारितेची उज्ज्वल परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. स्वातंत्र्यापूर्वी पत्रकारांसमोर देशाच्या स्वातंत्र्याची आव्हाने होती. आज पत्रकारांच्या समोर वेगळी आव्हाने आहेत. ती पेलण्यासाठी पत्रकारांनी नेहमी सज्ज राहायला हवे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी केले तर सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विवेक सौताडेकर यांनी केले. आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. श्याम आगळे, डॉ. कुसुम मोरे, रुक्साना मुल्ला, भीम दुनगावे, सुनिता राठोड आदींनी प्रयत्न केले.

**जनतेच्या काही अपेक्षा असतात, काळाच्या काही प्रेरणा असतात, इतिहासाच्या काही हाका असतात आणि याला उत्तर म्हणून शेवटी राजकीय पक्ष बनत असतो. पक्ष म्हणजे कलाकाराने आपल्या घरात एखादे चित्र रंगवावे आणि लोकांनी ते स्वीकारावे अशातला काही प्रकार नाही. कोट्यावधी लोकांच्या भावनांशी जाऊन मिळणारा आणि त्यांच्या विचारांना साथ देणारा असा जेव्हा पक्ष बनतो तेव्हा त्याच्या पाठीमागे अनेक गोष्टी उभ्या असतात.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# विभागीय केंद्र, नवी मुंबई

### चित्रकला स्पर्धा

श्री गजानन लीला ट्रस्ट, पनवेल संचलित ६०० विद्यार्थी-विद्यार्थिनी असलेल्या अनाथ आश्रम शाळेमध्ये दिनांक ९ फेब्रुवारी २०२० रोजी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विजेत्यांना पारितोषिके व सर्व अनाथ मुलांना नाश्ता आणि चहा नवी मुंबई केंद्रातर्फे आयोजित करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रमोद कर्नाड व ट्रस्टचे अध्यक्ष श्री. जगदीश जाधव या कार्यक्रमास उपस्थित होते

### व्यसनाधीनतेविरोधात जागृती

नेरुळ येथील एसआयईएस कॉलेजच्या सुमारे २५० विद्यार्थी विद्यार्थिनींचा मोर्चा (रॅली) नेरूळ एसआयईएस कॉलेज ते रेल्वे स्टेशन व परत असा सहा किलोमीटर आयोजित करण्यात आला होता. यामध्ये नवी मुंबई केंद्राने 'अन्वय' प्रतिष्ठानसह सहभाग घेऊन तरुणांच्या व्यसनाधीनतेस आळा घालण्यासंदर्भात जागरुकता असे अभियान पोस्टरद्वारे राबविण्यात आले. बॅनरवर प्रतिष्ठानचे नाव झळकत होते. विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. प्रमोद कर्नाड, सदस्य श्री. अजित मगदूम व प्राध्यापक वृषाली मगदूम यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला.

### अवयवदानासंदर्भात ऑनलाइन प्रशिक्षण

प्रभात चॅरिटेबल ट्रस्ट, नवी मुंबईतर्फे अवयवदान संदर्भात महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. गेली ९ वर्षे हे काम सुरू असताना २५ मार्च २०२० पासून कोरोना महामारीमुळे अवयवदान अभियानात खंड पडू लागल्याने त्याबाबतची जागरुकता कायम राहण्यासाठी प्रभात ट्रस्ट व नवी मुंबई विभागीय केंद्रातर्फे 'ऑर्गन डोनर मेसेंजर ट्रेनिंग' ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे ठरले. यासाठी सॉफ्टवेअर घेण्यास लायसन्स फी देऊन तीन महिने ऑनलाईन पद्धतीने 'अवयवदानाचे महत्त्व' यावर सहभागी नागरिकांमध्ये कार्यशाळा घेण्यास सुरुवात केली आहे. यावर वेबिनारदेखील आयोजित करण्यात आले.

### ज्येष्ठ नागरिक संघास आर्थिक साहाय्य

नेरूळमध्ये वीस वर्षांपासून ज्येष्ठ नागरिक संघ कार्यरत असून स्वतःची तीन मजली इमारतही आहे. एका मजल्यावर संघाने तीन वर्षांपूर्वी सदस्यांसाठी रुग्ण सेवा केंद्र सुरू केले असून ज्येष्ठ नागरिकांना लागणारे वैद्यकीय साहित्य उदाहरणार्थ, व्हीलचेअर, वॉकर, वॉटर बेड, नेब्युलायझर असे साहित्य सभासदांना अत्यल्प दरात वापरण्यास दिले जाते. सध्या मागणी जास्त व साहित्य कमी पडत असल्याने ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळने रुग्णसेवा केंद्रासाठी वैद्यकीय साहित्य घेण्यास नवी मुंबई केंद्राकडे आर्थिक मागणी केली आहे. विभागीय केंद्राच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०२० च्या कार्यकारणीत एक लाखापर्यंतच्या खर्चामध्ये ज्येष्ठ नागरिक संघाच्या रुग्ण सेवा केंद्रास हॉस्पिटल बेड, व्हील चेअर, वॉकर, ऑक्सिजन जनरेटर, फोल्डिंग स्ट्रेचर, वॉटर बेड, टॉयलेट चेअर खरेदी करून प्रदान करण्याचे ठरले आहे.

**महाराष्ट्र राज्य मराठी भाषिक असले तरी ते केवळ मराठी भाषिकांचे नाही. भाषिक राज्य हे साध्य नसून साधन आहे. मराठी भाषेचा विकास हा महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा एक स्वाभाविक परिपाक आहे. भाषिक राज्याची स्थापना हे साधन असून जनतेचा सर्वांगीण विकास हे साध्य आहे.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# विभागीय केंद्र, कराड

## स्वर्गीय सौ वेणूताई चव्हाण ९४ वी जयंती

सौ. वेणूताई चव्हाण या भारतीय स्त्री जीवनाच्या आदर्श होत्या. यशवंतरावांच्या राजकीय जडणघडणीमध्ये मातोश्री ती. विठामाता यांच्याप्रमाणेच सौ. वेणूताई यांचा अग्रक्रमाने वाटा होता. स्व. वेणूताईंच्या ९४ व्या जयंती दिनानिमित्त २ फेब्रुवारी २०२० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराड येथे वेणूताई व स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेस सचिव श्री. मोहनराव ठाकरे यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आले. तसेच सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येथे स्वर्गीय यशवंतराव चव्हाण व वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण साहेब जयंती सोहळा

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या १०७ व्या जयंती सोहळ्यानिमित्त १२ मार्च २०२० रोजी त्यांच्या भव्य प्रतिमेस मा. श्री अशोकराव गणपतराव चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. स्व. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्ट मधील देशनेते स्व. यशवंतराव चव्हाण व स्व. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास सकाळी आठ वाजता नामदार श्री. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराडचे अध्यक्ष व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट सदस्य श्री. राजेश पाटील (वाठारकर), श्री. नंदकुमार बटाणे, सचिव श्री. मोहनराव व इतर मान्यवर उपस्थित होते.

१२ मार्च रोजी सकाळी साडेआठ वाजता सजवलेल्या बग्गीमध्ये स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांची प्रतिमा ठेवून श्री. नंदकुमार बटाणे व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पदयात्रेस प्रारंभ झाला. सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट येथूनही पदयात्रा सुरू होऊन विजय दिवस चौकातून दत्ता चौक, आझाद चौक, नेहरू चौक, चावडी चौक मार्गे पदयात्रा प्रीतिसंगम बागेतील स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या समाधीस्थळी पोहोचली. या पदयात्रेस शिवाजी शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज व सौ. वेणुताई चव्हाण कला व वाणिज्य कॉलेजचे प्राचार्य त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी तसेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्ही संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते समाधीस्थळी सर्व मान्यवरांनी पुष्पांजली वाहिली.

## स्वर्गीय सौ. वेणूताई चव्हाण यांची पुण्यतिथी

स्वर्गीय सौ वेणूताई चव्हाण यांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कराड येथे दिनांक १ जून २०२० रोजी यशवंतराव चव्हाण साहेब व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या प्रतिमेस खासदार श्री. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. तसेच सौ. वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्ट मधील स्व. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळ्यास सकाळी १० वाजता नामदार श्री. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराडचे व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडचे सदस्य श्री. राजेश पाटील (वाठारकर) श्री. नंदकुमार बटाणे, सचिव श्री. मोहनराव डकरे व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, जळगाव

## ‘भिजकी वही’चं सादरीकरण

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त व महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर परिवर्तन जळगाव निर्मित ‘भिजकी वही’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कवी अरूण कोल्हटकर हे मराठीमधील सुप्रसिद्ध व मोठे कवी आहेत.

आपल्या अनोख्या काव्यशैलीमुळे जगभर प्रसिद्ध असलेल्या अरूण कोल्हटकर यांचा ‘भिजकी वही’ हा स्त्रियांचं दुःख मांडणारा काव्यसंग्रह आहे. पुराणयुगापासून आजच्या काळापर्यंतच्या काही महत्वाच्या स्त्री पात्रांना त्यांनी आपल्या कवितेतून जिवंत केले आहे. ऋग्वेदापासून आजतागायत युगानुयुगे सुरू असलेल्या स्त्रियांच्या दुःखाची व्यथा म्हणजे या कविता संग्रहातील कविता होय. मेरी, रबाया, अपाला, लैला, मैमून अशा विविध स्त्री पात्रांच्या दुःखाला अभिवाचनाच्या माध्यमातून परिवर्तनच्या कलावंतांनी रसिकांसमोर उभे केले. या संग्रहातील प्रत्येक कवितेचं वेगळेपण व वैशिष्ट्य, इतिहास याची सविस्तर मांडणी शंभू पाटील यांनी निवेदनातून केली. कार्यक्रमाची संकल्पना मोना निंबाळकर यांची होती. अभिवाचनात सुदिप्ता सरकार, मंजुषा भिडे, रजिता राजेशिर्के, सोनाली पाटील, जयश्री पाटील, हर्षदा कोल्हटकर यांनी सहभाग घेतला. दिग्दर्शन पुरुषोत्तम चौधरी यांचे होते तर नारायण बाविस्कर व होरिलसिंग राजपूत हे निर्मिती प्रमुख होते. राहुल निंबाळकर यांनी प्रकाशव्यवस्था तर अक्षय नेहे यांनी नेपथ्य केले होते. कार्यक्रम अतिशय अनोखा ठरला. ऐतिहासिक पात्रांना पूरक वेशभूषा, पार्श्वसंगीत आणि कल्पक वास्तवदर्शी निवेदनाने ‘भिजकी वही’ प्रेक्षकांच्या मनात घर करून गेली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष रविंद्र भैय्या पाटील यांनी प्रास्ताविकातून यशवंतरावांच्या स्मृतींना उजाळा दिला व प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेतला. प्राचार्य एस. एस. राणे यांनी यशवंतरावांच्या आयुष्यातील विविध प्रसंग व घटना विद्यार्थीसमोर मांडल्या. या कार्यक्रमात विविध नैपुण्य मिळवणाऱ्या विद्यार्थिनीचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे संदीप भैय्या पाटील, ज्ञानेश मोरे, उपप्राचार्या सुनिता पाटील, उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. दीपक पवार यांनी केले. कला मंडळ प्रमुख स्नेहल परशुरामे यांना प्रा. सुचित्रा लोंढे यांचे सहकार्य लाभले. रविंद्रभैय्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक बंधुभगिनी, ‘परिवर्तन’चे सदस्य उपस्थित होते.

**आजकाल नेतृत्व याचा अर्थ फार मर्यादितपणे केला जातो. राजकारणात एखादे पद प्राप्त झाले की त्याला नेता म्हणायचे, ही सवय जितक्या लवकर दूर होईल तितकी त्याची गरज आहे. राजकारणातला प्रमुख म्हणजे समाजाचाही नेता ही चुकीची व्याख्या आहे. नेतृत्व हा शब्द व्यापक अर्थाचा आहे. वेगवेगळ्या शास्त्रांत प्रगती घडत आहे. वेगळे आदर्श निर्माण होत आहेत. त्यांचा काही सामूहिक परिणाम घडत आहे. हा सामूहिक परिणाम घडवणारे त्या त्या क्षेत्रातील जे कोणी आदर्श असतील ते खरे नेते.**

*– मा. यशवंतराव चव्हाण*

# विभागीय केंद्र, नागपूर

## गोपाळ कृष्ण गोखले पुण्यतिथी

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूर व स्वराज रिसर्च फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी साडेपाच वाजता श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे गोपाळ कृष्ण गोखले यांच्या १०५ व्या पुण्यतिथी निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्रातील विचारवंत वक्ते व ज्येष्ठ संपादक श्री. सुरेश द्वादशीवार यांनी 'गोपाळकृष्ण गोखले आजच्या राजकीय संदर्भात' या विषयावर आपले चिंतन व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉक्टर गिरीश गांधी होते.

## स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची १०७ वी जयंती

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या १०७ व्या जयंतीचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूर व संताजी महाविद्यालय नागपूरच्यावतीने संताजी महाविद्यालयाच्या प्रांगणात वर्धा रोड, छत्रपती चौक, न्यू स्नेह नगर, नागपूर येथे गुरूवार दिनांक १२ मार्च २०२० रोजी सकाळी साडेदहा वाजता आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी 'दैनिक सकाळ नागपूर'चे निवासी संपादक शैलेश पांडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. मनोहर बुटे व संताजी महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक श्री. श्रीकांत पाडळकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष दिनेश वंजारी उपस्थित होते.

## कोरोनाविषयी मार्गदर्शन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूरच्यावतीने 'कोरोना काय आहे?' याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी या विषयातील तज्ञ श्री. पुरुषोत्तम रेड्डी यांना निमंत्रित करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या सदस्यांसह इतरही मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष डॉक्टर गिरीश गांधी यांनी त्यांचे स्वागत केले व परिचय करून दिला.

सर्वश्री निलेश खांडेकर, समीर सराफ, प्रेम लुनावत, संदीप देशमुख, सुशील फतेपुरिया, संदेश सिंगलकर, दीपक निलावार, रेखा दंडिगे घिया इत्यादी यावेळी उपस्थित होते.

## ऑनलाईन संवाद

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र नागपूर, वनराई फाउंडेशन नागपूर, एमएसएम व कृषी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोविड-१९ नंतर कृषी क्षेत्रातील लघु उद्योगांना संधी' या विषयावर बुधवार दिनांक २४ जून २०२० रोजी दुपारी चार वाजता ऑनलाईन संवाद (वेबिनार) आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी 'एमएसएमडीआय'चे संचालक श्री. पी एम पार्लेवार हे प्रमुख वक्ते होते. तसेच शेतकरी अभ्यासक श्री. शरद पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष डॉक्टर गिरीश गांधी उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, परभणी

## कॅन्सर प्रबोधन यात्रेचे आयोजन

विभागीय केंद्र परभणी, 'प्रयास' सेवाभावी संस्था अमरावती, 'आरंभ' सेवाभावी संस्था अहमदनगर, ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी, यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय 'कॅन्सर प्रबोधन यात्रे'चे आयोजन दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत शहरातील विविध महाविद्यालयात करण्यात आले होते

कॅन्सर होण्यामागील कारणे, कॅन्सर झाल्यावर उपचार पद्धती, काळजी, तो कसा बरा होऊ शकतो याविषयी सुप्रसिद्ध कॅन्सर तज्ञ व कॅन्सर प्रबोधन यात्रेचे प्रमुख मार्गदर्शक डॉक्टर अविनाश सावजी (संस्थापक व अध्यक्ष 'प्रयास' सेवाभावी संस्था, अमरावती) यांनी या यात्रेदरम्यान शहरातील महाविद्यालयीन युवक-युवती व सामान्य नागरिकांशी संवाद साधून मार्गदर्शन व प्रबोधन केले. अनेक कॅन्सरग्रस्त व्यक्तींनी या प्रबोधन रॅलीत अनुभव कथन केले.

'कॅन्सर प्रबोधन यात्रे'ची सुरुवात अहमदनगर येथील 'आरोग्य सेवा संस्था' येथून दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी कॅन्सरग्रस्त योद्ध्यांना सोबत घेऊन करण्यात आली. अहमदनगर, बीड, उस्मानाबाद, लातूर व नांदेड मार्गे दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी परभणी येथे सकाळी ९ वाजता यात्रेचे आगमन झाले. यात्रेदरम्यान संपूर्ण दिवस परभणी शहरातील विविध महाविद्यालयात प्रबोधन व चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

यात्रेच्या उद्घाटनासाठी अध्यक्ष म्हणून संध्याताई दूधगावकर (प्राचार्य तथा तत्कालीन अध्यक्ष, परभणी विभागीय केंद्र) तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ. भावनाताई नखाते (उपाध्यक्ष, जिल्हा परिषद परभणी तथा महिला व्यासपीठ प्रमुख, विभागीय केंद्र परभणी) तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अविनाश सावजी (सुप्रसिद्ध कॅन्सर प्रबोधक तथा थोर समाजसेवक, अमरावती), श्री. दीपक काकडे (आरंभ, अहमदनगर) आदी उपस्थित होते. कॅन्सर योद्धा म्हणून सौ. भाग्यश्री वैद्य (परभणी), श्री. खराटे मामा (अहमदनगर) यांनी उपस्थित प्रेक्षकांसमोर कॅन्सरशी लढा देऊन त्याच्यावर कशाप्रकारे मात केली, याचे अनुभव कथन केले.

कॅन्सर प्रबोधन यात्रेचे नियोजन विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष विलास पानखेडे, विभागीय केंद्राचे सचिव विजय कान्हेकर, बालासाहेब फुलारी आदींनी केले. आभार प्रदर्शन डॉक्टर प्राचार्य दाभाडे यांनी केले.

## यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त अभिवादन सभा

दिनांक १२ मार्च २०२० रोजी सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या ८८ व्या जयंती निमित्ताने अभिवादन सभेचे आयोजन विभागीय केंद्र परभणी येथील कार्यालयात करण्यात आले होते.

अभिवादन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विलास पानखेडे तर प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य शिवाजी विरसे होते. मान्यवरांच्या हस्ते प्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर श्री. शिवाजी विरसे यांनी उपस्थित प्रेक्षकांसमोर 'माझ्या स्वप्नातील यशवंतराव चव्हाण' या जीवन चरित्रावर विस्तृत माहिती सांगितली. विलास वानखेडे यांनी 'मी अभ्यासलेले यशवंतराव चव्हाण' या विषयावर मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू वैरागड तर आभार प्रदर्शन प्रदीप चव्हाण यांनी केले. कार्यक्रमासाठी विभागीय केंद्र परभणीचे सर्व सन्माननीय सदस्य व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कोरोना काळात दिव्यांगांना मदतीचा हात

विभागीय केंद्र परभणी, महात्मा गांधी सेवा संघ परभणी द्वारा संचालित दिव्यांग पुनर्वसन केंद्र परभणी तसेच समाज कल्याण कार्यालय जिल्हा परिषद परभणी, यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थ्यांना मदतीचा हात' या आपत्ती व्यवस्थापन सामाजिक उपक्रमाचे आयोजन दिनांक ४ एप्रिल २०२० ते २३ एप्रिल २०२० या दरम्यान करण्यात आले होते.

कोरोना विषाणूच्या संकटावर मात करण्यासाठी शासनातर्फे परभणी जिल्ह्यात या दरम्यान संचारबंदी लावण्यात आली होती. या संचार बंदीच्या काळात हालचाल न करू शकणारे दिव्यांग, तसेच ज्यांच्याकडे रेशन कार्ड नाही अशा ७१ दिव्यांगांना विभागीय केंद्र, परभणी तसेच अपंग पुनर्वसन केंद्र, परभणीतर्फे जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे घरपोच वाटप करण्यात आले.

जीवनावश्यक वस्तूंच्या या किटमध्ये प्रामुख्याने ५ किलो गव्हाचे पीठ, ५ किलो चांगल्या प्रतीचा तांदूळ, २ किलो तूर डाळ, १ किलो गोडे तेल पाकिट, १ किलो साखर, २०० ग्रॅम चहापत्ती, २ लाईफबॉय साबण, १०० ग्रॅम खोबरेल तेल, १०० ग्रॅम मसाला, २०० ग्रॅम मिरची पावडर, १ नग मीठपुडा, सॅनिटायझर इत्यादी वस्तूंचा समावेश होता. विभागीय केंद्र परभणीचे सचिव श्री. विलास वानखेडे, कोषाध्यक्ष श्री. गायकवाड (वैसाका अपंग विभाग परभणी), श्री. विष्णू वैरागड (समन्वयक, दिव्यांग पुनर्वसन केंद्र परभणी) यांच्या हस्ते हे वाटप घरपोच करण्यात आले. यामध्ये श्री. शेख कलीम व श्री. एकनाथ बावळे यांचे सहकार्य लाभले.

# विभागीय केंद्र, देवराष्ट्र

दिनांक २ फेब्रुवारी २०२० ते ३० जुलै २०२० या कालावधीत जन्मघर स्मारकास एकूण ५७३ पर्यटकांनी भेटी दिल्या.

दि.१९ फेब्रुवारी २०२० रोजी श्री.अस्लम शेख (मंत्री, वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य) श्री.डॉ.विश्वजित कदम (मंत्री, कृषी व सहकार महाराष्ट्र राज्य) श्री. राजीव सताव यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मघरास भेट दिली.

दि.१२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जयंती निमित्त जन्मघर स्मारकामध्ये दरवर्षीप्रमाणे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु दि. १० मार्च रोजी सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कोविड-१९ पासून बचाव करण्याकरिता जिल्ह्यातील सर्व कार्यक्रम रद्द (जमाव बंदी आदेश) करण्याचे सांगितले असल्यामुळे कवी संमेलनाचा कार्यक्रम ऐनवेळी रद्द करण्यात आला. दि. १२ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता पलूस व कडेगावचे उपविभागीय अधिकारी श्री. गणेश मरकड व कडेगाव तालुक्याच्या तहसीलदार डॉ. शैलजा पाटील यांनी यशवंतरावांच्या जन्मघरी उपस्थित राहून प्रतिमा पूजन करून आदरांजली वाहिली.

दि.२२ मार्च पासून देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी देशात लॉक डाऊन सुरू केल्यापासून देवराष्ट्रे केंद्र बंद करण्यात आले. ८ जून पासून श्री. महेश चव्हाण (वित्त व लेखा व्यवस्थापक) व दत्ता बाळसराफ (कार्यक्रम व्यवस्थापक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई) यांच्या सूचनेनुसार तसेच फोनवर बोलून व त्यांच्या सूचनांचे पालन करून देवराष्ट्रे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

दि.२ जुलै २०२० रोजी डॉ.विश्वजित कदम (मंत्री, कृषी व सहकार महाराष्ट्र राज्य) व श्री. विजय वेड्डीवार (मंत्री, मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य)यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मघरास भेट दिली.

देवराष्ट्रे केंद्रामध्ये होणारे सर्व कार्यक्रम श्री. दत्ता बाळसराफ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडतात.

# विभागीय केंद्र, रत्नागिरी

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय कार्यालय रत्नागिरी व चिपळूण शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित भव्य रक्तदान मोहीम**

११ जून २०२० रोजी कोकण विभागीय कार्यालयाचे अध्यक्ष मा. आमदार शेखर निकम यांच्या उपस्थित रक्तदान मोहीम आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मा. आमदार शेखर निकम (अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय कार्यालय रत्नागिरी), प्रांताधिकारी प्रवीण पवार, महावितरणचे कार्यकारी अभियंता कैलास लवेकर, चिपळूण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. वैभव विधाते यांच्या उपस्थितीत झाले.

राज्यात रक्ताचा तुटवडा जाणवू लागल्याने शासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत 'प्रतिष्ठान'चे कोकण विभागीय अध्यक्ष शेखर निकम यांनी जिल्हा रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान मोहीम राबविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे २ जून २० रोजी सावर्डे येथे व दिनांक ११ जून २०२० रोजी चिपळूण येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदात्यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

# विभागीय केंद्र, औरंगाबाद

## ७ वा औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

### राष्ट्रीय सुवर्णकमळ विजेता गुजराथी भाषेतील फिल्म 'हेल्लारो' चित्रपटाने महोत्सवाची सुरुवात

'मी स्वतः मराठी असून मूळचा महाराष्ट्रीय आहे. मराठी भाषेमध्ये सातत्याने नवीन प्रयोग होतात. येत्या काळात मलाही मराठी चित्रपट दिग्दर्शन करण्याची इच्छा नक्कीच आहे. मराठी चित्रपट तयार केल्यावर तो औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवणार,' असे उद्गार प्रसिद्ध दिग्दर्शक श्रीराम राघवन यांनी सातव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करताना काढले.

महोत्सवाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. यावेळी जिल्हाधिकारी उदय चौधरी, पोलीस आयुक्त चिरंजीव प्रसाद, दिग्दर्शक ओम राऊत, अभिषेक शाह, दिपाल लांजेकर, अभिनेता चिन्मय मांडलेकर, प्रसाद ओक, महोत्सवाचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, नाथ ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सतीश कागलीवाल, महोत्सवाचे संचालक अशोक राणे, दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, संयोजक निलेश राऊत, महोत्सवाचे संयोजक शिव कदम, प्रोझोनचे वरिष्ठ उपाध्यक्ष कमल सोनी, ज्युरी हेड सुनील सुकथनकर, एरीयन ग्रे हर्बट (ज्युरी-अमेरिका), ब्यॉर्न होमग्रेन (स्वीडीश कौन्सलर), ज्युरी प्रेमेंद्र मुजुमदार, जितेंद्र मिश्रा, श्रीकांत बोजेवार, व्ही. के. जोसेफ, नम्रता जोशी, रेखा देशपांडे, प्रा. अजित दळवी, जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटींग, सतीश सुर्यवंशी, एमजीएमचे प्र-कुलपती डॉ. राजन वेळूकर, कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, कुलसचिव आशिष गाडेकर, शिवाजी लोटन पाटील आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

श्री. राघवन म्हणाले, औरंगाबादसारख्या शहरात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव होतो, तोही आंतरराष्ट्रीय दर्जाचा, ही सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे. येथे जगभरातील चित्रपट दाखविण्यात येतात. चित्रपट हा त्या-त्या काळातील समाजाचा आरसा असतो. चित्रपटांचा परिणाम सर्व समाजावर होत असतो. महोत्सवाच्या माध्यमातून दर्जेदार चित्रपट दाखविल्यामुळे प्रेक्षकांना जगभरात काय सुरू आहे, हे समजण्यास मदत होते. नियोजनबद्ध पद्धतीने चित्रपट महोत्सवाचे आयोजनाने मी भारावून गेलो असून सर्वांना खूप खूप शुभेच्छा. मला मराठी चित्रपट निर्माण करण्याची मनातून इच्छा असून तो तेव्हा नक्कीच या महोत्सवात प्रदर्शित करेन.

### चित्रपट म्हणजे स्वतःच एक भाषा व संवादाचे माध्यमः अभिषेक शहा

सुवर्णकमळ विजेता चित्रपट 'हेल्लारो'चे दिग्दर्शक अभिषेक शहा म्हणाले, 'हेल्लारो' चित्रपट महिला सबलीकरण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावर आधारित असून गुजरातमधील लोककथेवर आधारित गुजराती चित्रपट आहे. हा चित्रपट तयार करत असताना प्रेक्षक या कथानकाला स्वीकारतील की नाही, हे प्रश्नचिन्ह होते. मात्र प्रेक्षकांनी हा चित्रपट स्वीकारला. सध्या हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये सुरू होऊन तेरा आठवडे उलटले असून अजूनही चांगल्या प्रतिसादासह सुरू आहे. त्या-त्या भागातील खऱ्या कथा या लोकांच्या ह्रदयाला भिडतात. त्यामुळे प्रेक्षकांनाही वेगळ्या आशयाचे चित्रपट आवडतात.

### औरंगाबादमध्ये तयार होणारे चित्रपट ऑलिवूड म्हणून नावारूपास येतील : नंदकिशोर कागलीवाल

औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल म्हणाले, सात वर्षांपूर्वी या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे बीज रोवण्यात आले. त्यानंतर टप्प्याटप्प्याने हा महोत्सव औरंगाबादपासून जगभरात जाऊन पोहोचला. आता हा महोत्सव जगभरात औरंगाबादची एक ओळख झालाय. ही उंची गाठण्यासाठी आयोजकांपासून प्रेक्षक, माध्यम आणि असंख्य लोक आहेत. औरंगाबाद ही सर्व क्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योजकांची भूमी आहे. यात कला क्षेत्राचाही समावेश आहे. त्यामुळे बॉलिवूड व हॉलिवूडप्रमाणेच औरंगाबादेत बनणारा चित्रपट हा 'ऑलिवूड' म्हणून नावारूपास येईल, असा विश्वास आहे. हा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव लोकचळवळ बनला असून त्यामुळेच औरंगाबादची ओळखही बनला आहे.

### दहाव्या महोत्सवात दिसतील औरंगाबादचे चित्रपट : चंद्रकांत कुलकर्णी

महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी म्हणाले, की औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळे प्रेक्षकांची अभिरूची वाढत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपटांमुळे चित्रपट पाहण्याचा विद्यार्थ्यांचाही दृष्टीकोन बदलतोय. हे या महोत्सवाचे मोठे यश मानावे लागेल. येथे तयार होणारे सिनेमे दहाव्या

महोत्सवात दाखविले जातील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

### खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय महोत्सव : अशोक राणे

महोत्सवाचे संचालक अशोक राणे म्हणाले, मागील सात वर्षांपासून मी या महोत्सवाशी जोडलेलो आहे. औरंगाबादकरांचे सिनेमावर खूप प्रेम आहे. त्यामुळेच हा चित्रपट महोत्सव यशस्वी ठरत आहे. मी अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जातो, तेव्हा मला औरंगाबादच्या चित्रपट महोत्सवाबाबत नेहमी विचारणा होते. त्याचबरोबर या महोत्सवात सहभागी होण्याची इच्छाही व्यक्त करतात. त्यामुळे हा चित्रपट महोत्सव खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय म्हणावा लागेल.

### हा महोत्सव नवी उंची गाठेलः अंकुशराव कदम

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाणच्या सहकार्याने हा चित्रपट महोत्सव यशस्वीरित्या आयोजित करू शकलो. औरंगाबादकरांचे प्रेम असेच राहील. या महोत्सवाने एक नवा आयाम गाठलेला आहे, यात काही शंका नाही. येत्या काळात हा महोत्सव आणखी मोठी उंची गाठेल, असा विश्वास आहे.

### प्रा. अजित दळवी आणि गणेश घुले यांचा सत्कार

औरंगाबादेतील नाट्यलेखक प्रा. अजित दळवी यांना महाराष्ट्र राज्य शासनाचा राम गणेश गडकरी पुरस्कार, तर कवी गणेश घुले यांना बालकवी पुरस्कार जाहीर झाला. याबद्दल औरंगाबादकरांतर्फे सत्कार करण्यात आला.

### ‘हेल्लारो’ने महोत्सवाची सुरुवात

उद्घाटन सोहळ्यानंतर यंदाची राष्ट्रीय सुवर्णकमळ विजेता गुजराथी भाषेतील चित्रपट ‘हेल्लारो’ने महोत्सवाची सुरुवात झाली. नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन प्रस्तुत व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - विभागीय केंद्र औरंगाबाद आयोजित औरंगाबाद इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल हा महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. ही पैठण मेगा फूड पार्क प्रा. लि., सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती होती. एमजीएम फिल्म आर्ट डिपार्टमेंट या महोत्सवाचे ॲकॅडमिक पार्टनर होते. एस.प्रेस.ओ हे बेव्हरेज पार्टनर तर ओआरबीसी हे थीम पार्टनर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता पानसरे यांनी केले. आभार शिव कदम यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाचा समारोप औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीने तयार केलेल्या राष्ट्रगीत चित्रफितीने झाला.

### नायक विरुद्ध खलनायक नाही - औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव : राघवन

सर्वसामान्यतः भारतीय प्रचलित चित्रपटानुसार अभिनेता विरूद्ध खलनायक असा सरळधोट चित्रपट बघायला मिळतो. मात्र आतापर्यंत तयार केलेल्या माझ्या चित्रपटांमध्ये ही पद्धत मोडीत काढून सर्वसामान्य व्यक्तीकेंद्री चित्रपट तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. बदलापूर, जॉनी गद्दार, अंधाधुंद यांसारखे चित्रपट क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारे आहेत. त्यामुळेच या चित्रपटांतील सर्वच कलाकार सर्वसामान्यांचे प्रतिनिधीत्व करतात, असे मत बॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक श्रीराम राघवन यांनी ‘मास्टर क्लास’मध्ये व्यक्त केले. प्रेक्षकांच्यावतीने यावेळी दिग्दर्शक ज्ञानेश झोटिंग यांनी त्यांना बोलते केले. त्यानंतर त्यांनी प्रेक्षकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देत जीवनपट उलगडून दाखवला.

श्री. राघवन यावेळी बोलताना म्हणाले, कोणत्याही चित्रपटामध्ये सुरुवात, मध्यंतर आणि शेवट अत्यंत महत्त्वाचा असतो. थ्रिलर चित्रपट तयार करताना कथानक, कलाकार आणि वेळोवेळी ट्विस्ट आवश्यक असतात. चित्रपट सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत प्रेक्षकांना खुर्चीला खिळून ठेवतो. माणसाची चित्तवृत्ती चंचल असते. त्या चंचलपणाला स्थिरता देऊन चित्रपटगृहात प्रेक्षकाला खिळवून ठेवण्याचे कसब दिग्दर्शकाचे असते. अर्ध्या-अर्ध्या वाटणाऱ्या घटनांमधूनच एखाद्या गोष्टीला पूर्णत्व आणता येते. त्यासाठी दिग्दर्शक हा उत्तम संपादकही असायला हवा. कारण, आजच्या मॉडर्न युगात जुना काळ दाखविण्यासाठी जुनी गाणी, चित्रपट व त्यातील मोजके प्रसंग पूरक ठरतात.

### असे सुचले नाव

‘बदलापूर’चे नाव ‘बदलापूर बॉईज’ हवे होते; मात्र ते मिळाले नाही. तेव्हा बदलापूरला जोडून काहीतरी शब्द घेतल्यास तेच नाव मिळणार होते. मग या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे सुरुवात होती. या चित्रपटाची ज्या प्रेक्षकाने सुरुवात बघितली नाही, त्याला संपूर्ण चित्रपटात काय चाललेय हे समजणे अवघड झाले असते. त्याचबरोबर अभिनेता कशाचा बदला घेतोय, हे लक्षात आले नसते. त्यामुळेच बदलापूरला जोडून ‘बदलापूर- डोन्ट मिस दी बिगिनिंग’ असे नाव मिळाले. त्याचप्रमाणे ‘अंधाधुंद’मधली ब्लाईंड पिआनो प्लेअरची भूमिका ‘ब्लॅकमेल’ या चित्रपटातून सुचली.

श्री. राघवन म्हणाले, ‘विजय आनंद यांच्या चित्रपटांपासून मला प्रेरणा मिळते. प्रामुख्याने रहस्यमय चित्रपट तयार करताना प्रेक्षकांची अभिरुची जपत करमणुकीसह त्याला वास्तवाचीही जाणीव करून

द्यावी लागते. आजचा प्रेक्षक अत्यंत जागरुक आहे. तो चित्रपटाचा अंदाजानेच वेध घेत असतो. त्याच्या कल्पनांना छेद देत चित्रपटाला पुढे सरकावण्यात एक मजा असते. 'अंधाधुंद' चित्रपटाची प्रेरणा मला एका फ्रेन्च लघुपटावरून मिळालेली आहे. अतिक्रूर माणसातही एक प्रकारची माणुसकी हळूवारपणे डोकावत असते, असे सांगत राघवन यांनी अंधाधुंद चित्रपटाचे उदाहरण समोर ठेवले. अनेक रहस्यमय घटनांचा समावेश असलेल्या या किंवा अन्य चित्रपटात भावना, विनोद, प्रेम, तिरस्कार, आसूया, आकर्षण या मनातील विचारांचे पदर असतात आणि त्याला व्यापक दृष्टिकोनातून उलगडूनही दाखवता आले पाहिजे,' असे सांगत 'पैसे देऊन काही काळापुरते विकत घेतलेल्या प्रेक्षकांच्या चित्ताला कलाकृतीद्वारे आनंद देण्याचे काम दिग्दर्शकाचे असते,' असेही ते म्हणाले. आपण पुण्यात अधिक काळ वास्तव्य केल्यामुळे तेथील झाड-वेलींचे सौंदर्य लुप्त होण्यापूर्वीच ते चित्रपटाद्वारे चित्रीत करून एक ठेवा रुपात जपण्याच्या उद्देशानेच 'अंधाधुंद'च्या चित्रीकरणासाठी पुण्याची निवड केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी 'तान्हाजी'चे दिग्दर्शक ओम राऊत, महोत्सवाचे संचालक अशोक राणे, कलात्मक दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, ज्युरी चेअरमन सुनील सुकथनकर, शिव कदम, अभिनेते प्रसाद ओक, चिन्मय मांडलेकर, नाट्यलेखक अजित दळवी, कवी दासू वैद्य, नीलेश राऊत आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमास विविध महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परिसंवाद : हिस्ट्री अँड सिनेमॅटीक लिबर्टी**

चित्रपट हा रंजक असण्यासह प्रेक्षकांच्या पसंतीस उतरायला हवा. त्यासाठी ऐतिहासिक चित्रपटांची निर्मिती करताना काही प्रमाणात बदल करावा लागतो. मात्र, हा बदल करताना ऐतिहासिक चित्रपट प्रेक्षकांसमोर सादर करण्यापूर्वी तारतम्य बाळगणे आवश्यक असते, असे परखड मत औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवादरम्यान 'हिस्ट्री अँड सिनेमॅटीक लिबर्टी' या परिसंवादात दिग्दर्शकांनी व्यक्त केले. यावेळी अभिनेता प्रसाद ओक, तान्हाजीचे दिग्दर्शक ओम राऊत, 'फर्जंद' व 'फत्तेशिकस्त'चे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांना अभिनेता चिन्मय मांडलेकर यांनी बोलते केले. उपस्थित श्रोत्यांनी 'चित्रपट आणि इतिहास' या विषयावरील प्रश्नही विचारले.

लांजेकर म्हणाले, चित्रपट हा ऐतिहासिक दस्तावेज नाही, तो सांस्कृतिक दस्तावेज आहे. त्यामुळे ऐतिहासिक चित्रपट पाहताना प्रेक्षकांनीही जागरुक होऊन बघायला हवा. ही जबाबदारी केवळ दिग्दर्शकाची नव्हे. इतिहास हे अपडेट होणारे शास्त्र आहे, असे इतिहासतज्ज्ञ कायम सांगत आले आहेत. इतिहास अपडेट झाल्याने त्यातून अनेक गोष्टी समोर येत असतात. त्यामुळेच इतिहास हा दिवसेंदिवस समृद्ध होत जातो. मी स्वतः ऐतिहासिक विषयांना हात घालताना इतिहासाशी संबंधित दस्तावेजांचा अभ्यास करतो आणि त्यातूनच कथानक निवडून खरा इतिहास प्रेक्षकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करतो. इतिहासातील काही घटना आपल्यासमोर चित्रपटांच्या माध्यमातून मांडल्या जात असतात. इतिहास व चित्रपटांचे दुवे जोडताना सिनेमॅटीक लिबर्टी दिग्दर्शक म्हणून आम्ही घेतो. त्या - त्या काळातील पात्रांशी अवहेलना होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

ऐतिहासिक चित्रपट व सोशल मीडियावरील ट्रोलिंग हे ठरलेले समीकरण बनत चाललंय. पण, एखादा चित्रपट व त्याच्या दिग्दर्शकाला ट्रोल करण्यापूर्वी इतिहासाचा अभ्यास करा, त्यानंतरच त्यावर मत व्यक्त करा. ट्रोलिंग उथळ असते. सिनेमा हे लोकप्रिय माध्यम असल्यामुळे ट्रोलिंगच्या माध्यमातून काहीजण उथळ प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात, हे मागील काही दिवसांमध्ये समोर येत आहे. त्याचप्रमाणे नवी पिढी पुस्तकांपासून दूर चालली आहे, ही चिंताजनक बाब आहे. ऐतिहासिक चित्रपटांचा आधार घेत नवी पिढी पुन्हा पुस्तकांकडे वळायला हवी. खरा इतिहास तपासल्यानंतरच सोशलमीडियावर ट्रोल करा, असा सल्लाही श्री. लांजेकर यांनी दिला.

राऊत म्हणाले, 'लोकमान्य' या चित्रपटात इतिहासाशी कुठल्याही प्रकारची छेडछाड करण्यात आली नाही. लोकमान्य टिळकांच्या आयुष्यातील काही प्रसंग चित्रपटात दाखविण्यात आले आहेत. या चित्रपटाचा परफेक्ट असा कुठलाही शेवट नाही. 'तान्हाजी' चित्रपटाचा शेवट हा ठरलेला होता. ज्यात तान्हाजी मालुसरे यांनी कोंढाणा किल्ला जिंकला. पण छत्रपती शिवाजी महाराज व सुभेदार तान्हाजी मालुसरे यांच्यातील शेवटचा प्रसंग ही सिनेमॅटीक लिबर्टी होती. खरे पाहता शेवट कंटाळवाणा होऊ नये, प्रेक्षक खुर्चीला खिळून राहावा यासाठी ही सिनेमॅटीक लिबर्टी होती. चित्रपटाकडे पाहण्याचा प्रत्येक दिग्दर्शकाचा दृष्टीकोन हा वेगवेगळा असतो. त्यादृष्टीने तो चित्रपट बनवत असतो. त्याला त्याच्या चित्रपटात कोणते प्रसंग दाखवायचे आहे, हे तो त्यावरून ठरवत असतो. पण हे करताना प्रत्येकानेच तारतम्य बाळगायला हवे.

मी 'तान्हाजी' चित्रपटात सुभेदार तान्हाजी मालुसरे यांना नृत्य करताना दाखवले. अनेकजण मला विचारतात की, तान्हाजी मालुसरे खरोखर नृत्य करत असतील का? यावर माझे उत्तर

'हो' असेच आहे. अनेक ऐतिहासिक दस्तावेजांमध्ये ते गोंधळ हा लोककला प्रकार करायचे, असा स्पष्ट उल्लेख आहे. पण मी तेथे सिनेमॅटीक लिबर्टी घेऊन शंकरा, शंकरा हे गाणे दाखविले. त्यातही इतिहासाची छेडछाड न करता तारतम्य बाळगले, असेही श्री. राऊत म्हणाले. आपल्या 'हिरकणी' या ऐतिहासिक चित्रपटाबाबत प्रसाद ओक म्हणाले, 'हिरकणी' हे पात्र त्या काळात होते की नाही, असा वाद होतोय. कोणी म्हणतं ती होती, कोणी म्हणतं नाही. पण माझ्या मते हा चित्रपट मातृत्त्वाशी संबंधित आहे. आई तेव्हा होती, आता आहे आणि पुढेही राहणार आहे. त्यामुळेच तिचे मातृत्त्व दाखविण्यासाठी हा चित्रपट मी केला. या चित्रपटात दाखविलेला शिवराज्याभिषेक गीताचा प्रसंग सिनेमॅटीक लिबर्टी म्हणावी लागेल. यात अनेक लोककलाप्रकारांच्या आधारे हे साडेनऊ मिनिटांचे गाणे तयार झाले आहे.

### उलगडला मराठी चित्रपटांचा प्रवास

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी सिनेमा देशभर आघाडीवर होता. त्यानंतरच्या काळात मुंबईतील हिंदी भाषेतील सिनेमांचा प्रेक्षकांवर प्रभाव वाढला. त्यानंतर हळूहळू मराठी सिनेमा झाकोळत गेला. यादरम्यान २००२ मध्ये संदीप सावंत यांनी दिग्दर्शित केलेल्या 'श्वास'नंतर मराठी सिनेमात चैतन्य निर्माण झाले. सद्यःस्थितीत दरवर्षी १०० हून अधिक मराठी सिनेमे निर्माण होत आहेत. पठडीच्या सिनेमांपलिकडे विविध विषयांवर आधारित दर्जेदार सिनेमे मराठीत तयार होत आहेत. येणाऱ्या काळात मराठी सिनेमांना आणखी सुगीचे दिवस येतील, असे प्रतिपादन आशय फिल्म क्लब, पुणेचे संचालक व प्रसिद्ध चित्रपट समीक्षक सतीश जकातदार यांनी औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाअंतर्गत 'महाराष्ट्राची ६० वर्षे आणि मराठी सिनेमा' या विषयावर आयोजित विशेष दृक-श्राव्य व्याख्यानात केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक महोत्सवाचे संचालक अशोक राणे यांनी केले.

श्री. जकातदार म्हणाले, भारतीय सिनेमाच्या इतिहासाकडे नजर टाकली तर लक्षात येते की, भारतात सिनेमाचं आगमन झालं ते मराठी माणसामुळे. १८९६ च्या जुलै महिन्यात ल्युम्युअर बंधूंनी हलती चित्रं मुंबईत दाखविली आणि त्यातूनच प्रेरणा घेऊन अनेकांनी मूकपटांची निर्मिती केली. त्यात दादासाहेब तोरणे, नानासाहेब सरपोतदार, पाटणकर, पटवर्धन, दिवेकर, सावेदादा अशी अनेक मंडळी आघाडीवर होती. १८९३ साली दादासाहेब फाळके यांनी राजा हरिश्चंद्र निर्माण केला. नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे पहिला अमेरिकन चित्रपट ग्रेट ट्रेन रॉबरी ही गँगस्टर फिल्म होती तर राजा हरिश्चंद्र हा पहिला मूकपट.

मराठी चित्रपटांच्या इतिहासाकडे डोळसपणे नजर टाकली, तर लक्षात येते की ही, एक सात वारांची कहाणी आहे. अगदी शुक्रवारी प्रदर्शित होणारी. कौटुंबिक, सामाजिक, ग्रामीण- तमाशाप्रधान, विनोदी, ऐतिहासिक, पौराणिक आणि प्रयोगशील अशा सात ट्रेंडचा प्रभाव मराठी सिनेमांवर चालतो. चित्रपटांच्या कुवतीनुसार आणि प्रेक्षकांच्या लहरीनुसार या ट्रेंडने प्रत्येक दशकात यश आणि अपयश मिळविलेले आहे. आज मराठी सिनेमा गर्दी करत आहेत. १९३२ ते १९४२ या बोलपट युगाच्या आरंभीच्या दशकात देशात मराठी सिनेमा चित्रपट कलेचा साज निर्माण करण्यात आघाडीवर होता. यामध्ये प्रभातसह हंस, नवयुग, कुंकु, माणूस, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, श्यामसुंदर, ब्रम्हचारी या मराठी चित्रपटांचे प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले. समाजातील समकालीन समस्यांना प्रभातने चित्रपटातून सादर केले आणि युद्धोत्तर मराठी सिनेमाची जणू पायाभरणी केली तर विनायक व आचार्य अत्र्यांनी आपल्या विनोदी चित्रपटातून उपहासात्मक शैलीत केले.

प्रभातचा अस्त होत असताना १९४७ नंतर पुढचं पाऊल, जगाच्या पाठीवर या १९५० ते ६० च्या दशकात सुधीर फडके आणि गदिमांसह मराठीला काही अजरामर चित्ररत्ने बहाल केली. याच काळात अगदी अल्पकाळ पु.ल. देशपांडे यांनी हजेरी लावून दिग्दर्शन व विनोदी अभिनयासह मोजक्या चित्रपटांना संगीत देत काही अजरामर चित्रगीते सादर केली. त्यानंतर भालजी पेंढारकरांनी 'छत्रपती शिवाजी,' 'मराठा तितुका मेळावावा,' 'पावनखिंड' आणि 'मोहित्यांची मंजुळा'मधून छत्रपती शिवाजी महाराज आणि त्या काळतल्या मावळ्यांच्या शौर्यकथा रुपेरी पडद्यावर जिवंत केल्या. ह्या अभिमानाचे समकालीन अवशेष आजही 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' सारख्या चित्रपटात ऐकू येतात. त्यासह ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होणारी कैफियत भालजी पेंढारकरांनी 'साधी माणसं' या चित्रपटात मांडली.

काही काळानंतर तमाशा आणि लावणी या लोककलांचा चित्रपटात प्रवेश झाला. शाहिरी वाङ्मय आणि कला यांचे प्रथम लोकप्रिय संस्करण केले ते शांताराम बापूंच्या 'लोकशाहीर राम जोशी' व 'अमर भूपाळी'ने. त्याला ग्रामीण टच दिला तो 'जय मल्हार'ने. त्यातून हसऱ्या नाचच्या संगीताला बहर आला. ठसकेबाज गाण्यांचाही मोहोर फुलला. अनंत माने यांचा 'सांगत्ये ऐका' तब्बल १३२ आठवडे चालला. त्यानंतर माने यांच्याच कथेवर आधारित १९७२ चा शांताराम बापू दिग्दर्शित 'पिंजरा' या लावणीप्रधान चित्रपटाने मराठीत रंगाचे युग सुरू झाले. त्यानंतर

अगदी 'नटरंग'पर्यंत लावणीची लोकप्रियता टिकून आहे.

माता, भगिनी, सून, पत्नी आणि महिलांची दुःखे मेलोड्रॅमॅटीक पद्धतीने मांडणारा हा फॉर्म्युला प्रेक्षकांच्या ह्रदयास भिडला. त्यामुळे मराठी सिनेमाला स्त्री प्रेक्षकवर्ग लाभला. बदलत्या काळानुसार या फॉर्म्युल्यात बदल होत गेले.

मराठी चित्रपटांचे ग्रामीण, तमाशा आणि कौटुंबिक असे विविध प्रवाह असले तरी विनोद हा खऱ्या अर्थाने मराठी सिनेमाचा स्थायीभाव होता. 'प्रेमवीर,' 'दोन घडीचा डाव,' 'सोंगाड्या,' 'अशी ही बनवाबनवी' यांसारख्या चित्रपटांनी हा काळ गाजवला. प्रामुख्याने राजा परांजपे, राजा गोसावी, शरद तळवलकर, वसंत शिंदे, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, दिलीप प्रभावळकर, मकरंद अनासपुरे, संजय नार्वेकर आणि भरत जाधव यांच्यासारख्या असंख्य विनोदी कलाकारांचा उल्लेख त्यासाठी करावा लागेल.

राजा परांजपेंनी शहरी मध्यमवर्गाच्या समस्येची हाताळणी करून कधी गंभीर, कधी नरम आणि विनोदी पद्धतीने चित्रपटांची मांडणी करून अजरामर चित्रपट दिले.

'श्वास'नंतर मागील दोन दशकांमध्ये प्रयोगशील सिनेमांची पाऊलवाट निर्माण झाली, तर व्यावसायिक सिनेमाच्या हमरस्त्यावर आशयघन चित्रपटांकडे प्रेक्षकांचा कल वाढला. 'श्यामची आई'नंतर 'श्वास'ला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. त्यानंतर 'श्वास' ऑस्करपर्यंत धडक मारून आला. 'श्वास'नंतर 'बिनधास्त,' 'टिंग्या,' 'वळू,' 'निरोप,' 'देवराई,' 'गाभ्रीचा पाऊस,' 'जोगवा,' 'चेकमेट,' 'सनई चौघडे,' 'दे धक्का,' 'साडेमाडेतीन,' 'जत्रा,' 'बालक पालक' आणि 'सैराट'सारखे चित्रपट हिंदीला टक्कर देऊ लागले. मागील शंभर वर्षात मराठी सिनेमाचा प्रेक्षक कसा बदलला याचे दर्शन या इतिहासात घडते. हाच मराठी प्रेक्षक शंभर वर्षापूर्वी कसा होता हे दर्शन परेश मोकाशीच्या 'हरिश्चंद्राच्या फॅक्टरी'त दिसते. याप्रकारे मराठी चित्रपट दिवसेंदिवस प्रगल्भ होतोय, असे प्रतिपादन श्री. जकातदार यांनी केले.

## दिग्दर्शकांत स्त्री–पुरुष भेदाभेद नको

चित्रपट दाखवताना तो कोणी सांगितलाय हे महत्वाचे नसते; तर तो प्रेक्षकांना भावलाय का हे महत्वाचे असते; त्यामुळे या क्षेत्रात स्त्री पुरुष असा भेदाभेद असू शकत नाही, असा सूर विमेन डायरेक्टर्स सेंसिटिव्हिटी अँड अॅप्रोच या परिसंवादातून पुढे आला. प्रसिद्ध दिग्दर्शिका सुमित्रा भावे, गौरी शिंदे, प्रतिमा जोशी यांनी या परिसंवादातभाग घेतला होता. अभिनेत्री मुक्ता बर्वे यांनी या तिघींना बोलते केले.

स्त्री म्हणून एखादी स्त्री व्यक्तीरेखा वेगळ्या पद्धतीने सादर करते, पण हा दृष्टीकोनाचा फरक आहे. बिमल रॉय आणि गुरूदत्त यांच्यासारख्या काही पुरुष दिग्दर्शकांनीही स्त्री व्यक्तीरेखा अतिशय उत्तम पद्धतीने मांडल्या आहेत. त्यांनी स्त्री जशी सादर केली, तशी ती सादर करणे अद्याप कोणालाही जमले नाही, त्यामुळे हा भेदाभेद येथेच फोल ठरतो.

यावेळी यशवंरातराव प्रतिष्ठानचे औरंगाबाद विभागीय अध्यक्ष अंकुशराव कदम, अनुराधा कदम, महोत्सवाचे संचालक अशोक राणे, कलात्मक दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, एमजीएमचे कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, लेखक प्रा. अजित दळवी, अनुया दळवी, प्रा. दासू वैद्य, डॉ. रेखा शेळके, संयोजक निलेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

**गौरी शिंदे** : चित्रपट बनवताना स्त्री आणि पुरुष असा भेदभाव नसतो. आपल्याला आवडलेली कथा आम्ही दिग्दर्शक म्हणून प्रेक्षकांसमोर मांडत असतो. त्यावेळी आपल्याला वेगळा प्रेक्षक वर्ग मिळेल, असाही विचार केलेला नसतो. त्यामुळे स्त्री–पुरुष दिग्दर्शकांना वेगवेगळ्या कप्प्यात ठेवणे योग्य नाही. स्त्रियांमध्ये एक पुरुषी मन असते आणि पुरुषांमध्ये एक स्त्री मन असते. या दोघांचा समतोल साधला गेला तर पुरुषही उत्तम स्त्रीप्रधान सिनेमा तयार करतील. आयुष्यात जे अनुभवलं किंवा जसे संस्कार झाले, त्या पद्धतीने कथा सांगितल्या जातात. त्यानुसार एखादी व्यक्ती कथा सांगत असते. त्यात स्त्री–पुरुष असा भेद नसतो. दिग्दर्शक म्हणून संवेदनशीलता महत्त्वाची आहे. फेमिनिस्ट असण्याआधी मी एक ह्युमनिस्ट आहे. त्यामुळे माणूस म्हणून मी एखादी कथा सादर करते. मी सुरुवातीला जाहिराती केल्या. त्यानंतर 'इंग्लिश–विंग्लिश' केला. पण मी दिग्दर्शनात आधीपासून असूनही मला काहींनी असा प्रश्न विचारला की, 'इंग्लिश–विंग्लिश' करताना नवऱ्याची काय मदत झाली? हा प्रश्न खरं तर खूप खटकणारा आहे.

**सुमित्रा भावे** : मला कधीही दिग्दर्शक बनायचे नव्हते. समाजशास्त्राचा अभ्यास करताना एका प्रकल्पादरम्यान अशिक्षीत महिलांपर्यंत माझे म्हणणे पोहोचवण्यासाठी लघुपट बनवण्याचा मी प्रयत्न केला. त्यासाठी आधी चित्रपट कसा बनवला जातो, हे मला शिकावे लागले. मी एक माणूस आहे, आणि माणूस म्हणूनच सिनेमा दिग्दर्शित करते. दिग्दर्शकाचा जसा दृष्टीकोन असतो, तो तसे चित्रपट बनवत असतो. स्त्री पुरुषांत हाच फरक आहे. स्त्री म्हणून जास्त बारकावे मला समजतात. आजकालच्या 'डेली सोप'मध्ये दाखवतात तशी कपटी, मूर्ख, मागे राहणारी स्त्री मला दिसत नाही. माझ्या मते चित्रपट बनवताना त्या काळातील

सांस्कृतिक बारकावे योग्य पद्धतीने दाखवणे गरजेचे आहे. चित्रपट हा पुढे सांस्कृतिक तपशील बनणार असतो. तेव्हा दिग्दर्शक म्हणून योग्य तेच दाखवणे, ही माझी जबाबदारी आहे, असे मी मानते. स्त्री दिग्दर्शक बनते तेव्हा तिला पुरुष दिग्दर्शकापेक्षा जास्त ऊर्जा लागते कारण काही वेळा समाज तिला तिच्या या नव्या रूपात स्वीकारत नाही.

**प्रतिमा जोशी** : माझ्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत औरंगाबाद आणि 'जिगिषा'चा मोलाचा वाटा आहे. मी येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत होते, तेव्हा औरंगाबाद हे वेगवेगळ्या चळवळींचे केंद्र होते. याचा कळत नकळत मोठा परिणाम माझ्यावर झाला आहे. १९८३ साली स्त्रीमुक्ती चळवळ सुरू होती, तेव्हा औरंगाबादेत आम्ही 'स्त्री' ही एकांकिका सादर केली होती. त्याचे राज्यभरात तब्बल १२५ प्रयोग झाले होते. सुरुवातीची अनेक वर्षे मी अमोल पालेकर, चंद्रकांत कुलकर्णी यांना दिग्दर्शन साहाय्य केले. त्यानंतर वर्षभरापूर्वी आलेला 'आम्ही दोघी' हा चित्रपट मी दिग्दर्शित केला. त्याच्या अनेक चांगल्या प्रतिक्रिया मला मिळाल्या. गौरी देशपांडे यांचा बुद्धिप्रामाण्यवाद अगदी योग्य रितीने सादर केल्याची प्रतिक्रिया ही औरंगाबादमध्ये झालेल्या संस्कारांचाच परिणाम आहे. स्त्री म्हणून माझा दृष्टीकोन वेगळा आहे, हे नक्की. पण, केवळ स्त्री प्रधान चित्रपट करण्याचा माझा विचार नाही.

**मुक्ता बर्वे** : मी नेहमी म्हणत असते की, महिलांसाठी वेगळा महिलादिन कशासाठी साजरा करायचा? त्यामुळे या विषयांवरील परिसंवादाचीही भविष्यात गरज पडायला नको. मी स्त्री आणि पुरुष अशा दोन्ही दिग्दर्शकांसोबत काम केले आहे. मी ज्या महिला दिग्दर्शकांसोबत काम केले आहे. त्यांच्यातील वेगळा गुण म्हणजे शिस्त आणि नेटकेपणा. प्रत्येक गोष्ट त्या बारकाव्याने करतात. कलाकारांचे कॉश्च्युमपासून ते टीमचे जेवण झाले की नाही, याचाही विचार त्या करतात, असा माझा अनुभव आहे. स्त्रीया माणुसकीने जास्त विचार करतात, असे मला वाटते. टीम बांधून ठेवण्याचे कसब स्त्रियांमध्ये असते, आणि त्यामुळेच कदाचित प्रोडक्शन टीम मध्येही मला जास्त स्त्रिया दिसतात.

## सुमित्रा भावे यांचा पद्मपाणि जीवन गौरव पुरस्काराने सन्मान; चित्रपट महोत्सवाचा समारोप

आजपासून ३५ वर्षापूर्वी चित्रपट तयार करण्याच्या खेळाची मी खेळाडू झाले. तेव्हापासून असंख्य साथीदारांच्या सहकार्याने हा खेळ पुढे नेत आहे. यादरम्यान औरंगाबादच्या चोखंदळ रसिकांनी माझ्या चित्रपटांचे कौतुक केले. ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. इतकेच नव्हे तर 'पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कारा'नेही माझा सन्मान केला. ही खरोखरच माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे., 'कुछ सवाल बाकी है, मुकाबले लहु लहान, फिर भी ऐ जिंदगी तू बडी मेहरबान है.'अशा भावना सुमित्रा भावे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या.

सातव्या औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमाला पर्यटन व उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे, नंदकिशोर कागलीवाल, अंकुशकाव कदम, महापालिका आयुक्त आस्तिककुमार पांडे, पोलिस अधिक्षक मोक्षदा पाटील, वामन केंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

मनोगतात सुमित्रा भावे म्हणाल्या, औरंगाबादच्या या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात माझा सन्मान होतोय, याचा मला आनंद झाला आहे. मागील दोन दिवसांपासून मी याठिकाणी नव्या फिल्ममेकर्सनी तयार केलेल्या अनेक शॉर्ट फिल्म्स पाहिल्या. त्यांचा स्वच्छ, सकारात्मक दृष्टीकोण, सजगता आणि तंत्राची जाणीव हे सगळे एकत्रित अनुभवता आले. या भावी फिल्ममेकर्ससोबत असण्यात मला विशेष आनंद वाटला. विशेषतः जेव्हा जीवनगौरव पुरस्कार स्वीकारत असता, तेव्हा तुमच्या डोळ्यासमोरून आयुष्याची चित्रफित झर्रकन निघून जाते. सिनेमा प्रेक्षकांना हसवू शकतो, रडवू शकतो हे समजल्यानंतर ३५ वर्षापूर्वी चित्रपट दिग्दर्शनाचा प्रवास सुरू झाला. तो आजही निरंतर सुरू आहे. सिनेमा हा सिनेमा पाहणाऱ्या व्यक्तीला सहिष्णू बनवत असतो.

## पुढील फिल्म फेस्टिव्हल २० ते २४ जानेवारीदरम्यान – अशोक राणे

आठव्या औरंगाबाद इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या तारखा समारोपप्रसंगी जाहीर करण्यात आल्या. २०२१ मध्ये आठवा औरंगाबाद आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल २० ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान होणार असल्याची घोषणा महोत्सवाचे संचालक अशोक राणे यांनी केली. मराठवाड्यात तयार झालेले अनेक चित्रपट जगभरातील सिनेमांसह दाखवणे हे या फेस्टिव्हलचे यश आहे, असे राणे म्हणाले.

## महोत्सवानिमित्ताने पर्यटनाला चालना द्या!

यंदा बाहेरून येऊन या फेस्टिव्हलचा आनंद घेण्यासाठी १५० पेक्षा अधिक लोक इथे बाहेरून आले. प्रेक्षकांची संख्याही यंदा अडीच हजाराच्या पुढे गेली. औरंगाबादचे वैभव ठरलेल्या वेरूळ महोत्सवाची सुरुवात करावी, एमटीडीसीच्या इमारतींची परिस्थिती सुधारावी, शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलशी जोडून पर्यटनाला चालना

द्यावी, दौलताबादेत लाईट अँड साउंड शो चा धूळखात पडलेला प्रस्ताव, पर्यटन प्राधिकरणाची सुरुवात करून पर्यटनाला चालना देण्याची मागणी महोत्सवाचे कला दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना केली.

### महोत्सव : शहराची ओळख

यंदाच्या फिल्म फेस्टिव्हलला मिळालेला प्रतिसाद हा आतापर्यंतचा सर्वात जबरदस्त प्रतिसाद आहे. या चळवळीला आता गती मिळाली असून हा फिल्म फेस्टिव्हल आपल्या भागाचा महत्वाचा कार्यक्रम तथा या भागाची ओळख होईल असा प्रयत्न आम्ही कायम करणार आहोत, असे औरंगाबाद आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल म्हणाले.

### एमजीएमच्या इन्स्टिट्यूटला एफटीआयआयची संलग्नता

औरंगाबाद इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलच्या माध्यमातून आमच्या भागातील मुलांसाठी एक इन्स्टिट्यूट देण्याचे काम एमजीएमने केले आहे. या इन्स्टिट्यूटला एफटीआयआयची संलग्नता मिळाल्याची घोषणा एमजीएम विद्यापीठाचेचे कुलपती अंकुशराव कदम यांनी केली. त्यामुळे येथील मुलांना एफटीआयआयचे कोर्स इथे करायला मुलांना मिळणार आहेत.

### चित्रपट पाहण्यासाठी तरुणाईचा प्रतिसाद हे महोत्सवाचे यश : वामन केंद्रे

'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चे माजी संचालक डॉ. वामन केंद्रे यांनी सांगितले की, अशा महोत्सवात येणाऱ्यांचे सरासरी वय ४०-४५ असते. हे वय औरंगाबाद आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये २५ ते ३० वर आणले, हे या महोत्सवाचे यश आहे. मराठवाड्यात फार सुविधा नसल्याने इथून बाहेर पडावे लागले. मात्र आता चित्र झपाट्याने बदलते आहे. आता या शहरात चांगले चित्रपट तयार होतील असा विश्वास वाटतो आहे, असे केंद्रे म्हणाले.

### आदिती तटकरे यांचे आश्वासन

तुमचे कार्यक्षेत्र कोणतेही असू द्या, त्याने काहीही फरक पडत नाही. कारण, सिनेमा हे तुम्ही वावरत असलेल्या समाजाचे प्रतिबिंब असतात. एक काळ असा होता की, एखाद्या कलाकारासाठी सिनेमा बघितला जायचा. आता हा काळ मागे सरला. आताची तरुण पिढी सिनेमाच्या कंटेटवर चित्रपट बघतात. दर्जेदार कथानक असणाऱ्या चित्रपटाचे प्रेक्षक नेहमी स्वागत करतात, असे प्रतिपादन पर्यटन व उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोपावेळी केले.

त्या म्हणाल्या, मी राजकारण आणि समाजकारण अगदी लहानपणापासून जवळून पाहते आहे. तेव्हा अनेकदा राजकारण्यांना प्रश्न विचारला जातो की, तुम्ही चित्रपट पाहता का? हा प्रश्न विचारल्यानंतर अनेक राजकारण्यांना हो म्हणावे, की नाही म्हणावे हा संभ्रम निर्माण होतो. मात्र, मला हा प्रश्न विचारल्यानंतर मी थेट हो असे उत्तर देते. कारण, चित्रपटातून बरंच काही शिकायला, अनुभवायला मिळते. त्यामुळे सर्वच क्षेत्रातील मंडळींनी सिनेमा जरूर बघावा. औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात समारोपाला येण्याची संधी मिळाली. तेव्हा इथले नियोजन बघून खरंच आनंद झाला.

आज या सरकारमध्ये प्रत्येक वयोगटातील मंत्री आहेत. मलाही या मंत्रीमंडळात समाविष्ट होण्याची संधी मिळाली. त्यामुळे तुम्ही हक्काने म्हणू शकता की, आदिती तू हे करायला हवे. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी मागणी केल्याप्रमाणे एलोरा फेस्टिव्हलवर विचार करूच पण, त्यापूर्वी औरंगाबादचे ऐतिहासिक ५२ दरवाजे आजघडीला दुर्लक्षित आहेत. त्यांचे पुनरुज्जीवन करून सुरुवात करू. औरंगाबादमध्ये कला, पर्यटन व क्रीडा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाव आहे. या क्षेत्रात औरंगाबादचा सर्वांगीण विकास करण्याच्या क्षमता नक्कीच आहे, असेही श्रीमती तटकरे म्हणाल्या.

### 'मदाथी : ॲन अनफेअरी टेलट' तामिळ चित्रपट सर्वोत्कृष्ट, तर 'अडल्ट्स इन दी रूम' सिनेमा प्रेक्षणीय

तामिळ दिग्दर्शिका लिना मनीमेकलाई यांच्या 'मदाथी : ॲन अनफेअरी टेल' हा चित्रपट औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला, तर 'अडल्ट्स इन दी रूम' हा कोस्टा गावरस दिग्दर्शित चित्रपट महोत्सवातील प्रेक्षकांचा सर्वात आवडता चित्रपट ठरला. 'मदाथी : ॲन अनफेअरी टेल' या चित्रपटाला 'सुवर्ण कैलास' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचे स्वरूप एक लाख रूपये रोख, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे, या चित्रपटाला वेगवेगळ्या श्रेणीतील एकूण चार पुरस्कार मिळाले.

पुरस्कार स्वीकारताना दिग्दर्शिका लिना मनीमेकलाई म्हणाल्या, मला औरंगाबादच्या प्रेक्षकांनी भरपूर प्रेम दिले. तामिळनाडूमधील चित्रपटाचा औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये सन्मान होणे, ही माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. चित्रपटालाही प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. एक महिला दिग्दर्शिका म्हणून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी मोठा आहे. या चित्रपटात निसर्गाने मोठी भूमिका निभावली आहे. त्यामुळेच चित्रपटाचे चित्रिकरण

करताना मोठा त्रास सहन करावा लागला होता. मात्र त्याचे फलित म्हणजे चित्रपटाला मिळालेले सर्व पुरस्कार होय. प्रेक्षक आणि आयोजकांचे खूप खूप आभार.

एमजीएम फिल्म आर्ट डिपार्टमेंटच्या शॉर्ट फिल्म कॉम्पिटिशनमध्ये सूरज भालचंद्र शिंदे दिग्दर्शित 'साद' ला बेस्ट शॉर्टफिल्म, तर दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्कृष्ट शॉर्टफिल्म आनंद लोमटे दिग्दर्शित 'रिंगटोन' ही ठरली.

मराठवाडा शॉर्ट फिल्म कॉम्पिटिशनची बेस्ट शॉर्टफिल्म रामेश्वर झिंझुर्डे दिग्दर्शित 'सलाईन' हा लघुपट ठरला. त्याचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र असे आहे.

फ्रिप्रेसी इंडिया ज्युरीमध्ये ज्युरी स्पेशल मेन्शनसाठी विनोद कांबळे दिग्दर्शित 'कस्तुरी : द मस्क' या हिंदी चित्रपटाने बाजी मारली. तर फ्रीप्रेसी इंडिया ज्युरी प्राईजचा विजेता ठरला 'मदाथी : ॲन अनफेअरी टेल.'

इंडियन कॉम्पिटिशनमध्ये बेस्ट एडिटर म्हणून मल्याळम चित्रपट 'जलिकट्टू'साठी दिपू जोसेफ यांना जाहीर झाला. बेस्ट साऊंडसाठी रंगनाथ रावी आणि कन्नन गणपत यांना जलिकट्टू या चित्रपटासाठी जाहीर झाला.

बेस्ट म्युझिकसाठी दीपज्योती मिश्रा यांना 'बिनीसुतॉय' या चित्रपटासाठी, बेस्ट सिनेमॅटोग्राफर म्हणून 'मदाथी : ॲन अनफेअरी टेल' या चित्रपटाचे जेफ डोलेन, अभिनंदन आर आणि कार्थिक मुथुकुमार, बेस्ट स्क्रिन प्लेसाठी 'बिनीसुतॉय'च्या अतनू घोष यांची निवड, बेस्ट ॲक्टर म्हणून 'काजरो' या चित्रपटातील विठ्ठल काळे आणि हिंदी चित्रपट 'कस्तुरी'तील अभिनेता समर्थ सोनवणे यांना विभागून देण्यात आला. बेस्ट ॲक्ट्रेससाठी 'मदाथी : ॲन अनफेअरी टेल'ची अजामिना कासीम आणि 'आनंदी गोपाळ' चित्रपटातील भाग्यश्री मिलिंद यांना विभागून देण्यात आला.

पाच दिवस चाललेल्या चित्रपट महोत्सवात चाळीसहून अधिक चित्रपट दाखविण्यात आले. यात प्रामुख्याने गोल्डनेसा, असंधिमित्ता, योमेद्दीन, अडल्ट इन दी रूम, परवरीशगाह (दी ऑर्फनएज), अंगा स्ट्रिड (बिकमिंग स्ट्रिड), जलिकट्टू, चंद्रबाती (दी टेल्स ऑफ चंद्रबाती), वेईमारंगल (ट्रीज अंडर दी सन), कस्तूरी (दी मास्क), अंधाधुन, फेड अवे पॅस्टोरल, सॉरी वुई मिस्ड यु, चंद्रबाती कथा, डेन स्कायलिज, परवरेशगाह, सॉरी वुई मिस्ड यु, जोसेफ – बॉर्न इन ग्रेस, हिअर माय व्हिलेज, काजरो, बामुम नफी, बिनीसुटॉय, एक दिन अचानक, भोंगा, एमजीएम फिल्म आर्ट कम्पेटिशन शॉर्ट फिल्म स्क्रिनींग, माटोरर, इन ग्यूरे, दिठी, फेड अवे पास्टोरल, हिअर माय व्हिलेज, बिबट्या, अरेबियन नाईट्स, बुलबुल, पॅरासाईट, विदाऊट स्ट्रिंग्स, आनंदी गोपाळ, माडाथी – न अनफेअरली टेल आदी चित्रपटांचा समावेश होता.

## जेनेरिक औषधे

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञानगंगा कार्यक्रमांतर्गत चौतीसावे व्याख्यान औषधशास्त्रज्ञ डॉ. उर्मिला जोशी यांचे 'जेनेरिक औषधे' या विषयावर दिनांक १६ जानेवारी २०१९ रोजी चव्हाण सेंटरच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित केले होते. आपल्या व्याख्यानात डॉ. जोशी यांनी खालील मुद्यांवर विवेचन केले :

१. औषधांचा मूळ घटक पावडर अथवा पूड या स्वरूपात असतो व तो सर्वसामान्यपणे चवीस कडू व विघटनशील असतो. इतर काही घटकांचे मिश्रण करून ते गोळ्या (Tablets) किंवा सिरप स्वरूपात बाजारात उपलब्ध केले जाते.

२. बाजारात उपलब्ध असणाऱ्या काही औषधांना दोन प्रकारची नावे असतात : जेनेरिक नाव व ब्रँडेड नाव. जेनेरिक नावाने विकली जाणारी औषधे ही जेनेरिक औषधे व ब्रँडेड नावाने विकली जाणारी औषधे ही ब्रँडेड औषधे.

३. औषध संशोधनाची प्रक्रिया अत्यंत खर्चिक असते. त्यामुळे औषध कंपनी या खर्चाचा परतावा मिळविण्यासाठी त्यांनी बनविलेल्या औषधाचे पेटंट घेते. पेटंट घेतल्यावर वीस वर्षे त्याच कंपनीला ते औषध विकायचे हक्क असतात. वीस वर्षानंतर इतर कंपन्या ते औषध तयार करून विकू शकतात. अशा तऱ्हेने पेटंटची मुदत संपल्यावर इतर कंपन्या तेच औषध बाजारात आणतात. त्यास 'जेनेरिक औषध' असे संबोधले जाते. या कंपन्यांचा त्या औषधावरील संशोधनाचा खर्च अल्प असल्यामुळे ते स्वस्त किमतीत उपलब्ध होऊ शकते. म्हणून जेनेरिक औषधे ब्रँडेड औषधांपेक्षा बरीच स्वस्त असतात.

४. साधारणपणे औषध संशोधनाची प्रक्रिया समजावून सांगताना त्यातील विविध टप्पे, त्यावर येणारा खर्च इत्यादी गोष्टींचे विवेचनही त्यांनी केले.

५. औषधनिर्मिती संदर्भात स्वातंत्र्योत्तर काळातील साधारणपणे १९५० ते १९९० या काळाचा आढावा घेताना भारतातील औषध उद्योगाची दमदार वाटचाल झाल्याचे त्यांनी नमूद केले. यांसदर्भात नवीन औषधे बाजारात आणण्यात भारताचा वाटा नगण्य; पण कमी खर्चिक प्रक्रियांद्वारे औषध उत्पादन

करण्यात भारत अग्रेसर असल्याचेही त्यांनी सांगितले. परिणामी भारतातील औषधांच्या किमती इतर देशांच्या तुलनेत कमी असल्याचे उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केले.

६. भारतातल्या कंपन्या जी औषधे विकतात, ती सगळी जेनेरिक औषधे असतात; पण त्यातली काही ब्रँडच्या नावाने विकली जातात व त्यांना 'ब्रँडेड जेनेरिक औषधे' असे संबोधले जाते. या दोन्हीतील फरक त्यांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केला.

७. ब्रँडेड औषधांसाठी आग्रह का धरला जातो, या मुद्याचे विवेचन करताना जेनेरिक औषधांबाबत उपस्थित करण्यात येणाऱ्या शंका, या शंका कोणाकडून उपस्थित केल्या जातात व यातील तथ्य याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी केले.

८. जेनेरिक औषधे लिहून देण्याबाबत भारत सरकारचा आग्रह, अमेरिकेतील जेनेरिक औषधांची परिस्थिती व जेनेरिक औषधांची पुढील वाटचाल या मुद्यांवरही त्यांनी विवेचन केले.

व्याख्यानानंतर श्रोत्यांकडून बरेच प्रश्न विचारले गेले. त्यांची अत्यंत समर्पक उत्तरे डॉ. जोशी यांनी दिली. श्रोत्यांना अशा प्रकारे प्रश्न विचारण्यास उद्युक्त करणे हेच या व्याख्यानाचे यश होते. व्याख्यान एकूणच माहितीपूर्ण व आशयसंपन्न झाले. जेनेरिक औषधांबाबत लोकांना माहिती करून देणे व त्यासंबंधातील गैरसमज दूर करण्याचा हा एक प्रयत्न होता.

## जमिनीखालील तेलावाहिन्या

आदिमानवाला सुरुवातीला ऊर्जाच माहीत नव्हती. पण, वणव्यात भाजलेले मांस खाल्ल्यावर ते कसे मिळवता येईल याची उत्सुकता होती. पुढे गारगोटीमुळे ठिणगी मिळाली. जुन्या काळी चरबीचे तेल वापरत. पुढे १८५९ साली कर्नल ड्रेक याला अमेरिकेतील पेन्सिल्व्हेनिया राज्यात कच्च्या तेलाचा (क्रूड) शोध लागला. भारतात आसाम राज्यात १८९२ साली पहिला तेलशुद्धीकरण कारखाना सुरू झाला. आजमितीला २५-३० कारखाने तरी असतील. १९५५ साली मुंबईत बर्मा शेल आणि स्टेनव्हेक या कंपन्यांचे तेल शुद्धीकरण कारखाने आले. त्या आधी तेल ५-१० लिटरच्या डब्यातून आयात होत असे आणि मोटार गाड्या, ट्रक, कारखाने यांची संख्या मर्यादित असल्याने तेलाची आपली गरजही फार कमी होती. मात्र आपल्याकडे कारखाने सुरू झाल्यावर गरज वाढली आणि टँकर, रेल्वे वाघिणी, आगबोटी या साधनांनी तेलाची वाहतूक सुरू झाली. १९६२ साली पहिली पाईपलाईन आली. आगबोटीने जर वाहतुकीचा खर्च १ युनिट येत असेल तर पाईपलाईनने ४ युनिट, रेल्वेने २५ युनिट आणि टँकरने रस्त्याद्वारे ७५ युनिट एवढा खर्च येतो. खर्च कमी जास्त असले तरी उपलब्ध सर्व मार्ग वापरावे लागतात. हळूहळू पाईपलाईनचा वापर वाढत आहे. तेलाच्या पाईपलाईन कार्बन स्टीलच्या असतात. त्या जमिनीखाली टाकतात. त्या गंजू नयेत म्हणून त्यावर आवरण चढवतात. विजेचा प्रवाह सोडून गंजण्याची प्रक्रिया थांबवायचा प्रयत्न करतात. आतील मालाच्या चोऱ्या होऊ नयेत म्हणून पाईपलाईनवर गस्त घालतात. पाईपलाईनमधील तेल ज्वलनशील असते. या पाईपलाईन मधूनमधून स्वच्छही कराव्या लागतात. माल वाहता असेल तर पाईपलाईन नीट चालतात. आतील माल गंजप्रवर्धक असेल तर त्या लवकर खराब होतात.

## कोरोना: उद्योगांसाठी संकट नव्हे संधी

कोरोना व्हायरसमुळे जागतिक बाजारपेठेवर मोठा परिणाम झाला असून, भारताने त्या संदर्भात चिंता करण्याऐवजी आपल्या औद्योगिक धोरणात सकारात्मक बदल केल्यास चीनला पर्याय म्हणून भारत पुढे येऊ शकतो, असे प्रतिपादन उद्योजक सुनील किर्दक यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एमजीएम जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात किर्दक बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष तथा एमजीएम विद्यापीठाचे कुलपती मा. अंकुशराव कदम, तर प्रमुख पाहुणे म्हणून एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. सुधीर गव्हाणे यांची उपस्थिती होती. 'व्यापार उद्योगाला कोरोना व्हायरसचा फायदा की तोटा' या विषयावर सुनील किर्दक यांनी मांडणी केली. ते म्हणाले की, कुठलीही साथ कोणत्याही देशात असली तरी त्यात कुणाचाही फायदा बघणे योग्य नाही. जागतिक बाजारपेठेवर चीनचे वर्चस्व असून जवळपास सर्वच देश चीनच्या उत्पादनांवर अवलंबून आहेत. कोरोनाच्या साथीमुळे या देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणे साहजिक आहे. भारताच्या दृष्टीने विचार केल्यास चीनला पर्याय म्हणून भारत पुढे येऊ शकतो, मात्र त्यासाठी औद्योगिक धोरणात मोठे बदल करून त्या

दृष्टीने पावले उचलावी लागतील. चीनची उत्पादन क्षमता आणि पुरवठा हे स्वस्त दराच्या भूमिकेवर अवलंबून आहेत. त्या स्पर्धेत उतरण्यासाठी आपण मागणी आणि आपल्या क्षमतेचा विचार करून धोरणांची आखणी करायला हवी. मात्र हे एका रात्रीत होणे शक्य नसून भविष्याच्या दृष्टीने ही संधी समजून घेत आताच पावले उचलायला हवीत.

डॉ. गव्हाणे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कर्तृत्वावर प्रकाशझोत टाकला. यशवंतराव चव्हाण यांनी सर्व समाजाचा विचार करून घेतलेले निर्णय हे दूरगामी परिणाम करणारे होते, हे आता सिद्ध झाले आहे,असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात कदम यांनी यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांच्यावरील ग्रंथांचा अभ्यास करावा, असे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर विभागीय केंद्राचे सचिव नीलेश राऊत, प्रा. डॉ. रेखा शेळके, सुहास तेंडुलकर, शिव कदम, राजकुमार तांगडे यांची उपस्थिती होती. नीलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश देशमुख यांनी केले.

**कायद्यातील समानता आणि न्यायालयातील समानता यांना महत्त्व आहेच; पण ती समानता समाजाच्या दैनंदिन व्यवहारात प्रतिबिंबित झाली नाही, तर ती विसंगती दुस्सह होते. प्रत्येक वेळी न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात जाता येत नाही किंवा कायद्यावर बोट ठेवता येत नाही. म्हणून सामाजिक हक्क हे समाजमनाच्या उदारतेवर, त्याच्या समंजसपणावर अवलंबून असतात. मला वाटते, हा तात्त्विक, सामाजिक उदारमतवाद व आपल्या मनात मूळ धरून बसलेली जुनी मूल्ये यांच्यातील संघर्षाचे पडसाद प्रत्येकाच्या जीवनात उमटतात. तुमच्या आमच्या प्रत्येकाच्या जीवनातही हे घडते. आणखी असे, की स्त्रियांचे किंवा दलितांचे समाजातील न्याय्य स्थान केवळ मानवतेच्या किंवा कारुण्याच्या भूमिकेतून आपण स्वीकारले तर ते एक ढोंग ठरेल. समाजघटक म्हणून या दोघांना आपण स्वीकारले पाहिजे, त्यांच्या कर्तृत्वाला स्थान दिले पाहिजे आणि या त्यांच्या नव्या सामाजिक स्थानाशी अनुकूल अशी समाजाची व व्यक्तींची मानसिक जडणघडण झाली पाहिजे.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# विभागीय केंद्र, पुणे

## कृषी व सहकार व्यासपीठ

### ग्राहक संरक्षण कायदा २०१९ गृहनिर्माण संस्थांवर अन्याय

सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपील क्र. १९१८/२०१९६ च्या १४ फेब्रुवारी २०२० रोजी झालेल्या निर्णयांचे गृहनिर्माण संस्था- त्यामध्ये सहकारी गृहनिर्माण, तसेच अपार्टमेंट, कंडोमिनियम असोसिएशन्सही आल्या- यांना आजवर ग्राहक संरक्षण कायद्याखाली त्यांचे सभासद व अपार्टमेंट धारकांच्यावतीने असलेला हक्क नाकारण्यात आला आहे. त्यावर व्यासपीठाच्या निवडक निमंत्रितांच्या सभेत दि. १८ मार्च २०२० रोजी योग्य त्या खबरदारीसह (आसन व्यवस्था योजना करून) सिनिअर ॲडव्होकेट श्री. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा झाली. त्यास अनुसरून योग्य तो कायदा दुरुस्ती प्रस्ताव केंद्र शासनास मा. अंकुश काकडे यांच्या सहीने पत्र क्र. वायसीपी/ओ.सी.दि. ३/७/ २०२० रोजी मा. मंत्री महोदय (कायदा व न्याय) यांना सादर केला. त्यानंतर महाराष्ट्र शासनातर्फेही याबाबत पाठपुरावा व्हावा या उद्देशाने एक सविस्तर पत्र मा. कवडेसाहेब, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना मा. अंकुश काकडे, सचिव, पुणे केंद्र यांच्या सहीने दि. २८.०८.२०२० रोजी सादर केले असून, त्याची प्रत मा. ए. बी. शुल्का, प्रधान सचिव (सहकार) यांना तसेच मा. अजित निंबाळकर, श्री. सुहास पटवर्धन, अध्यक्ष, पुणे जिल्हा – सहकारी गृहनिर्माण महासंघ व ॲडव्होकेट शिरीष देशपांडे ग्राहक पंचायत (मुंबई), जे यामध्ये केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत, त्यांना योग्य त्या कारवाईसाठी सादर केल्या आहेत.

❖ ❖ ❖

### निबंधक सह संस्था तसेच कॉम्पिटंट अधिकारी, फ्लॅटस ओनरशिप कायदा १९६३ व महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप कायदा १९७०

निबंधक सह. संस्था यांची यंत्रणा, फक्त महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅटस् ॲक्ट १९६३ खालील अधिकार वापरते; पण महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप कायद्याखालील तेच निबंधकांचे अधिकार अपार्टमेंट म्हणजे १९६३ चे कायद्यातील फ्लॅटच्या व्याख्येप्रमाणे फ्लॅट असूनही सदर अधिकार फक्त निबंधकच वापरू शकतात. कारण त्यांचे अधिकाराचे डेलीगेशन झालेले नाही. हे मा. कवडे, सो. सहकार आयुक्त यांना प्रस्ताव वाय.सी.पी /ए.सी. दि. १५/२/२०२०. सादर करून दाखवून दिले. त्यांनी योग्य तो प्रस्ताव शासनास सादर केला. त्यावर शासनाचे सहानुभूतीपूर्वक निर्णय झाल्याचे त्या कार्यालयाकडून समजते. पण, कोरोना व अन्य कारणाने शासन आदेश निघाल्याचे दिसत नाही. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यासाठी श्रीमती आभा शुल्का प्रधान सचिव (सहकार) यांना मा. अंकुश काकडे यांचे सहीने १९ जून २०२० रोजी स्वतंत्रपणे लिहिलेली आहे. पण अद्याप शासन निर्णय होऊनही शासन आदेश निघालेले नाहीत असे समजते.

❖ ❖ ❖

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यार्थी प्रश्नमंजुषा/ निबंध/ वक्तृत्व स्पर्धा व शिक्षक निबंध स्पर्धा २०20

सालाबादप्रमाणे यंदा कर्मवीर भाऊराव पाटील या नवीन विषयावर स्पर्धेचे आयोजन केले असून त्यासाठी प्रतिष्ठान व भिडे परिवार (मंगेशी) यांचेतर्फे डॉ. गरूड यांचेकडून ८० पानी पुस्तक किंमत रु. ७० लिहून घेतले आहे. त्याच्या १०० प्रती भिडे प्रतिष्ठान (मंगेशी) यांनी खरेदी करून प्रतिष्ठानचे कृषी व सहकार व्यासपीठाकडे शाळांना पाठविण्यास उपलब्ध केल्या आहेत. नेहेमीप्रमाणे स्पर्धांच्या आयोजनाचे सविस्तर पत्र तयार करून दि. २१.०७.२०२० रोजी त्याच्या प्रती, पुस्तकाचे एका प्रतिसह प्रतिष्ठानचे जिल्ह्यांतील सर्व केद्रांना माहितीसाठी, तसेच अशा स्पर्धा घेण्यासाठी, शाळा लवकरच सुरू होतील या अपेक्षेने पाठविल्या आहेत. तसेच सचिव रयत शिक्षण संस्था यांनाही शाळा सुरू होताच त्याच्या अखत्यारीतील शाळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे या उद्देशाने श्री. काकडे यांच्या सहीने पाठविल्या आहेत. त्याचप्रमाणे श्री. देशपांडे, परीक्षा प्रमुख, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे ज्यांच्या ५६ शाळा पुणे जिल्ह्यात आहेत, त्यांच्याशीही संपर्क साधला असून, शाळा सुरू होताच त्यावर कारवाईचे आश्वासन दिले आहे. केंद्र शासनाने दि. २१ सप्टेंबर २०२० पासून ऐच्छिक स्तरावर शाळांना/ विद्यार्थ्यांना/ पालकांना शिक्षण व्यवस्थेत सहभागी होण्याची मुभा दिली आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या आदेशांची लवकरच अपेक्षा आहे.

❖ ❖ ❖

## डिजिटलायझेशन ऑफ को-ऑपरेटीव्हज

वरील विषयावर, केंद्र शासनाचे जून २०२० रोजी नागरी सहकारी बॅकांवरील रिझर्व बँकेचे अधिकार अधिक कठोर करण्याच्या दृष्टीने काढलेले अध्यादेश लक्षात घेता सहकारी बॅकांनी आता जास्त व्यावसायिक होण्याची आवश्यकता व त्यासाठी डिजिटलायझेशन याचा आधार घेण्याबाबतचे मार्गदर्शनपर भाषण मा. अनिल कवडे, सहकार आयुक्त यांनी दि. १९ जुलै २०२० रोजी आकाशवाणी पुणे वरून दिले.

त्याबाबत त्यापूर्वीच ३१.०३.२०१८ रोजी आमचे कार्यालयाने हा विषय मा. झाडे साहेब, सहकार आयुक्त असताना त्यांच्याकडे घेतला होता. त्यासाठी मा. झाडेसाहेबांनी सविस्तर टिपणीही सादर केली होती. त्यावेळी त्यांनी या विषयात विशेष रुची दाखवून पुणे जिल्ह्यातील निवडक नागरी सहकारी बँका, ग्राहक सहकारी संघ, इत्यादी यांच्यामध्ये, 'सहकारातील सहकार' या सहकारी तत्वास अनुसरून डिजिटलायझेशनच्या माध्यमातून, दोन्ही प्रकारच्या संस्था सभासदांना जास्त चांगल्या सेवा मिळून, अशा सहकारी संस्थांच्या व्यवहारांतही वाढ होण्याच्या दृष्टीने तीन सभा घेतल्या होत्या. हे माननीय अनिल कवडे, सध्याचे सहकार आयुक्त यांचे नजरेस तसेच मा. प्रधान सचिव (सहकार) यांच्या नजरेस आणून देऊन, त्यादृष्टीने काही कार्यवाही व्हावी असे त्यांना दि. १९.०७.२०२० रोजी व्यासपीठाच्या संयोजकांनी ड्राफ्ट केलेल्या पत्राने सुचविले होते. दुर्दैवाने कोरोनामुळे थंडावलेले व्यवहार, कोरोनाची भीती यामुळे पत्र पाठविण्यास बराच विलंब झाला पण, ते पाठवून त्यामध्ये खासगी संस्था, रिझर्व बँकेकडे स्वतंत्रपणे नोंदणी करून अशा नोंदणी झालेल्या संस्थांमधील बँकींग व्यवहार कशाप्रकारे सुकरतेने कॉम्प्युटरायझेशन प्रक्रियेमुळे तत्काळ घडवितात तसे सहकारातील संस्थांमध्ये कोणत्या प्रकारे करता येईल, असे सुचविले होते. माजी सहकार आयुक्त झाडे साहेब बदलून गेल्यामुळे सहकारी/ शासकीय व्यवस्थेतील कार्यप्रणाली यामुळे सदर विषय बासनात गेला होता, तो पुन्हा ऐरणीवर आपल्या पुढाकाराने यावा असे सध्याच्या सहकार आयुक्तांना सुचविले.

❖ ❖ ❖

**मानवमात्राच्या ठिकाणी विचारांची शक्ती मोठी असली तरी त्याच्याही पलिकडे नियती शिल्लक उरतेच. एखाद्या गोष्टीचे ज्ञान पूर्णांशाने घेऊ शकत नाही, ही नियतीची अबाधित व्यवस्था आहे. नियतीचा हा क्रम बदलण्याची शक्ती अजून उपलब्ध व्हायची आहे. जगाच्या अर्ध्यावर अंधार आणि अर्ध्यावर उजेड हा नियतीचा नियम मानवी जीवनातही आढळतो. संपूर्ण उजेड किंवा संपूर्ण अंधार असे जीवन असूच शकत नाही. माझ्या जीवनातील योगायोग असेच ऊन पावसाचे आहेत. मी आजही जीवनाकडे वळून पाहतो त्यावेळी हा ऊन-पावसाचा खेळ मला मोठा रम्य वाटतो.**

***– मा. यशवंतराव चव्हाण***

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मान्यवर

| अ. नं. | वर्ष | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव |
|---|---|---|
| १ | १९९५ | प्राध्यापक मधु दंडवते |
| २ | १९९६ | श्री. बियांत सिंग- मरणोत्तर |
| ३ | १९९७ | डॉ. सी. सुब्रमण्यम् |
| ४ | १९९८ | श्रीमती इला भट |
| ५ | १९९९ | श्रीमती आवाबाई वाडिया |
| ६ | २००० | श्री. सुंदरलाल बहुगुणा |
| ७ | २००१ | डॉ. व्ही. कुरियन |
| ८ | २००२ | डॉ. जयंत नारळीकर |
| ९ | २००३ | श्री. आर. के. लक्ष्मण |
| १० | २००४ | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर |
| ११ | २००५ | श्री. सॅम पित्रोदा |
| १२ | २००६ | श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती |
| १३ | २००७ | श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी |
| १४ | २००८ | इस्त्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) |
| १५ | २००९ | प्रो. यश पाल |
| १६ | २०१० | श्रीमती महाश्वेता देवी |
| १७ | २०११ | एअर चीफ मार्शल श्री. अर्जुनसिंग |
| १८ | २०१२ | डॉ. ई. श्रीधरन |
| १९ | २०१३ | श्री. झुबिन मेहता |
| २० | २०१४ | श्री. रतन टाटा |
| २१ | २०१५ | डॉ. विजय केळकर |
| २२ | २०१६ | श्री. नंदन निलेकणी |
| २३ | २०१७ | डॉ. एम. एम. शर्मा |
| २४ | २०१८ | डॉ. रघुराम राजन |
| २५ | २०१९ | डॉ. अभिजीत बॅनर्जी |

# यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेता | पारितोषिक |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/ व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री. प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास पारितोषिक |
| २०१७ | श्री. भुजंगराव कुलकर्णी | कृषी औद्योगिक समाज रचना/व्यवस्थापन प्रशासन |
| २०१८ | विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१९ | प्रा. एन. डी. पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास पारितोषिक |
| २०२० | लोकहितवादी मंडळ | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |

# दुखवटा ठराव

## मा. श्री. विनायकदादा पाटील, संस्थापक सदस्य

(१९ ऑगस्ट १९४३ - २४ ऑक्टोबर २०२०)

राजकारण, सहकार, साहित्य, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे वनाधिपती मा. श्री. विनायकदादा पाटील यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले. ते 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई'चे संस्थापक सदस्य होते. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात कुंदेवाडी येथील शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. अमोघ वक्तृत्वशैली लाभलेल्या दादांनी कुंदेवाडीचे सरपंच म्हणून राजकारणात श्रीगणेशा केला. पुढे निफाड तालुका पंचायत समिती सभापती, निफाडचे आमदार, विधान परिषद सदस्य अशी भरारी घेत त्यांनी राज्य मंत्रिमंडळात उद्योग, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व युवक कल्याण अशा विविध खात्यांच्या मंत्रिपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. सहकार क्षेत्रातही त्यांचा दबदबा राहिला. कुंदेवाडी विकास कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन, नाशिक जिल्हा सहकारी भूविकास बँकेचे अध्यक्ष, निफाड सहकारी साखर कारखान्याचे संचालक, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ते मार्गदर्शक होते.

वनशेती हा त्यांचा आवडीचा आणि अभ्यासाचा विषय होता. निलगिरीची शेती आणि त्यांचे वृक्षप्रेम पाहून कुसुमाग्रज त्यांना वनाधिपती म्हणून संबोधीत. भारतातील सहकारी वनशेतीचे ते जनक ठरले. ज्या वनस्पतीच्या तेलापासून डिझेल या इंधनाची निर्मिती होऊ शकते त्या जेट्रोफा या वनस्पतीची मोठ्या प्रमाणावर तंत्रशुद्ध शेती त्यांनी १९८६ मध्ये केली होती. जेट्रोफापासून प्रायोगिक तत्त्वावर डिझेल निर्मिती करून त्यांनी तेव्हा जगाचे लक्ष वेधून घेतले होते. जेट्रोफांची लागवड आता सर्वत्र करण्यात येत आहे. तसेच जगातील अनेक देशांत ही लागवड केली जात आहे. विनायकदादा पाटील यांना वनशेतीतील योगदानासाठी महाराष्ट्र शासनाचा कृषीभूषण आणि वनश्री तर भारत सरकारचा इंदिरा प्रियदर्शनी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. फूड अँड ॲग्रीकल्चरल ऑर्गनायझेशन ऑफ युनायटेड नेशन्सचा आऊटस्टँडिंग ट्री फार्मर ऑफ इंडिया तसेच जिनिव्हा येथील रोलेक्स अवॉर्डही त्यांनी पटकावला होता. हे पुरस्कार मिळवणारे ते पहिले व एकमेव भारतीय होते. प्रतिष्ठेचा जमनालाल बजाज पुरस्कारही त्यांना मिळाला होता. यशोधन, निलगिरीची शेती, एक्केचाळीस वृक्ष, ऑइल ग्लूम टू ऑइल ब्लूम, जेट्रोफा २००३ ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांच्या 'गेले लिहायचे राहून' या पुस्तकाला प्रौढ वाङ्मय-ललित गद्य विभागासाठीचा राज्य शासनाचा अनंत काणेकर पुरस्कारही देण्यात आला होता.

अचानकपणे प्रकृती खालावल्यामुळे दिनांक २४ ऑक्टोबर २०२० रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे बिनीचे शिलेदार असलेले विनायकदादा पाटील यांच्या निधनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी निरपेक्षपणे काम करणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई' पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

## मा. श्री. माधवराव पाटील, आजीव सदस्य

प्रतिष्ठानचे आजीव सदस्य, मा.श्री.माधवराव पाटील यांचे दिनांक १४ जून २०२० रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८१ वर्षाचे होते. त्यांचा जन्म २१ जानेवारी १९४० रोजी नाशिक येथे झाला. माजी खासदार असलेले माधवराव मित्र परिवार व आप्तस्वकीयांमध्ये 'आप्पा' म्हणून परिचित होते. मितभाषी, मधुर बोलण्याच्या स्वभावामुळे त्यांनीं सहकार क्षेत्रातील नेत्यांबरोबरच सर्वसामान्य जनतेशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले होते. निस्पृह, निरपेक्ष वृत्तीने काम करणाऱ्या आप्पांनी सहकार, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी सहकार कायद्यांचा सखोल अभ्यास केला होता व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, हे आपले कर्तव्य मानून लोकसंग्रह जमविला. सामान्य जनतेला अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी त्यानीं १९७९ मध्ये जनलक्ष्मी बँकेची स्थापना केली व अल्पावधीत सहकार क्षेत्रातील या बँकेला नावलौकिक मिळवून दिला. राज्य सहकारी बँकेचे संचालक, सार्वजनिक वाचनालयाचे उपाध्यक्ष, १९९२ ते २००७ या काळात नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेचं अध्यक्ष, जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघाचे व्यव-स्थापक अशी अनेक पदे माधवराव पाटलांनी भूषविली. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांचे मोठे योगदान होते. मनपा शिक्षण मंडळ, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, समर्थ, जनकल्याण, गोदावरी, गणेश यासारख्या सामाजिक संस्था, सहकारी बँक आणि अनेक पतसंस्थांच्या उभारणीत त्यांचा सहभाग मोलाचा ठरला. सांस्कृतिक क्षेत्रातील संस्थांना उभारी देणारा नेता म्हणून त्यांची वेगळी ओळख होती.

समाजातल्या सर्वच घटकांशी नाते जपणारे, एक अजातशत्रू माधवराव आप्पांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी ठरेल. श्री माधवराव पाटील यांच्या निधनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान एका सेवाव्रती पाठीराख्याला मुकला आहे. प्रतिष्ठान माधवरावांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

## पद्मभूषण मा. श्री.  राम प्रधान, विश्वस्त

(२७ जून १९२८  ३१ जुलै २०२०)

'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'चे विश्वस्त, ज्येष्ठ सनदी अधिकारी, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव, पद्मभूषण मा.श्री. राम प्रधान यांचे दिनांक  ३१ जुलै २०२० रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.  ते  ९२  वर्षाचे होते.  श्री. प्रधान यांनी ३६ वर्षांच्या प्रशासकीय सेवेत केंद्र शासनातील गृह, संरक्षण, वाणिज्य विभागांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांनी महाराष्ट्रराज्याचे प्रथम मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांचे सचिव म्हणूनही काम पाहिले होते.  संयुक्त राष्ट्रसंघात प्रतिनियुक्तीवर असताना अविकसित देशांना वाणिज्य व विकास क्षेत्रांमध्ये 'सल्लागार' म्हणून त्यांनी काम पाहिले. महाराष्ट्राचे मुख्य सचिव असताना त्यांनी यशवंतराव चव्हाण लोकप्रशासन प्रबोधिनी या संस्थेची स्थापना केली. ती भारतातील प्रशिक्षणाच्या क्षेत्रातील आघाडीची संस्था म्हणून ओळखली जाते. केंद्रात गृहसचिव पदावर असताना पंजाब, आसाम आणि मिझोराम येथील शांतता करार करण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. ३० जून १९८६ या त्यांच्या सनदी सेवेतील सेवानिवृतीच्या दिवशीच मिझोराम करारावर स्वाक्षऱ्या  झाल्या होत्या.  त्यांच्या नि:स्पृह प्रशासकीय सेवेचा गौरव म्हणून भारत सरकारने १९८७ मध्ये त्यांना पद्मभूषण  या नागरी पुरस्काराने सन्मानित केले होते.  प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांना अरुणाचल प्रदेशचे राज्यपाल नेमण्यात आले होते. श्री. प्रधान १९९०-९२ या काळात महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य होते. डिसेंबर २००८ मध्ये महाराष्ट्र शासनाने २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या उच्च स्तरीय चौकशी समितीचे प्रमुख पदत्यांनी भूषविले. त्यावेळी त्यांनी सुरक्षा व्यवस्थेचा फेर आढावा घेऊन व्यापक बदल सुचविले होते. प्रधान समितीच्या या अहवालानंतर राज्य शासनाने अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, उपकरणे खरेदी केली होती.

विलक्षण बुद्धिमत्ता, कार्यतत्परता  आणि सचोटी या गुणांमुळे श्री.राम प्रधान प्रशासकीय क्षेत्रात नेहमीच अग्रभागी राहिले. विवादास्पद परिस्थितीत तोडगा काढण्यात, सामंजस्य घडवून आणण्यात प्रधानांचा हातखंडा होता.  प्रतिष्ठानचे विश्वस्त म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या कला, संस्कृती आणि रचनात्मक कार्यक्रमांना प्रशासकीय अनुभवाची जोड देत सामाजिक बांधीलकी जपली.

श्री. प्रधान यांनी  आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवेच्या अनुभव संपन्न वाटचालीवर आधारित अनेक पुस्तकांचे लेखनही केले आहे. वर्किंग विथ राजीव गांधी, १९६५ इंडिया-पाकिस्तान वॉर, ड्रॅगन्स शॅडो ओव्हर अरुणाचल प्रदेश, इन इंडियाज सर्व्हिस अब्रॉड, डीबॅकल टू रिसर्जन्स वाय.बी. चव्हाण, इत्यादी त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.  सुमारे दोन वर्षांपूर्वीच माझी वाटचाल हे त्यांच्या ३६ वर्षांच्या सनदी सेवेचा विस्तृत आलेख असलेले त्यांचे आत्मचरित्रही प्रकाशित झाले आहे.

मा. श्री. राम प्रधान यांच्या निधनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आपल्या परिवारातील एक अनुभव संपन्न, बुद्धिमानव व्यासंगी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्रधान कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

## मा. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, विश्वस्त

(१ सप्टेंबर १९३१  ५ ऑगस्ट २०२०)

'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'चे विश्वस्त, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. डॉ. शिवाजीराव पाटील ऐनिलंगेकर यांचे ५ ऑगस्ट २०२० रोजी पहाटेच्या सुमारास पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले.  ते  ८९ वर्षांचे होते.  शिवाजीराव पाटील लातूर जिल्ह्यातील निलंगा येथील रहिवासी होते. निलंगा गावाहूनच त्यांनी आपली राज्यच नव्हे तर देशभर निलंगेकर म्हणून ओळख निर्माण केली. स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा सहभाग होता. मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. सहकार चळवळीत त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. किल्लारी सहकारी साखर कारखाना, अंबुलगा सहकारी साखर कारखाना, लातूरची जवाहर सहकारी सूतगिरणी यांचे संस्थापक असे त्यांचे योगदान राहिले आहे.  डॉ. निलंगेकर यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्यही उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी शिक्षण संस्था स्थापन करून प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. निलंगा येथे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माण शास्त्राचे डी.फार्म व एम.फार्म. शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. नागपूर विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट ही पदवी दिली होती. प्रारंभी त्यांनी वकिली  व्यवसाय ही केला होता.

डॉ. शिवाजीराव पाटीलऐनिलंगेकर यांनी ३ जून १९८५ ते ६ मार्च १९८६ या नऊ महिन्यांच्या काळासाठी महाराष्ट्राचे १० वे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले आहे. ते दीर्घकाळ पाटबंधारे खात्याचे मंत्री होते. महसूल मंत्रीपदासह राज्याच्या मंत्रिमंडळात विविध खात्यांची मंत्रीपदे त्यांनी भूषविली.  ते काही काळ प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. लातूर जिल्ह्याची निर्मिती व मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्मितीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांना वाचनाची विशेष आवड होती, तसेच शास्त्रीय संगीतातही रुची होती.  व्हॉलीबॉल, टेबल टेनिस अशा खेळांमध्ये ते रमत असत.

मा. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निधनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या परिवारातील एक कुशल, अनुभवसंपन्न आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे : भाग १ - संकलन : डॉ व्ही जी खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस - विधिमंडळ - भाग २ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट - वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन - डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक-वेधक - डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी' - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |

| | | |
|---|---|---|
| २९. | Yashwantrao Chavhan : an Autobiography | ३९५.०० |
| ३०. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३२. | शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३३. | शिक्षणकट्टा – बसंती रॉय | २००.०० |
| ३४. | वाटचाल ई–शिक्षणाची – बसंती रॉय | २००.०० |
| ३५. | हवामान बदलास आमचे उत्तर | १००.०० |
| ३६. | विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे | २००.०० |
| ३७. | पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर | १६०.०० |
| ३८. | पर्व–प्रगतीचे परिवर्तनाचे – पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दूतही उपलब्ध) | खाजगी वितरणासाठी |
| ३९. | Whats App चर्चा– शिक्षण विकासाच्या – संपादक : माधव सूर्यवंशी, नितीन खंडागळे, किशोर भागवत | २००.०० |
| ४०. | सेमी इंग्रजी – का आणि कसे ? | २००.०० |

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- ‘बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै’ माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- ‘जागर हा जाणिवांचा....’ लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- ‘कृष्णाकांठ’ : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मीळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com





विभागीय केंद्र सोलापूर: केंद्रीय अर्थसंकल्पावर वर चर्चा



विभागीय केंद्र परभणी – मा. चव्हाण साहेब जयंती साजरी करण्यात आली



विभागीय केंद्र परभणी: एक हात मदतीचा परभणी विभाग उपक्रम






विभागीय केंद्र लातूर – परिसंवादाचे आयोजन






वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान आयोजित क्लायमेट अँबॅसॅडर्स विद्यार्थ्यांची परिषद





महाराष्ट्र महिला व्यासपीठ, सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग २४



गझलदीप कार्यक्रमाप्रसंगी सुप्रसिद्ध गझलकार, प्रदेप निफाडकरयांचा सन्मानकरताना डॉ. मनोज शिंपी, सोबत विश्वास थाकूर, डॉ. सुधीर संकलेचा, ॲड. नितीन ठाकरे, नितीन महाजन, सुनील कडासने, डॉ. सुभाष पवार, विक्रम उगले



जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. कल्पना संकले यांचा सन्मान करताना वैशाली जामदार, सोबत विश्वास ठाकूर, स्मिता पवार, विनया उपासनी






विभागीय केंद्र औरंगाबाद: आयोजित औरंगाबाद इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल



विभागीय केंद्र रत्नागिरी : चिपळूण शहर आयोजित भव्य रक्तदान मोहीम



विभागीय केंद्र जळगाव: मराठी रंगभूमी दिनानिमित्त आयोजित परिसंवाद




अपंग हक्का विकास मंच: कोरोना काळात दिव्यांगांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



विभागीय केंद्र कऱ्हाड: आयोजित कार्यक्रम




दि. ११ जुलै २०२० रोजी कोरोना काळातील ऑफलाइन अभ्यास या विषयावर वेबिनार शिक्षण कटट्याचे आयोजन करण्यात आले होते.



विभागीय केंद्र आंबेजोगाई: स्वा. रा. ती. ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात एन ९५ मास्क सुपूर्द ३१ मार्च २०२०, आयोजित कार्यक्रम




विज्ञानगंगा आयोजित  महाराष्ट्रातील दुष्काळ – वक्ते . मा. श्री. अतुल देऊळगावकर



स्व–संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा



सी डॅक बॅच